वर्षाचा आगाऊ रु० १ डाक हांशील ०।१२

सहामाही " २ " ०।८

सालअखेर " ७ " १।८

किरकोळ अंकास.............................. ०।४

नोटिशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १

पुढें दर ओळीस ०।१।६

दुसरे खेपेस .........०।१

Per annum in arrears 7 ,,Rs. 8 as

Six monthly............3 " 8 as

Single copy..................................4as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisements

Below 10 lines...2 Rs

per line over10...4 as

Repetition per line 3as

VOL XXV | AKOLA MONDAY 5 OCTOBER 1891 | NO. 39

वर्ष २५ | अकोला सोमवार तारीख ५ माहे आक्टोबर सन १८९१ इ० | अंक ३९



## भारी अजब दवा.

चष्मा लावूं नका.

हें रामबाण औषध फक्त २१ दिवसांत तीव्र दृष्टि करतें. तुह्मांस चष्मा लाविल्या शिवाय जवळचा किंवा दूरचा पदार्थ दिसत नसल्यास हें औषध घ्या. गुणाबद्दल अनेक दाखले मिळाले आहेत. पूर्ण माहिती औषधा सोबत. किं. २ रु. बंगी खर्च ०६ व्ही. पे. पाठवूं

पत्ता– ग. स. पाटील. बुधवार पेठ पुणें.


## नमुना नंबर १४२
## दिवाणी कोर्टास सूचना

अज्ञानाच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचें सरटिफिकीट मिळण्याविषयीं अथवा अज्ञानाचें पालन व त्याचे माल मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्याविषयीं सन १८९० चा आक्ट ८ कलम ११ प्रमाणें.

अर्जीचा नंबर दि. कि. क्लास १३

मिसल नंबर ९/१८९१

सिव्हिल जडज्य साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार तुकाराम मुकाजी जात पाटील राहणार सुकळी तालुके अकोट

वरील (अर्जदार) तुकाराम मुकाजी जात पाटील रहाणार सुकळी तालुके अकोट जि० अकोला. यानें अज्ञान (पुंजाजी वल्लद फकीरजी) याचे माल मिळकतीच्या वहिवाटीचें सर्टिफिकीट मिळावें ह्मणून याचें पालन व माल मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमला जावा म्हणून अर्ज दिला आहे. व त्याची नक्कल ह्या सोबत दिली आहे. यास्तव मृत्युपत्राचे आधारें किंवा दस्तऐवजावरून किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचें कारणावरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदरहू अज्ञानाचे माल मिळकतीवर सांभाळकर्ता या नात्यानें कबजा करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्यां सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं तारीख १० माहे आक्टोबर सन १८९१ इ० रोजीं वरील अर्जीची चौकशी होणार आहे ते वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हक्काची लेखी हकिकत दाखल करावी. तारीख २६ माहे सप्तंबर सन १८९१ इ०

V. N. Daudeker

सिव्हिल जडज्य.

विद्यमान स्पेशल असिस्टंट कमिशनर साहेब बहादुर जिल्हा अकोलें

तुकाराम वल्लद मुकाजी पाटील राहाणार मौजे सुकळी प्रगणें धरूर तालुके अकोट अर्जदार अज्ञानाचे पालन व जिनगी संरक्षण करणें बद्दल सन १८९० चा आक्ट नंबर ८ कलम १० पोट कलम १ प्रमाणें अर्ज

मी अर्जदार विनंती करितों कीं खालीं लिहिल्या प्रमाणें आज्ञानाचा बाप फकीरजी वल्लद लक्ष्मणजी मैत झाला त्यास खालीं लिहिलेला पुत्र अज्ञान आहे त्याचे वर लिहिल्या प्रमाणें दोन्हीचे पालणासंबंधी अर्ज

(अ) अज्ञानाचें नांव पुंजाजी वल्लद फकीरजी वाळके जात कुणबी उमर वर्षे सुमारे १३ अगर १४ राहणार बळेगांव प्रगणें अकोट तालुके अकोट हल्ली वस्ती सुकळी तालुके अकोट जिल्हा अकोलें.

(ब) अल्पवयी पुरुष आहे.

[क] अल्पवयी मनुष्याची जी मिळकत आहे त्याच्या ठिकाणा सुद्धां स्थावर व जंगम मिळकतीची अलाहिदा यादी जोडून या अर्जी बरोबर हजर केली आहे. व त्याची किंमत अंदाजानें लावलेली आहे.

(ड) अल्पवयी मनुष्याचे शरीराची व मिळकतीची रखवाली बापु वल्लद माहादाजी पाटील लाजूरकर रहाणार बळगांव तालुके अकोट याजकडेस आहे.

(इ) अज्ञानाचे नातलग अर्जदार हा सख्खा चुलत भाऊ असून निशाणा (ड) तील बापु वल्लद माहादाजी हा मामा आहे या शिवाय सलगीचे नातलग कोणी नाहीं.

(फ) अल्पवयी मनुष्यास शरीराची व जिनगीची पालन करण्याबद्दल कायदेशीर नेमणूक झालेली नाहीं.

[ग] अल्पवयी मनुष्याचे शरीराचे व जिनगीबद्दलचे पालणा संबंधी अर्जी पूर्वीं कोणतेंच कोर्टांत केली नाहीं.

[ह] अल्पवयी मनुष्याची व जिनगीचा कोणी पालण करणारा नेमण्यांत आला नाहीं.

(आय) पालन करण्याबद्दल अर्जी केली नसून पूर्वींचा पालन करणारा अज्ञानाचा मामा होता तो त्यास घेऊन गेला त्याची लायकी ह्मणण्या सारखी नसून फक्त शेतीचे काम करितो

(जे) अर्जदार हल्लींचा हा पालन करणाराचा अज्ञानाचा साक्षांत चुलत भाऊ आहे. पूर्वीं ज्याचे जवळ आहे त्यांनीं खालीं लिहिल्या प्रमाणें जिनगीचे अफरातफर करण्याचे मनांत आणिलें सबब अर्ज करण्यास कारण झालें.

१ सर्वे नंबर २९ चें शेत विकलें आहे.

१ जंगम मालाची अफरातफर करीत आहे.

१ पूर्वीं आज्ञानास ममतेनें जसें पालन करीत होता त्या प्रमाणें हल्लीं करीत नसून त्याजला हे सर्व गोष्टींनें खाण्यापिण्यासुद्धां दुर्लक्ष करीत आहे.

(के) वर लिहिल्या प्रमाणें योग्य झालेली आहेत.

(ल) हल्लीं ज्या बापु जवळ तो बाप मेल्या पासून होता तो बापू मजकूर हा अज्ञानाचे स्थावर जंगम जिनगी हळू हळू अगदीं नाहींशीं करून त्यास कोणाचे कर्ज वगैरे बापाचे वेळे पासून नसून बापु आपले स्वतःचे निर्वाहा करितां खर्च करीत चालला आहे सबब अर्जदार यानें ही विनंती केली आहे. सबब सदरहु बद्दल रीतीप्रमाणें चौकशी होऊन अर्जदार यास दोन्ही कामाचे सरटिफिकेट मिळवून पूर्वीचे पालन करणाराचे ताब्यांतील स्थावर जंगम जिनगी यादी दाखल केली आहे त्याप्रमाणें अज्ञानासह अर्जदार याचे ताब्यांत मिळण्या विषयीं हुकूम देणार सरकार आहेत हा अर्ज ता० २३-९-९१ इ.

पांडुरंग लक्ष्मण दस्तुर खुद्द.

सही

तुकाराम मुकाजी निशाणी असे

मी अर्जदार तुकाराम वल्लद मुकाजी विनंती करितो कीं. वरील अर्जीतील मजकूर माझे पूर समजुती प्रमाणें खरा आहे तारीख २३-९-९१ इसवी.

सही

तुकाराम वल्लद मुकाजी निशाणी असे.

दि. कि० क्ला० १३ मिसल नंबर ९/१८९१

## पत्रव्यवहार

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

ता० २९-९-९१

केळीवेळी जिल्हा अकोला.

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांसः—

रामराम वि वि.— तारीख २४ पासून पावसाळ्याला आरंभ होऊन व त्याची मोठी वृष्टि होऊन ता० २८ रोजीं येथून पाऊण मैल असलेल्या पूर्णा नदीस इतका महा भयंकर पूर आला होता कीं, असा या ७–८ वर्षांत आला नव्हता.

त्या योगें गांवच्या दक्षिण भागांतील पुष्कळ गरीबगुरिबांचें नुकसान झालें. तो पूर इतका वाढला होता कीं, येथील नवीन बांधलेली सरकारी मुलांच्या शाळेची पुरवळ्याची जागा, सरकारी चावडी, सरकारी मुलींची शाळा, गांवकरी धर्मशाळा व सुमारें शंभर घरें हीं जमीनदोस्त झालीं. सदरहू प्रसंगाचा देखावा इतका भयंकर होता कीं, गांवच्या भोंवतीं वेढा पडून शेतोंशेतीं व रानोमाळ पूर्णाबाईचें पाणी मोठ्या उग्र रूपानें दृष्टोस पडत होतें. व गांवचे सर्व लोक इतके घाबरून गेले होते कीं त्यांचो "दे माय धरणी ठाय" अशी स्थिति झाली होती.

तथापि पूर्णाबाईच्या कृपेनें सायंकाळ पासून पुराच्या पाण्यास उतार लागला तेणें करून लोकांच्या चेहऱ्यास हुरूप आला सदरहू पुराच्या योगानें या गांवीं ज्यांची ज्यांचीं शेतें पूर्णातटाकीं आहेत त्यांचे सर्वस्वी नुकसान झालें. करितां ही नुकसानीची हकिकत आपण आपलें पत्रद्वारें कमिशनर साहेब व रेसिडेंत साहेब यांच्या नजरे पुढें आणून येथील शेतकऱ्यांचें तसेंच पूर्णाकांठचें शेतकऱ्यांचें नुकसान झालें आहे. ह्मणून त्यांस शेत वायदा माफ होण्याविषयीं शिफारस कराल असें जाणून आपलें पत्रीं धांव घेतली आहे. तेव्हां मायबाप सरकारास काय कदर येईल ती खरी, पत्रविस्तार भयास्तव पुरा करितों. लोभ करावा ही विनंती.

'एक शेतकऱ्यांचा कनवाळू.'

वऱ्हाडसमाचार

मिति आश्विन शुद्ध २ शके १८१३

## अबकारी खात्याचा रिपोर्ट.

(१८९०-९१)

विलायती मद्यें व दारू, देशी ताडीची किंवा शिंदीची दारू, अफू आणि गांजा या पदार्थांवर बसविलेल्या करांचें उत्पन्न हेंच अबकारी खात्याचें उत्पन्न होय विलायती दारू विकण्यासाठीं परवाने दिले असतात. त्या परवान्याची सालिना फी शंभर रुपयांहून कमी पडत नाहीं. देशी दारू ह्मणजे ज्यास आपण शिंदीची दारू असें ह्मणतों ती तयार करण्या बद्दलचा व विक्री करण्या बद्दलचा हुकूम सरकार मार्फत लिलावानें दिला जात असतो. दरवर्षीं जानेवारी व फेब्रुवारी या दोन महिन्यांत मिळून प्रांतांतील साही जिल्ह्यांचे दारूचे मक्त अधिक पैसा देतील त्यांस दिले जातात. प्रत्येक जिल्ह्यांतील मक्तेदारांचीं वेटाळीं ठरीव असतात व त्यांच्या दारूच्या गुत्यांची संख्याही पूर्वींच नियमित केलेली असते. प्रत्येक जिल्ह्याचे मक्तेदार आपल्या सोयी प्रमाणें पोट मक्तेदार ठेवितात. दारू त्यांनीं पाहिजे तितकी तयार करावी आणि आपल्या ठिकठिकाणच्या दुकानांतून गिऱ्हाइकांस विकावी असा परिपाठ आहे. नवीन दुकानें डेपुटी कमिशनरच्या परवानगी वाचून उघडतां येत नाहींत व प्रत्येक वेटाळ्यांतील दुकानांची संख्या व विक्रीच्या अटी कायमच्या असतात तरी शिंदीची पिणे वाटेल तितकी तयार करितां येतात व त्याच्या किंमतीचेही निरख वाटेल त्या प्रमाणें

बदलतां येतात. मक्तेवाल्या खेरीज सरकारी हुकुमा व चू शिंदी तयार करणारे व विकणारे लोक फार थोडे आढळतात कांकीं अशा चोरांच्या कामावर पोलिसांची व मक्तेदारांची अशी दुहेरी देखरेख असते. लिलावासाठीं पडलेला पैसा, शिंदी तयार करण्याचे व विकण्याचे खर्च आणि त्या शिवाय या वर्ष भराच्या उद्योगा वरील खुद्द मक्तेदारांचा फायदा इतक्या बाबी निमित्त शिंदीच्या व्यापारावर पैसा वसूल व्हावयाचा असतो तेव्हां ज्या योगानें पुष्कळ शिंदी तयार होईल व तिची ताबडतोब विक्री होईल अशा प्रकारची व्यवस्था प्रत्येक मक्तेदाराला ठेवावी लागते. हा मक्तेदाराचा विचार झाला परंतु सरकाराचा विचार असा असतो कीं लोकांनीं मद्यप्राशन फार थोडें करावें आणि लिलावाचें उत्पन्न तर भारी झालें पाहिजे. सरकारच्या विचारापैकीं एक गोष्ट सिद्धीस जात आहे ती ही कीं लिलावाची दरसाल रकम अतिशय वाढत आहे ह्मणजे गेल्या बारा वर्षात हें वाढतें प्रमाण शेंकडा ४२९ हून ही अधीक झालें आहे. खजिन्यांत विपूल भर पडते परंतु सरकारचा लोक कल्याणाविषयीं विचार अंमलांत येत नाहीं इतकेंच नव्हे तर बहुतेक सर्व प्रकार त्यांच्या इच्छे विरुद्ध अगदीं जोरदार रितीनें घडून येत आहे. मक्तेदारानें लिलाव आपल्या नांवानें जिंकला ह्मणजे तो हरतऱ्हेनें आपली दारू खपवितो आणि तेणें करून मद्य प्राशनाचा फैलाव जबरदस्त करीत असतो. त्यानें तसें केलें नाहीं तर तो सफेठार बुडेल. त्याला वर्षाच्या मुदतींत आपला पैसा जमवावयाचा असतो आणि ज्या दिवशीं त्याची दारू पुष्कळ खपेल तो दिवस त्याचा खरा झाला व या प्रमाणें वर्षाचे ३६५ दिवस खरे करण्यासाठीं त्याला रात्रंदिवस खपावें लागतें. परंतु थोडा सूक्ष्म विचार केला ह्मणजे समजेल कीं त्याला फारसा व्याप करावा लागत नाहीं कांकीं व्यसनाकडे स्वाभाविक मनाची प्रवृत्ति असते तिला निरनिराळ्या सोयींनीं व युक्त्यांनीं चांगली गति मिळाली ह्मणजे पुरें आहे. तेव्हां सध्यांच्या सरकारच्या अबकारी खात्या पासून लोक मुक्तद्वार असल्या प्रमाणें स्वच्छंदानें मद्यपी बनत चालले आहेत. लोकांच्या नीतिमत्तेवर असा हल्ला पडत आहे व त्यांच्या शारीरिक संपत्तीचा ऱ्हास होत आहे ह्मणून सरकाराचे अधिकारी ही मोठ्या विवंचनेंत आहेत. अशा अधिकाऱ्यांत आमच्या वऱ्हाड प्रांतांचे कमिशनर रा. रा. टी. सी. ह्पोडन यांस आह्मी अग्रस्थान देतों. आज कित्येक वर्षापासून त्यांचा विचार या प्रकरणांत चालला आहे व त्या विषयीं त्यांनीं अलिशान रेसिडेंट साहेबाकडे एका निराळ्या प्रकारचा व्यवस्थेचा मसूदा पाठविला आहे आणि कदाचित् त्या प्रमाणें सुधारणा झाली तर अबकारी खात्यांतील सुधारणेचा पाया प्रथम वऱ्हाडांत घातला असें होईल.

अफू व गांजा यांचा निराळा लिलाव होतो आणि तो विकत घेणाऱ्यास सालीना १६ रुपयांची फी घेऊन अफू आपल्या पाशीं ठेवण्याचा व विकण्याचा परवाना मिळतो. व त्या बरोबरच गांजा विषयीं ही परवाना असतो. परवाना नसेल तर गांजाची पेरणी करितां प्रत्येक एकरा मागें दहा रुपये फी भरावी लागते. वऱ्हाडांत खसखस पिकविण्याची मनाई आहे ह्मणून इंदुर वरून या प्रांतांत अफूचा पुरवठा होत असतो. किरकोळ दुकानदारांस अफू पुरविण्याचा अधिकार वरील मक्तेदारास असतो. कमिशनर साहेबांच्या मतें हा शास्ता नीट नाहीं.

सन १८९०-९१ सालीं अबकारी खात्याचें उत्पन्न १६,४४,९६६ रुपये झालें आहे ह्मणजे आदल्या वर्षापेक्षां सरासरीनें सव्वा लाख रुपयानें वाढलें आहे. या उत्पन्नाच्या चढत्या प्रमाणावरून व अबकारी खात्याच्या भरभराटी वरून लोकांची सुधारणा होत आहे असें मानणें मोठी चूक आहे. अलिकडे उलटपक्षीं असें प्रत्यन्तरास आलें आहे कीं, दारू, अफू, गांजा वगैरे पदार्थ मनस्वी महाग पडत चालल्यानें अन्ना संबंधानें उपासमाराही पतकरून लोक आपल्या तलफे खातर व व्यसनाबद्दल पैसा खर्ची घालतात.

विलायती मद्य विकण्याचा परवाना मिळालेलीं दुकानें गतवर्षी सतरा राहिलीं. सरकारच्या फीचें उत्पन्न रुपये १७०० व्हावयाचें परंतु उमरावती डेपुटी कमिशनरच्या चुकीनें १६५० रुपये झालें.

अबकारी कायदा मोडल्या वरून १२५ जणांस पकडलें असून त्यापैकीं ९० जणांवर अपराध लागूं होऊन शिक्षा व दंड झाले. दंडाची रक्कम रु० १६२१-८ आणे गोळा झाली त्यापैकीं अपराधांची माहिती देणारांस २६७ रुपये बक्षीस देण्यांत आलें. हीं बक्षीसें फार स्वल्प असल्या कारणानें अपराधी लोकदृष्टीस येण्यास थोड्या तजविजी आहेत तरी एकंदरीनें अबकारी प्रकरणांत अपराध फार सूक्ष्म प्रकारचे असून त्याचें प्रमाण ही मोठें नाहीं.

देशी दारूचीं दुकानें १४२५ होतीं तीं १२३७ शिलक राही पर्यंत बंद केलीं त्यांत १५ अकोला जिल्ह्यांत व दीडशेंवर दुकानें पूर्व वऱ्हाडांतील उमरावती, इलिचपूर व वणी या तीन जिल्ह्यांत कमी करण्यांत आलीं आहेत ही आनंदाची गोष्ट होय. एवढी छाटाछाट होऊन दुकानांची संख्या गेल्या पंचवीस वर्षांतील संख्येच्या मानानें फार कमी असून ही मक्त्याचे लिलावाचा पैसा चालं व र्षाच्या आरंभीं ९४५७५ रुपयांनीं वाढला आहे ह्मणजे एकंदर साही जिल्ह्यांचा मिळून वसूल १३,८३,०९५ रुपये आला हें मोठें नवल आहे. लिलाव फुकारले त्यावेळीं मक्तेदारांमध्यें चढाओढ लागल्यामुळें ही रकम फुगली आहे, किंवा गेल्या दोन वर्षांत लोक पुष्कळ सधन व सुखी झाले ह्मणून लिलावांची किंमत फार चढली असें कारण दाखवितात. या दोन कारणांपैकीं पहिलें विशेष सयुक्तिक व खरें वाटतें.

ताडीच्या विक्रीचे मक्ते ४८ वेळीं मिळून ९८० दुकानासाठीं विकले गेले आणि त्यांचें उत्पन्न ४५६८० रुपये ह्मणजे २८५ रुपयांनीं कमीच आहे.

अफूच्या ही लिलावांत ६४३० रुपयांची तूट आली आहे ह्मणजे एकंदर उत्पन्न ३,००,४०० रुपये आहे. अफूचा साठा १८९०-९१ सालीं ५०८ मण १७ शेर असून गेल्या चार वर्षापेक्षां अदमासें ३० मणाहून कमी आहे. अफू खाण्याचे लोकांनीं कमी कमी केलें कीं काय बरोबर समजत नाहीं आणि खरोखरच तसा प्रकार घडत असल्यास आनंदाची गोष्ट आहे.

वऱ्हाडांत बुलढाणा, अकोला व मोर्शी या भागांत गांजा पेरला जातो तो १८८९-९० सालीं ६० एकर ३५ गुंठे होता त्या ऐवजीं १८९०-९१ सालीं अवघा ३५ एकर २५ गुंठे होता. कमिशनर साहेब बहादूरांचा विचार हा पेरा अजीबात बंद करण्याचा आहे परंतु आमच्या मतें लोकांस लागणाऱ्या मालाचा पुरवठा बाहेरून आणण्यापेक्षां प्रांतांतल्या प्रांतांतून झाला तर बरें. गांजाचें प्रकरण निजामसराकडे पाठविलें आहे आणि त्यांच्या दिवाणाकडून उत्तराची वाट पाहत आहों असें रेसिडेंट साहेब लिहितात. गांजाच्या प्रत्येक शेरा मागें २ रुपये या प्रमाणें वऱ्हाडांत उत्पन्न होणाऱ्या गांजावर नवीन कर बसवावा किंवा बाहेरून येणाऱ्या गांजावर जकात प्रत्येक शेरा मागें २ रुपया प्रमाणें बसवावी असा विचार घाटत आहे.

---

मुंबईंत 'ओरिआंटल लाईफ असुअरन्स' नांवाची आयुष्याचा विमा उतरणारी एक मोठी मंडळी आहे तिचा दुय्यम म्यानेजर शेट दोराबजी धनजी भाई सराफ यानें अडीच लाख रुपयांची अफरातफर केली असा त्यांजवर आरोप आला होता. कंपनीची तिजोरी त्यांच्याच ताब्यांत असे आणि ते खंडाळ्यास गेले असतां त्यांच्या ताब्यांतली तिजोरी तपासण्यांत आली त्यावेळी अडीच लक्ष रुपये कमी भरले ही गोष्ट तारीख १६ एप्रिलच्या सुमारास घडली. कृत पापाचा घडा भरला असें त्यांस वाटल्या वरून त्यानें पश्चात्तापाच्या आवेशांत आपला वरीष्ट म्यानेजर मि. स्लेटर यांजपाशी सर्व प्रकार पत्रानें कबूल केला. सुटकेची निराशाच वाटली, पापकर्माचा मनास त्वेष व तिटकारा आला, पश्चात्तापानें चित्तास वेदना होऊं लागल्या, व मनाच्या उद्विग्नावस्थेंत मि. स्लेटर यांच्या परम उपकारांचें स्मरण होऊन विश्वासघाताचा ससेमिरा मनोवृत्तींस अती भोंऊं लागला अशा पराकाष्टेच्या कल्पना तरंगानें उचंबळलेल्या पंगु मनुष्यस्वभावाला पारशी गृहस्थ वश झाले आणि त्या भरांत त्यांनीं लिहिलें कीं ही रक्कम मी लांबविली, मी आपल्या करण्याच्या बेतांत आहे, आपण ( मि. स्लेटर ) मजवर खटला केल्यास माझा कबुली जबाब मी देईन, वाटेल त्या शिक्षेला मी सिद्ध आहे, आपले उपकार न स्मरतां कृतघ्न बनलें, आपण अवधि दिल्यास मी सर्व रकम भरून देईन, उत्तर तारेनें न पाठवितां लखोट्यानें पाठवावें वगैरे.

एवढा भक्कम सबळ पुरावा कोर्टापुढें आणण्यांत आला तरी सदर्हु पारशी दोष मुक्त ठरले हें एकून आह्मी अगदी चकीत झालों. वरील पत्रांतील मजकूर मोघमांत होता ह्मणून अपराध शाबीत करण्यांत त्याचा उपयोग किंवा विचार न्यायाधिशानें व जुरीनें यथातथाच केला असावा असें दिसतें, जुरींतील नऊ असामी पैकी सहाजणांनीं त्यांस दोषमुक्त ठरविलें व न्यायाधिश बेलीसाहेब यांनीं त्यांचे अभिप्रायास अनसरून या खटल्याचा असा विलक्षण व आश्चर्यकारक निकाल फर्माविला.

लोकवदंता अनेक प्रकारच्या आहेत त्या साधारण कशा काय असाव्यात ही सहजी कल्पना करवेल त्या खऱ्या म्हणवत नाहीं तरी खोट्या आहेत असें ही सांगवत नाहीं. जूरी पैकीं सहाजणांच्या अभिप्रायांशी न्यायाधिशांनीं संमता प्रदर्शित केली किंवा नाहीं हें खात्रीपूर्वक कळत नाहीं. क्रिमिनल प्रोसिजरा अन्वयें जेव्हां जेव्हां जुरी पैकीं सहाजणा पासून अधिकांचें बहुमत न्यायाधीशांस पसंत नसेल तर तो जुरी रद्द करून पुन्हा दुसऱ्या जूरी समोर चौकशी करविण्याचा अधिकार न्यायाधीशांस आहे. आणि याच अधिकारा अन्वयें 'बंगावासी' पत्रा वरील खटला दुसऱ्या सेशना पर्यंत तहकूब केला होता. परंतु या खटल्याचें स्वरूप राजद्रोहा प्रमाणें भयंकर नव्हतें तरी न्यायाचा विजय होण्या साठीं कोणती ही गोष्ट तुच्छ नाहीं. असा कायदा असून ही नामदार बेली साहेबांनीं जुरींतील बहुमता वरूनच निर्णय केला या पासून लोकांनीं काय अनुमान बांधावें हें आह्मास सांगवत नाहीं.

सदर्हू खटल्याच्या प्रारंभीं आरोपीचे वकील मि. जार्डीन साहेब यांनीं कायद्याचा असा प्रश्न काढला होता कीं जो पर्यंत आरोपीवर अमुकच मितीस अशी अफरातफरीचा शाबिती झाली नाहीं तो पर्यंत अपराध लागूं होत नाहीं असा कलकत्ता हाय कोडताचे जज्ज नामदार प्रिन्सेप यांनीं ठराव केला आहे त्या अन्वयें मालि ट्रेड कंडता समोरील आरोपीच्या पूर्व चौकशींत तसा एख दा दिवस ठाम झाला नाहीं त्या अर्थी खटला तहकूब करावा. परंतु या मुद्यावर नामदार साहेबांनीं असा अभिप्राय दर्शविला कीं कलकत्ता हायकोर्टाच्या ठरावानें मुंबई हायकोर्ट कांहीं बांधलें गेलें नाहीं आणि विवक्षित तारीख शाबीत झाली नाहीं तरी एकंदरीनें सर्व आरोपांची एकवट शाबिती झाली म्हणजे पुरें आहे. आणि याच तत्वावर आरंभीं चौकशी पुढें चालविण्यांत आली. आरोपी तर्फे अखेरचें बचावाचें सभाषण झालें त्यांत विशिष्ट दिवस पुराव्या वरून मुकर झाला नाहीं असें दाखविलें होतें त्याचाच विशेष जोर ज्युरीच्या मतावर पडला असावा असा ही एक तर्क आहे. परंतु न्यायाधीशानीं निकाला पूर्वी जूरीला सर्व खटला संक्षेपानें व मुद्देशीर समजाविला त्या वरून वरील शंका येण्यास मोठेसें कारण वाटलें नाहीं तरी देखील न्याया करितां हा खटला पुढील सेशनावर दुबार चौकशी बाहीं टाकण्याचा न्यायाधीशांस अधिकार होता त्याचा उपयोग कां झाला नाही हें मोठें गूढ आहे. वरील कलकत्ता हायकोडताचा नियम मुंबईच्या गेल्या हायकोर्ट सेशनांत लागू केला असतां तर आमचे वऱ्हाडचे प्रसिस्ट कर्डीक हरबर्ट विंटन बेकर साहेब दोषमुक्त ठरले असते. सारांश खरोखर कायदा कलकत्ता हाय कोडताच्या निकाला प्रमाणें असेल तर तो अवश्यमेव दुरुस्त झाला पाहिजे.

---

## The Berar Samachar

**MONDAY, OCTOBER 5, 1891**

### CIVIL JUSTICE

( Concluded from our last )

In matrimonial suits in Berar the higher grades among the Hindu and Mahamedan societies present a high standard of morals while amongst the kunbies, many husbands and wives crowd together in our columns of notices and advertisements to claim a dissolution of marriage and have often filed suits in courts. With them marriage is more secular than religious and has lost a great deal of sanctity and

holiness attached to the conjugal rights.

Out of 25,754 suits instituted 72 per cent of litigation is for property of less value than Rs. 100. During the year 26,331 suits were disposed of so as to make the aggregate cost of them to the amount of Rs. 3,88,898 *i. e.* 14 per cent of the aggregate value of suits. In the interests of the poor litigants the present percentage of costs to value which is 26 for suits under Rs. 100 should be reduced at least to the extent of the average percentage in the aggregate number of suits ranging from Rs 10 to Rs. 10,000

With respect to the disposal of original suits the proceedings of the Resident has presented a summary in the following paragraph:—

Including suits pending from the previous year and re-admitted cases, the total number of suits for disposal during the year was 29,823, or an increase of 6.3 per cent. over the figure for 1889. Of this number, 26,331, or 88.3 per cent., were disposed of during the year. Contested cases and cases compromised rose by 1.5 and 2.2 per cent. respectively, while decrees *exparte* decreased by 2.4 per cent. The percentage of suits disposed of by arbitration has remained stationary, and seems to bear out the statement made by the Judicial Commissioner last year that arbitration before the court shows no sign of coming into favour. The number of cases pending at the end of the year under report was 3,491 against 3,377 at the close of 1889. In this respect the Amraoti district is again conspicuous for the number it had of cases pending over three months at the close of the year.

Colonel Mackenzie has creditably attemped to secure thorough work inspite of duration.

It is one of the demands of the National Congress that the Judicial and the executive branches should be separated and we think that their fusion into one has been noticed by Colonel Mackenzie as one of the defects which is emphasized by Sir Dennis in the following manner:—

The Resident joins in Colonel Mackenzie's regret that the law does not admit of the work of execution of decrees being placed in the hands of a special officer, who could give it his undivided attention. In the Punjab in former times Deputy Commissioners were ordered to make over the execution of decrees to a single officer, and, as it formed an important part of that officer's work, he set aside a certain portion of his time for dealing with it, and dealt with it in a regular and systematic manner; whereas, when each officer executes his own decree, he leaves the execution cases to be dealt with in odd scraps of time, or just as he is about to rise for the day.

The false sense of honour which is noted by Colonel Mackenzie amongst the people to apply for an insolvency certificate in real cases of bankruptcy, is ably portrayed in the Resident's review of the report. Every sentence of it we echo with feelings of disappointment at the ignorance of the masses marching on to break down under the burdens of their increasing debts.

"The Judicial Commissioner notices the objection natives have to take proceedings in bankruptcy, and expresses surprise at finding that, while tortuous proceedings to defraud creditors when proceedings are imminent are frequent, it is considered dishonourable to apply to be adjudicated an insolvent, even when the circumstances are such that according to our ideas, no dishonour would attach to such an application. This however is, in the Resident's experience, quite in accordance with what is observed in other parts of India. The natives of this country, at least those outside the highest business circles, are lamentably unpunctual in fulfilling their engagements; indeed, that a debtor will be very unpunctual is often fully contemplated by both parties when a debt is incurred; but, speaking generally, it is extremely repugnant to their nature to repudiate an engagement, and as an application to be adjudicated insolvent involves in their eyes a repudiation of all a man's engagements, it is always regarded as dishonourable. This strong sense of their obligations is, as far as it goes, in the highest degree creditable to them, but it would seem as if it rested to a considerable extent on some sort of conventional basis, which often gives way when the parties come to an open rupture and are pitted or likely to be pitted, against one another in our courts. Then there is war between them, and a war in which all things are considered fair... perjury, forgery and fraud of every description. It would be interesting to consider further the causes of this apparent inconsistency, but the discussion would be out of place in a review of this kind."

In regarded to the work of Appelate Courts "the Resident observes with surprise that out of a total of 205 appeals disposed of, the Judicial Commissioner confirmed only three cases without summoning the respondent. It is difficult to believe that if Colonel Mackenzie had perused the papers, calling for the files if necessary, when the appeals were first preferred, he would not have found many more cases which could have been disposed of in this way, and thus have saved much of his own time, and much trouble and expense to the parties. Sir Dennis Fitzpatrick also observes that the pending appellate file in the Judicial Commissioner's Court has increased, the institutions during the year having exceeded the disposals (258 against 205), but he is well aware that Colonel Mackenzie does not spare himself, and notes that, the most troublesome part of the legacy left by the old system having now been disposed of, Colonel Mackenzie believes he will get abreast of the work."

Colonel Rennick is singled out as the only Deputy Commissioner who has neglected inspection of cases decided by lower courts. In stead of offering excuses which his superiors hold as inadequate he can only make amends for the past by future improvement.

Sir Dennis Fitzpatrick has recorded with great delight his appreciation of the able and effecient administration of justice by Colonel Mackenzie and we hope the people of Berar who come in contact with him either direct or indirect will not hesitate in the least to endorse--if they be empowered to do so in a double seal the above opinion coupled with their high estimation of his soundness of principles, thoroughness of conduct and the well-regulated sympathies with the welfare of the subjects. Mr. Obbard, Officiating Civil and Sessions Judge has equally achieved good name for his austerity and unbiased strictness in wielding the enormous technicalities of advancing knowledge consistently with the true and wide doctrines of justice and sound policy. The Judicial Commissioner has eminently brought to the notice of the resident the good work of Mr. Jones the Superintendent of his office and the outturn and quality of work worth special approval effected by the following gentlemen as judges of civil tribunals:...

Messrs. Ambadas Santo, Captain Davies, Azizudin, Deorao Jeykrishna, W. N. Bapat, O'Grady, Mubarak Ali, E. Sanjana, Suraj Narrain, Govind Raj.

---

The Marquess of Dalhousie is one of the heroes in the series of the 'Rulers of India' edited by Sir William Hunter. In that book appears the following remark in regard to the rendition of Berar:—

The Assigned Districts have so prospered under British rule and have been so long accustomed to consider themselves entitled to the benefits of British rule, that their eventual rendition to the Nizam is now regarded as one of the difficult questions in Indian politics.

That question, however, was not raised by Lord Dalhousie. It is essentially the product of the improved position of the Nizam in our own days. This improvement has been greatly facilitated by Lord Dalhousie's arrangement for securing the maintenance of order at Haidarabad by a body of drilled troops, not directly dependent on the Haidarabad Treasury for the regularity of their pay. The perpetual financial strain of the years preceding that arrangement has disappeared in the Nizams dominions.

We don't perceive any of those difficulties that lie in the path of Indian politics. We were on the contrary assured by Mr. J. K. Cross (now Lord Cross) some seven years before that though the time was not proper to open the question then it would come on the fulfilment of some prospective event.--- In the House of Commons Mr. J. K. Cross alluded to the members of the Council of Regency at Hyderabad. "The question of whether they would be permitted to urge the claims of the Hyderabad state to the restoration of its Berar Provinces by constitutional means could not be considered till after the Nizam comes of age, and they would be in a position to judge what the character of the future administration of the Nizam's territories would be."

It is certainly then high time that the question of restoration should once for all be settled.

---

## वऱ्हाड.

हवामान—मागील आठवड्यांतील हस्ताच्या पाऊसानें फार बहर करून दिली. पिकें उत्तम स्थितींत आहेत. पाऊस वेळेवर व बेताचा पडल्या मुळें रब्बीचें पिक उत्तम येईल. गेल्या सोमवार पासून पर्जन्य बंद आहे व हस्तांचें ऊन ही फार कडक पडतें. रोगराई कांहीं नाहीं.

हस्त नक्षत्राच्या अति वृष्टीमुळें नदी तटाकाच्या शेतांचें नुकसान बरेंच झालें. व 'केळीवेकी' करही आपले पत्रव्यवहारांत असेच कळवितात. ज्यांचे पाउसामुळें नुकसान झालें अशां गरीब शेतकऱ्यांस सरकार सारा माफ करील काय? आमच्या दयाळू सरकारास कांहीं कींव येते कां. पाहावें; लोकांनीं मात्र कमिशनर साहेब बहादूरा कडे अर्ज करण्यास चुकूनये

मि० जी० के० वाटस् पब्लिक वर्कस खात्यांतील रसिडेंटचे अ० सेक्रेटरी यांची बदली मणिपुरास झाल्या मुळें त्यांचे जागीं मि० स्पिनरटन, आफिशिएटिंग ए० ईजिनिअर पूर्व वऱ्हाड यांस नेमिलें.

उमरावतीस चालू आठवड्यांत पोलीस खात्यांतील चीफ कानस्टेबल लोकांची परीक्षा होणार आहे.

'प्रमोदसिंधु' कर्ते लिहितात कीं वणी जिल्ह्यांत येणाऱ्या व तेथून जाणाऱ्या मालाची नोंद ठेवण्या करितां वर्धा नदीच्या कांठानें दहा नवीन नाकीं बसविलीं असून त्यावर दहा कारकून व दोन इनस्पेक्टर यांची देखरेखीं साठीं नेमणुक झाली आहे.

अकोट तालुका बोर्डा तील जुन्या चार सभासदांच्या ऐवजी नवे चार गृहस्थ नेमावयाचे आहेत त्यांची निवड चालूं महिन्याच्या अखेरीस तहशील कचेरींत होणार आहे.

गेल्या चोविसावे तारखे पासून पांच दिवस एक सारखा उमरावतीस पाऊस पडत होता तेथील काळ्या पाण्याच्या तलावांत म्हणजे ज्या तलावांतून शहरांत नळाचें पाणी आणलें आहे त्या तलावांत पूर्वी २३॥ फूट पाणी आलेलें होतें. गेल्या चार दिवसांत पावसानें. आणखी सुमारें ११ फूट पाणी वाढलें. आतां जवळ जवळ ३५ फूट पाणी आहे यंदा उमरावती शहरांत पाण्याचा दुष्काळ पडेल असें सर्वांस वाटत होते परंतु आतां सुकाळ झाला आहे. गुदस्त सालीं याचें वेळेस फक्त २८ फूट पाणी तळ्यांत होतें एक साल पुरलें तेव्हां हल्लीं आलेलें पाणी १९ महिने पर्यंत पुरेल असें वाटे.

---

### नोटीस.

रुखमी मर्द मारुती तेली राहणार निंबगांव तालुके मलकापूर इजला माधव वल्लद राघोजी तेली व कानू वल्लद यादव तेली या उभयतां कडून नोटीशीनें असें कळविलें जातें कीं तुझा नवरा मारुती हा मयत होऊन आज सुमारें दोन महिने होत आले त्याचा स्थावर जंगम जिनगी, वैरखऱ्या, कर्ज देणें घेणें व मुलांचें लग्न करणें व तुजला उपवस्थेनें अन्न वस्त्र देणे याज बद्दलचें सर्व तऱ्हेचें आम्ही जबाबदार आहों. आमच्या संमती शिवाय तुजला कोणची ही भानगड करितां येत नाहीं असें असून जर तू कोणाच्या ही सल्यानें दुसरा घरठांव करशील तर तुझा कोणचे ही प्रकारचा हक्कसंबध आमच्यांशी बिलकुल राहणार नाहीं व तुला कांहीं एक मिळणार नाहीं म्हणून दिल्ही नोटीस सही तारीख ४ अक्टोबर सन १८९१ इ.

सहाची निशाणी

माधव वल्लद राघोजी तेली व कानू

वल्लद यादवजी तेली राहणार

निंबगांव तालुके मलकापूर

याच्या हातची असे.

---

### जाहिरात

सर्व लोकास या जाहिरातीने खाली सही करणार याज कडून असें कळविलें जातें कीं निंबगांव नांदुरा तालुके मलकापूर येथील शेत सर्वे नंबर ६८ पैकीं एकर ७८१६ आकार १३८१२ हें माझे वडिलांचे नांवें होतें ते मरण पावल्यावर मी व माझा पुतण्या अज्ञान असल्यामुळें सदर्हूचें खातें माझा भाऊ मारुती वल्लद यादव यांचे नांवें लागलें. तो हल्लीं मरण पावला त्यांची वारस बायको रखुमाबाई ही पाटाचा नवरा करून जाणार तरी सदर्हू शेत कोणीही गहाण अगर खरेदी घेऊं नये शिवाय कोणत्याही प्रकारची जंगम जिनगी तिच्या पासून खरेदी अगर गहाण घेंऊं नये. कोणी घेतल्यास त्या बद्दलचे नफा नुकसानीं संबंधानें आमच्याकडे बिल्कुल जबाबदारी नाहीं म्हणून दिल्ही जाहिरात सही तारिख ४।१०।९१

सहीची निशाणी माधव वल्लद राघो-

तेली राहणार निंबगांव ता-

लुके मलकापूर.

---

## वर्तमानसार.

देऊं केलेला हिरा न देतां घेतलेले २३ लाख रुपयेही देत नाहींत अशा बद्दल निजामानें जेकब याच्यावर केलेल्या फिर्यादीची चौकशी कलकत्त्याच्या माजिस्त्रेटापुढें चालूं असून खटल्यांत निजामाची साक्ष कामिशन पाठवून घण्याचें ठरलें व निजामाच्या साक्षीच्या वेळीं तो अस्सल हिरा निजामास दाखविण्याकरितां हैद्राबादेस हजर ठेवणें अवश्य आहे असें ह्मणण्यांत आल्यावरून तो ४६ लाख रुपये किंमतीचा हिरा हैद्राबादेस कसा पाठवावा हा माजिस्त्रेटास मोठी अडचण पडली आहे. विमा उतरून पाठवावा किंवा या बरोबर मजबूत पहारेकरी देऊन पाठवावा तर तसें करण्यास आपल्या जवळ तेवढी रकम नाहीं. असें माजिस्त्रेटाचें ह्मणणें असून तो हिरा ज्या ब्यांकेच्या ताब्यांत आहे ती ब्यांक किंवा आरोपी जेकब हे आपल्या जबाबदारीवर तो हिरा तिकडे पाठविण्यास तयार नाहींत. हिरा निजामास साक्षीच्या वेळीं दाखविलाच पाहिजे असें निजामाच्या वकिलांचें ह्मणणें असून तो तिकडे पाठविण्या करितां एक कवडीही आह्मी खर्च करणार नाहीं असं तो ह्मणत आहे. पुऱ्या बंदोबस्ता वांचून हिरा पाठविला तर वाटेंत कदाचित दंगा होउन चोरीस जाईल व त्याची जबाबदारी आपणावर पडेल असें माजिस्त्रेट वगैरेचें मत आहे. या प्रश्नाचा निकाल अजून व्हावयाचा आहे. कांटीस सोनें बांधून इंग्रजी राज्यांत हवें तिकडे फिरावें अशी जर इंग्रजी राज्यव्यवस्था आहे तर हिरा तिकडे पाठविण्यास इतकी अडचण कां तें समजत नाहीं.

सिंगापूर येथें वर्तमानपत्रें बिनहाशिलाचे पोष्टांतून हवीं तिकडे रवाना करतात व तीं कितीही वजनाचीं असलीं तरी चालतें असें सांगतात.

हिंदुस्थानची वाईट स्थीति होण्यास स्त्रिया कारण नसून जातिभेद कारण आहे असें ता. २३ रोजीं हैद्राबादेस भरलेल्या एका सभेंत धार्मिवंत कालेजाचे प्रिंसिपाल मि. वासुदेवराव बी. ए. यांनीं व्याख्यान दिलें. या रावांचे हे विचार त्यांस शोभणारेच आहेत.

अघटित कृत्य— सेन्ट क्लेर नावाच्या नदी खालून आगगाडी नेण्याकरिता अमेरिकन सरकार जो एक बोगदा तयार करीत होते तो पुरा होऊन त्यांतून आगगाडी जाण्याची सुरुवात झाली. या बोगद्याची रुंदी २० फूट असून लांबी ६,००० फूट आहे! आतां खालीं आगगाडी व डोक्यावर नदी व त्या नदींत मोठालीं जहाजें असा प्रकार झाला. आमच्या सुधारकांस असल्या गोष्टी ऐकून काय वाटतें कोण जाणें.

आफ्रिकेंतल्या मूर्ख शिद्यांनी जर्मनीचा जो पराभव केला त्यांत जर्मनीच्या अर्ध्या फौजेची कत्तल केली असें तारीख २१ ची तार सांगत्ये.

ईस्ट इंडियन रेलवेनें सर्व लोकांच्या सामानावरचा दर कमी करावा या शर्तीवर सरकारनें सामान दर मैलास दर मणी एका पैचा दहावा हिस्सा भाडें घ्यावें असें ठरलें असल्याचें सांगतात. चांगलें आहे.

इम्पेरियल इन्स्टचट फंडास पांच वर्षे पर्यंत दरसाल १०,००० रुपये प्रमाणें देण्याचें विलायतेंतल्या इंडिया आफिसानें ठरविलें आहे. पैसा विलायती खजिन्यांतला नसून हिंदुस्थानच्या खजिन्यांतला व हिंदुस्थानच्या लोकांपासून वसूल केलेलाच ना?

चिरुटाचें एक शेवट पेटवून दुसरें शेवट तोंडांत धरून ओढण्याची चहूंकडे चाल आहे पण आफ्रिकेच्या कांहीं भागांत पेटविलेलें शेवट तोंडांत धरून ओढण्याची चाल आहे असें सांगतात.

रशियाच्या पामीर येथील गडबडी बद्दल हिंदुस्थान सरकारानें सावध असावें असें ता. २५ च्या विलायतच्या टाइम्स पत्रांत सुचविलें आहे.

मद्रासेंत जो हल्लीं दुष्काळ आहे त्यामुळें त्या इलाख्यांतल्या जमीनधारा १३ लक्ष ५०,००० वसूल होणार नाहीं असा अदमास काढला आहे.

कामुकी शिक्षा—सरकारी पैसा खाल्ला अशाबद्दल झालेला एक खटला कबूलच्या अमिरापुढें इन्साफास आला असतां, कैदीनें शास्त्राची आज्ञा तोडली ह्मणून त्याच्या जिभेस सुयांनीं भोकें पाडण्याचा हुकूम केला व तो अमलांत आला! आह्मा इंग्रजी अमलांतल्या लोकांस या शिक्षा फार भयंकर वाटतात.

ईस्ट आफ्रिकेंतल्या कांहीं भागांवर जर्मनलोकांनी आपला कबजा केला असून त्यांतील लोक अगदीं बिथरल्यासारखे दिसत असल्यामुळें लवकरच हातघाईवर येण्याचा रंग दिसत आहे. त्या सुशिक्षित जर्मन लोकांची संगत त्या वेड्या शिद्यांस आवडत नाहीं वाटतें. आवडत नसेल तर ते वेडेच ह्मणावयाचे.

आस्त्रियनसरकार आपल्या लढाइखात्याच्या खर्चीकडे दोन कोट रुपये जास्त मंजूर करीत आहे. कारण काय?

स्पेनदेशांत महापुरानें एक कोट रुपयांचें नुकसान झालें. ह्मणजे एवढी रक्कम समुद्रास तृप्त्यर्थ झाली.

हिंदुस्थानसरकार सरहद्दीवरचा आरला तोफखाना वाढविण्याच्या विचारांत आहे. हें सरहद्द प्रकरण असल्यामुळें, कारण काय असें विचारण्याचा अधिकार नाहीं.

सीकीम तिबेट तहाप्रमाणें, दार्जिलिंग येथील चिनी वकिलाशीं बोलणें झाल्यावरून नाटंग येथें पाहारा ठेवावा याबद्दल विचार चालूं झाला आहे असें सांगतात.

काश्मीर व गिल्जित यांच्या दरम्यान तारायंत्र सुरू करण्याचा उद्योग चालूं आहे.

ब्रह्मदेशांतली रेलवे वाढविण्याचा विचार चालूं आहे

इंग्रजानीं आपलें ठाणे इजिप्तमधून काढावे अशाबद्दल तुह्मी उचल करा असें रशिया व फ्रांन्स यांच्या वकिलांनी इजिप्तच्या खेदिवाच्या मागे झुटणें लावलें आहे असें सांगतात. टर्कीच्या मागे लागले असून आतां खेदिवाच्या मागेही लागले, पण त्यात त्यांस काय मिळणार? दुसऱ्यांचें बरें पाहवत नाही ह्मणतात तें हेंच. त्यांत राहिनात बिचारे इंग्रज. त्यांच्या बापाचं काय जातें.

महमदन कालेजांस मदत मागण्याकरतां सरसय्यद अहमदन हे निझामसरकाराकडे आले होते निझाम हे त्या कालेजांस आजपर्यंत दरमहा १००० रुपये देत होते सर सय्यद यांच्या विनंतीवरून निझामांनी आपली ती देणगी आतां दुप्पट केली आहे. फार चांगले केलें.

डार्डेनेल खाडीतून रशियाच्या गलबतास जाण्याची परवानगी मिळाल्यावरून युरोपांत बरीच चळवळ सुरू झाली आहे. ती परवानगी देण्यांत टर्कीनें चूक केली व आपली योग्यता राखण्याकरतां ती त्यानें सुधारणें अवश्य आहे; खंडणी वगैरेच्या कारणानें टर्कीचा निरुपाय झाला असला तरी, सर्व राष्ट्रांनी मिळून जर तो तह केलेला आहे व रशियाच्या या करण्यानें मोडला जात आहे तर सर्वांनीच त्याकरतां झटलें पाहिजे. जें काम सर्वांचे ते कोणाचेच नव्हे या प्रमाणें हल्लीचा प्रकार चालला आहे व तो वाईट आहे असें या ओरड करणाऱ्यांचें ह्मणणे आहे. ठा० अ०

युरोपांत लढाईची सुरवात होण्याचा रंग दिसत असल्यामुळें ब्रिटिश क्याबिनेटनें सुएझ कालवा बंद करून केपकडील जुन्या मार्गानें हिंदुस्थानास नेहमीं कुमक पाठविण्याचें ठरविलें. कदाचित् हिंदुस्थानास सैन्य लवकर पाठवितां यावें ह्मणून केप टाऊन येथें कायमची मोठी छावणी ठेवतील मग आला खर्चाचा विचार! व तो बोजा हिंदुस्थानावर बहुतकरून विलायत सरकार बसविणार. वास्तविक पाहतां ब्रिटिश लोकांच्या तेथील वसाहती, कालनी केप गव्हर्मेंट यांना त्यांचा फायदा होणार; करितां तिकडील सरकारानेंच हा खर्च सोसला पाहिजे हिंदुस्थान सरकार कंबर बांधूनही आह्मांवरील खर्चाचा घोंड दूर करते कां पहावें!

मध्य एशियांतल्या लोकांचीं मनें रशियास अनुकूल अशी व्हावी या करितां त्याभागांत मर्व्ह, सारक, चारजुई व किझिलसर या ठिकाणीं रशियन सरकार शाळा स्थापन करीत आहे. हिंदुस्थानांत शाळा घालण्याचा इंग्लंडचा हाच उद्देश नसला तरी परिणाम तसा झाला आहे यांत कांहीं शंका नाहीं.

स्त्रियांनीं नथा घालूं नयेत असा मुंबईच्या कच्छी मारवाड्यांनीं नियम केला आहे. क० त०

निजामांच्या राज्यांतील मि० वाटस् नांवाचें इंजिनियर मणीपूर संस्थानांत रस्ते करण्याच्या कामावर निघालें! आतां मणीपूरांत युरोपियन कामगारांचें चंमाण आहे.

माजिस्त्रेटास मार—अलाहाबादचे आनररी माजि० लाला जगत नारायण हे गेल्या शुक्रवारीं कचेरीतून आपल्या घरीं जात असतां त्यांस एका मनुष्यानें रस्त्यांत बेदम मार दिला— लखनौ आडव्होकेट

हिंदुस्थानचे गवर्नर जनरल साहेब या महिन्यांत काश्मिरांत जाणार ते तेथील महाराजांस पुर्ववत् अधिकार देण्याकरितां जाणार अशी आनंदकारक बातमी आहे.

अभिमान काय करणार नाहीं? गया येथें गेल्या जुलईत ज्या गाईवरून हिंदु मुसलमानांची हाणमार झाली, ती गाय दंग्यांच्या वेळी पोलीसाच्या ताब्यांत देण्यांत आली होती पुढें त्या गाईबद्दल तंटा पडून शेवटीं ती विकून टाकण्यास मुसलमानांनीं हल्ला दिला. त्या वरून हिंदुलोकांनीं ९०० रु० स ती गाय विकत घेतली! ही गाय पूर्वी ६ रु० किंमतीची होती असें समजतें!! ही जी १५० पट किंमत वाढली, ही केवळ हिंदुलोकांच्या धर्माभिमानाची किंमत आहे असाच अभिमान पाहिजे. स० शो०


HEALTH, WEALTH & PROSPERITY.

जी. बी. नाईक कंपनीच्या

## विजेच्या आंगठ्या पुतळया.



खोटा माल घेऊन फसूं नका. खात्रीचा माल घेऊन अनुभव पहा

प्रत्येक वस्तूवर G. B. N. अक्षरें पहा.

### ५०००० वर विकल्या

रक्त हें मनुष्याचें जीवित्व आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.

जग प्रसिद्ध आहे कीं, सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोगांवर करितात. ज्याच्या आंगात शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यास विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला. व त्या पासून पुष्कळ अजारी मनुष्यें औषधोपचाराशिवाय बरीं झालीं आहेत. या विषयीं हजारों डॉक्टर साक्ष देतील.

रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग ह्या लहानशा व्यापारी पासून बरे होतात. संधिवायू, शिरांगत वायू, ठणका, हृदयांतील दुःख, कंबरेंतील दुःख, व्रण किंवा सूज, भोवळ, पुरुषत्व भंग, अशक्तपणा, स्त्रियांचे, रोग, काळजाचे दर्द, ज्वर, अर्धशिशी, मूत्राशयांतील रोग, मस्तक शूळ, मूळव्याध, आणखी इतर होणारे रोग देखील निवारण केले जातात. अशी गुणकारी, सर्व रोग शमन करणारी, आंगावर सुशोभित दिसणारी ही सर्वां जवळ असावी हें योग्य आहे. ही व्यापारी एकदां घेतली ह्मणजे आयुष्य भराची खटपट चुकली.

गुणाबद्दल हजारों दाखले मिळाले आहेत व मिळत आहेत.

किंमत दर पितळी आंगठीस रु० १॥ व पुतळीस १॥, चांदीचे आंगठीस रु० ३ व पुतळीस रु० २, सोन्याचे आंगठीस रु० २०; पुतळीस रुपये २२; एक डझन घेणारास एक नग ज्यास्त मिळेल. एकापासून सहा नग पर्यंत ट० ह० रुहा आणे. रोख दाम असल्यास किंवा व्ही० पे० नें मागविल्यास पाठवूं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवा. विशेष माहिती करितां अर्धीआणा पाठवा.

विकत मिळण्याचा पत्ता—मुंबई—भायखळा दावणी समोर. व पुणें—बुधवार चौकांत. जी. बी. नाईक आणि कंपनी, दावणी समोर भायखळा मुंबई.


☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास.................................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ..........०१

Rs.
per annum in advance 5 Postage 13 a
Per annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy...........................................4as

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXV AKOLA MONDAY 12 OCTOBER 1891 NO 40

वर्ष २५ अकोला सोमवार तारीख १२ माहे आक्टोबर सन १८९१ इ० अंक ४०

HEALTH, WEALTH & PROSPERITY.

जी. बी. नाईक कंपनीच्या

### विजेच्या आंगठ्या पुतळ्या



खोटा माल घेऊन फसूं नका. खऱ्याचा माल घेऊन अनुभव पहा

प्रत्येक वस्तुवर G B. N. अक्षरें पहा.

### ५०००० वर विकल्या

रक्त हें मनुष्याचें जीवित्व आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.

जग प्रसिद्ध आहे कीं, सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोगांवर करितात. ज्याच्या आंगात शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यास विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला. व त्या पासून पुष्कळ अजारीं मनुष्यें औषधोपचाराशिवाय बरीं झालीं आहेत. या विषयीं हजारों डॉक्टर साक्ष देतील.

रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग ह्या लहानशा ब्याटरी पासुन बरे होतात. संधिवायु, शिरांगत वायू, ठणका, हाडांतील दुःख, कंबरेंतील दुःख, व्रण किंवा सूजभावळ, पुरुषत्व भंग, अशक्तपणा, स्त्रियाचे, रोग, काळजाचे दर्द, ज्वर, अर्धशिशी, मूत्राशयांतील रोग, मस्तक शूळ, मूळव्याध, आणखी इतर होणारे रोग देखील निवारण केले जातात. अशी गुणकारि, सर्व रोग शमन करणारि, आंगावर सुशोभित दिसणारी ही सर्वां जवळ असावी हें योग्य आहे. ही ब्याटरी एकदां घेतली ह्मणजे आयुष्य भराची खटपट चुकली.

गुणाबद्दल हजारों दाखले मिळाले आहेत व मिळत आहेत.

किंमत दर पितळी आंगठीस रु० १॥ व पुतळीस १।, चांदीचे आंगठीस रु० ३ व पुतळीस रु० २, सोन्याचे आंगठीस रु० २०; पुतळीस रुपये २२; एक डझन घेणारास एक नग ज्यास्त मिळेल. एकापासून सहा नग पर्यंत ट० ह० सहा आणे. रोख दाम असल्यास किंवा व्ही० पे० नें मागविल्यास पाठवूं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवा. विशेष माहिती करितां अर्धाआणा पाठवा.

विकत मिळण्याचा पत्ता—मुंबई—भायखळा दावणी समोर. व पुणें—बुधवार चौकांत जी. बी. नाईक आणि कंपनी, दावणी समोर भायखळा मुंबई.

### नोटीस

टुण्या वल्लद बेंद्राजी बेलदार राहणार भांबोरे तालुके दर्यापूर यास नोटीस देणार रुपी मर्द टुण्या हल्लीं राहणार कठार तालुके अकोले हीनें असे कळवितें कीं तुझ्याशीं माझें लग्न होऊन आज समारें वर्षें १२ बारा झालीं ह्या बारा वर्षांत तूं मजला चार पांच वर्षें रीती प्रमाणें वागविलेंस व तुझ्या पासून एक मूलही झालें नंतर तूं मजला विनाकारण मारहाण करीत गेलास व मजला तू माहेरी आणून पोहोचती केलीस व त्या दिवसा पासुन आज पावेतों अदमासें नऊ वर्षें होत आलीं. मजला तू घेऊन जाऊन घर संसार करून राहावें अशा बद्दल चार पांच वेळा खटपट केली व तुजला एक वेळा माझे माहेरीही आणले. परंतु तू मजला घेऊन गेला नाहींस. व माझे पोटापाण्याची कांहींच तजवीज करीत नाहींस आज नऊ वर्षें मी तुझे नांवावर कर्ज काढून आजपावेतों दिवस काढिले अतां मजला कर्ज मिळत नाहीं व तु घेऊनही जात नाहींस. याजकरितां तजला ह्या नोटिशीनें असें कळविलें जातें कीं. नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत मजला घेऊन जावें. व नेतवेळीं आज पावेतो कर्ज काढून खाल्लेले रुपये ४५० दर वर्षास रुपये ५० प्रमाणें खावटी द्यावी. व चार जातभाई पंच याची खातरी करून द्यावी कीं तू मजला चांगलें रीतीनें वागवून घर संसार करशील वगैरे. असें केलें नाहीं तर हीच तुझी सोडचिठ्ठी समजून खावटीचे रुपये बद्दल व ह्या नोटिशीचे खर्चा बद्दल दावा करून रुपये घेतले जातील. व मी दुसरा घरठाव करीन मग तुझा माझेवर कोणचे ही प्रकारचा हक्क नाहीं ह्मणून ही दिली नोटीस कळावें. ता. ५ माहे आक्टोबर सन १८९१ इसवी.

सहीचा निशाणी बांगडी.

रुपी मर्द टुण्या बेलदारीण राहणार कठार हिच्या हातची असे

वऱ्हाडसमाचार

मिति आश्विन शुद्ध १० शके १८१३

## फौजदारी खात्याचा रपोट

वऱ्हाडच्या फौजदारी खात्याच्या रपोटावरून कळतें कीं, मागीलसालीं (१८९०) ७२ म्याजिस्ट्रेट ह्या प्रांतांत अधिकारावर होते व १८८९ सालीं ५७ होते गत सालीं १८०८८ फौजदारी खटले कोर्टासमोर आले व ते तिगस्तां पेक्षां १०१३ नीं कमी होते. ह्या वरून असें सहज लक्षांत येईल कीं, खटल्याची संख्या कमी व त्यांचा निकाल करणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या जास्त. ह्या १८०८८ खटल्यापैकीं ४००९ खटल्यांच्या फिर्यादी खोट्या अथवा बिन पुराव्याच्या ह्मणून काढून टाकण्यांत आल्या. ह्मणजे रपोर्टाच्या सालीं लोकांना व त्यांच्या कुटुंबांतील माणसांना पोलिसाकडून विनाकारण त्रास देण्यांत आला. पोलिस कामगारास यमदूतांची संज्ञा देण्यांत येते तो सार्थ आहे असें कां ह्मणू नये; ह्या खोट्या फिर्यादी पैकीं आठशें फिर्यादी पोलीस खात्यानें काढून घेतल्या आहेत. सरकारी नोकरशीं अधिकारावर असतांना बेपरवाईचें अथवा दांडगाईचें वर्तन ठेविल्या बद्दल १६७ लोकांवर फिर्यादी करण्यांत आल्या. ह्या ३३९ नीं तिगस्ता पेक्षां कमी होत्या ही मोठी आनंदाची गोष्ट आहे तरी वऱ्हाड सारख्या प्रांतांत १६७ वेळां सरकारा विरुद्ध लोकांस वागण्याचा प्रसंग यावा ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. वाशिमचे डे. क. साहेब ह्मणतात तिकडे सर्व अधिकाऱ्यांचें लक्ष जाऊन त्यांनीं आपल्या हाता खालील अम्मलदारांस जर लोकांवर विनाकारण जुलूम न करण्या बद्दल ताकीद दिली तर अडाणी लोकांवर मोठे उपकार होणार आहेत. आसाहेबांचें असें ह्मणणें आहे कीं, जप्तीकारकून लोक जेव्हां माल जप्त करण्याकरितां जातात तेव्हां कांहीं विचार न करितां धनको जो माल दाखवील तो जप्त करितात. मारवाड्यांसारखे धनको लोक रिणकोच्या कर्जाची सव्याज फेड व्हावी ह्मणून त्याच्या आप्तवर्गीयांचा अथवा शेजाऱ्या पाजाऱ्यांचा माल त्याच्या ताब्यांत असेल तर तो त्याचाच आहे असें सांगण्यास कधींही कमी करणार नाहींत; व त्या मुळें विनाकारण नुकसान होतें ह्मणून गरीब व अडाणी लोकांकडून कायद्या विरुद्ध वर्तन घडणें साहजिकच आहे. तेव्हां माल जप्त करितांना विशेष खबरदारी घेण्यांत आली तर लोकांवर महत उपकार होणार आहेत.

गत सालीं २५ खून झाले व ते तिगस्ता पेक्षां आठांनीं कमी होते. २२२३ चोऱ्या झाल्या व तिगस्तां २३१७ झाल्या होत्या. आमचे डेपुटी कमिशनर साहेबांचें (मि. निकोलेट) असें ह्मणणें होतें कीं, उडाणटप्पु अथवा भिकारी लोकांबद्दल नेटीव लोकांचा समज युरोपियनापेक्षां अधिक पूज्य असल्या कारणानें रिकाम टेकड्या लोकांस योग्य शासन मिळत नाहीं. याची मि. ऑबर्ड साहेबांनीं योग्य चवकशी करून असें ह्मटलें आहे कीं, तपासलेल्या बत्तीस खटल्यापैकीं एक ही खटला नेटिव्ह म्याजिस्ट्रेटानें सोडलेला नाहीं. जे कांहीं खटले सुटले आहेत ते मि. डेव्हीस साहेबांनीं सोडलेले आहेत व त्या साहेबाला आमचे डे. क. साहेब नेटिव्हांत गणणार नाहींत अशी मि. आबर्ड यांची खात्री आहे. 'आधींच उल्हास आणि त्यांत फाल्गून मास' ह्या ह्मणी प्रमाणें अगोदरच नेटिव्ह लोकांबद्दल कळकळ फार व त्यांत ब्राह्मणांची म्याजिस्ट्रेटांत संख्या विशेष मग काय विचारावयाचें आहे! परंतु मे. मेकेंझी साहेबानीं आमच्या जिल्हा पतीची चांगली कान उघाडणी केली आहे व ते स्पष्ट ह्मणतात कीं, डेपुटी कमिशनर आपल्या कामाकडे मुळींच लक्ष पुरवीत नाहींत. व रपोटा सारखीं महत्वाचीं कामें कारकून लोकांकडून उरकून घेतात. आसाहेबांनीं असेंही ह्मटलें आहे कीं, एक तर लिहिलेला रपोट मि. निकोलेट साहेबांच्या हातचा नसला पाहिजे, व जर तो त्यांच्याच हातचा असेल तर त्यांनीं नेटिव्ह म्याजिस्ट्रेटाबद्दलचे केलेलें विधान चुकीचें व अक्षम्य होय. आमचे डे. क. साहेब अझून तरी जागे होऊन 'नावडतीचें मीठ आळणी' अशा तऱ्हेनें वागण्याचें सोडून देवोत ह्मणजे झालें.

वऱ्हाडांत सोळा आनररी म्याजिस्ट्रेट आहेत त्यांनीं २४३६ खटल्यांचा निकाल केला. श्रीमंत व घरंदाज लोकांस हे अधिकार मिळत असतात. परंतु त्यांच्या विद्वत्तेकडे विशेषसें लक्ष दिलें जात नाहीं. अशा लोकांच्या हातात फौजदारी खटल्याचे अधिकार देणें मोठ्या धोक्याचें आहे हें येथें नव्यानें सांगितलें पाहिजे असें नाहीं अशा लोकांपासून सुरळीत काम करून घेण्यास एकाच व्यक्तीवर हा अधिकार न सोपवितां एकाच गावांत दोन किंवा अधिक घरंदाज लोकांच्या हातांत हा अधिकार असावा व गांव पंचांप्रमाणें एक मेकांच्या संमतीनें खटल्याचे निकाल होत जावे ह्मणजे अन्याय होण्यास मार्ग कमी सांपडतील.

गोर काय बाळांच्या लीलेंत आजपर्यंत गरीब बिचाऱ्या नेटिव्हांचे कित्येक प्राण खर्ची पडले असून त्याबद्दल कोणासही योग्य शासन होऊं नये या सारखी इंग्रजासारख्या न्यायीं ह्मणविणाऱ्या राज्यास दुसरी लज्जास्पद गोष्ट कोणतीही नसेल. हीं लाडकीं बाळें धडधडीत खून करीत असून कोणत्या तरी निमित्तानें दोषमुक्त होतात हा धडधडीत अन्याय आहे असें समजून सरकारानें शिकारी करितां देण्याच्या परवान्यांत कांहीं फेरबदल करावे अशी एकानें सूचना केली आहे. आमचें सूचकास इतकेंच विचारणें आहे कीं, त्यांचीं गोंडस बाळें जर खरोखरीच अन्याय करीत नाहींत तर हल्लीं असलेले कायदे दुरुस्त करण्याची ह्या वेळेसच काय जरूर आहे? आतां पुढें जे परवाने देण्यांत येणार ते ज्यांची वर्तणूक योग्य आहे व ज्यांना बंदुकीचा उपयोग कसा करावा हें माहित आहे त्यांसच मिळावेत त्याचप्रमाणें प्रत्येक वेळीं तिघांपेक्षां कमी लोक शिकारीत असूं नयेत. व त्यांपैकीं एकाला तरी देशभाषा आली पाहिजे. मोठमोठ्या विद्वान व देशी भाषेंत पास झाल्याचें सरटिफिकीट मिळविलेल्या कामदारांचें देशी भाषेंत न कित-

पत असतें हें सर्वांस माहीत आहेच व त्या सारखीच आपल्या स्वतःच्या भाषेंत पारंगतता असणाऱ्या सोलजरांस देश भाषेंत ज्ञा केवपत होणार आहे! कोणाही शिकाऱ्यानें बायकांशीं बोलूं नये, गावांत जाऊं नये, देवळांत अथवा मशीदींत शिरूं नये व त्यांच्या भास पास पांचशें यार्डांत शिकार करूं नये. व जंगला खेरीज गोळीचा उपयोग करूं नये. शिकारीस अयोग्य अशा जागा व पवित्र मानली जाणारीं जनावरें व पक्षी ह्यांच्या यादी बराकींतील प्रत्येक खोलींत टांगलेली असाव्या. तीन दिवसांपेक्षां अधिक दिवस शिकार करण्याबद्दलचा परवाना ज्या टोळींस मिळाला आहे त्या टोळींतील लोकांचीं नांवें म्याजिस्ट्रेटास कळवावी. ज्या ठिकाणीं शिकार सांपडण्याचा संभव असेल अशाच ठिकाणीं शिकारीची परवानगी द्यावी. व प्रत्येकांस वरील नियम वाचून दाखवावे. ह्यांच्या विरुद्ध वागणारास कडक शिक्षा असावी व एकाच पलटणीं तील लोकांकडून वारंवार ह्या नियमांविरुद्ध गुन्हे झाल्यास सर्व पलटणीचा शिकारीचा हक्क एक वर्षांपर्यंत काढून घ्यावा इ. इ. वरील नियम जर अमलांत येतील तर रयतेस बरेंच सुख मिळणार आहे परंतु सरकारास आपली लष्करी नाळें खोडसाळ आहेत असें वाटेल तेव्हां खरें.

---

चेंडू फळींत गर्क झालेले आमच्या शेजारच्या इलाख्याचे अधिपती वेळांत वेळ करून लोकांच्या निमंत्रणास मान देऊन त्यांस योग्य सल्ला देत असतात तेव्हां त्यांची सर्वच कारकीर्द खेळांत जाईल अशी जी तेथील लोकांस भीति पडली होती तिचें अंशतः तरी निवारण होण्यास जागा आहे. परवां पुणें मुक्कामीं सेंट मेरी शाळेच्या वार्षिक समारंभाच्या वेळीं स्त्री शिक्षणावर बोलतांना लार्ड साहेबांनीं श्रोतृजनांस स्पष्ट सांगितलें कीं, निवळ घर प्रपंचा पेक्षां ही अधिक जबाबदारीच्या कर्तव्यांत बायकांनीं आपली विशेष दक्षता दाखविली पाहिजे. व आपल्या प्रिय पतीच्या स्वभावास अनुसरून त्यांनीं आपलें वर्तन ठेवणें व काबाड कष्ट करून घरीं दमून भागून आलेल्या आपल्या पतीचे श्रम परीहार करणें हेंच स्त्रियांचे खरें व पवित्र कर्तव्य आहे. व हें कर्तव्य कर्म बजावण्यांत हल्लींच्या मुलींनीं पुढें विशेष खबरदारी घ्यावी अशी लार्ड हॅरीस साहेबांनीं आग्रह पूर्वक सूचना केली आहे. साहेब बहादूरांचा उपदेश किती गोड आहे बरें. अशाच तऱ्हेचें स्त्रीशिक्षण शाळांतून दिलें जातें, व रखमाबाई सारख्यांची खटलीं कोर्टांतून आलीं नसतीं तर स्त्री शिक्षण द्वेष्ट्यांचा अजून पर्यंत मागमूस ही राहिला असता काय? स्त्री शिक्षणास दोष देणारे फार विरळा सांपडतील परंतु तें देण्याची जी हल्लीं पद्धत आहे तीच सर्वांस नापसंत आहे. तेव्हां स्त्री शिक्षणाचा द्वेष करणाऱ्यांच्या नांवानें खडे फोडण्याचें सोडून स्त्रियांच्या कैवाऱ्यांनीं आपल्या पायाखालीं काय जळतें आहे ह्याचा विचार करावा. आमच्या मुलींच्या सुशील आयांस व सासवांस ज्या गोष्टी कधींच कळून चुकल्या आहेत त्याच गोष्टीवर पाया रचून स्त्रीशिक्षणाचा फैलाव झाल्यास आमचें नष्टचर्य संपलें असें थोडक्यांतच आह्मांस ह्मणतां येणार आहे.

---

या आठवड्यांत विलायतेहून आलेल्या तारे वरून समजलें कीं मि. डब्ल्यु एच. स्मिथ व मि. सी. एस पार्नेल असे दोन पार्लमेंटचे सभासद निवर्तले. या पैकीं पहिले गृहस्थ हाऊस आफ कामन्स सभेचे अधिपती होते. त्यांच्या मरणानें मंत्रिमंडळा पैकीं एक जगी मुत्सद्दी नाहींसा झाला. हे स्वभावानें फार शांत व मोठे विचारी असत. यांचा सद्गुण असा सांगतात कीं यांस वैरी म्हणून कोणी मनुष्य आढळणार नाहीं. यांच्या तव्यांत सर्व राष्ट्रीय खजिना असे, हाऊस आफ कामन्स मधील नानाविध विचारांच्या लोकांशी यांचा प्रत्यक्ष संबंध पडे, सर्वांच्या अभिप्रायांस मान देऊन त्यांस संतुष्ट ठवावें लागे, आणि इतकें करून ही आपल्या जबाबदारीच्या व महत्वाच्या कामीं हे फार दक्षतेनें व कुशलतेनें सर्वजणांस आपल्याच सल्ल्यानें वागण्यास भाग पाडीत व आपलें काम फार चोख ठेवीत. वक्तृत्वशक्ती विषयीं यांची फारशी ख्याती नसे तरी यांचें भाषण फार सौम्य व मार्मिक असें म्हणून कान्सरव्हेटीव व लिबरल या दोन्ही पक्षा कडील मंडळींत त्यांचें वजन चांगलें पडत असे. हे आपल्या वयाच्या ४३ वे वर्षीं म्हणजे सन १८६८ त पार्लमेंटांत शिरले तेव्हां पासून हे चढत चढत मंत्रिमंडळाच्या पायरी पर्यंत मोठ्या सन्मान्य स्थानीं येऊन पोंचले आणि ही गोष्ट त्यांच्या अंगच्या चांगुलपणा, लोकांशीं मर्यादशील वर्तन, आणि कर्तव्यांत पराकाष्टेची दक्षता या गुणत्रया मुळें घडून आली हें स्मरणांत ठेविलें पाहिजे. मरण समयीं ते चांगले सधन व श्रीमान असे वारले. व्यवहारांत यश व संपत्ति मिळविण्याची यांस गुरुकिल्लीच सांपडली होती.

दुसरे गृहस्थ पार्नेल साहेब हे आयर्लंड देशांतील राजकीय प्रकरणा संबंधानें ग्लाडस्टन साहेबांच्या प्रधान मंडळाच्या वेळीं मुख्यत्वें करून उदयास आले. यांचें चरित्र गेल्या वर्षभरांत लोकांच्या समोर आलें आहे त्या वरून त्यांची परिक्षा करणें मोठी चूक आहे. आयर्लंड तर्फे पार्लमेंटांत हे मुख्त्यार होते आणि त्या देशाच्या निस्सीम सेवेंत त्यांचे नैसर्गिक गुण पुष्कळ लोकांस कळून आले. हे मोठे वक्ते होते, विचारस्वातंत्र्य पूर्णपणें यांच्या अंगीं वसलें होतें, यांनीं लोकहिताच्या गोष्टी अनेक केल्या, आयर्लंडची तरफदारी ऐन आणीबाणीच्या वेळीं मोठ्या शहाणपणानें व हिम्मतीनें केली आणि आयरिश लोकांच्या सन्मानास हे पात्र झाले व ग्लाडस्टन साहेबांच्या आश्रया खालीं हे पार्लमेंटांत ही मोठ्या नांवलौकिकास चढले. परंतु मोठ्या खेदाची गोष्ट अशी कीं अशा धुरंधर मनुष्या मध्यें एक व्यंग निघालें आणि त्या मुळें सर्वस्वी त्याच्या अब्रूला काळिमा आला. ओशिया नामक गृहस्थाच्या स्त्रीशीं पार्नेल साहेबांचा व्याभिचार घडला व अशा प्रकारें ते नीतिभ्रष्ट ठरले त्या बरोबर त्यांच्या वरील लोकांचा विश्वास उडाला, शिष्ट लोकांत त्यांस वागण्याची मनाई झाली, ग्लाडस्टन साहेबांनीं त्याच्याशी व्यवहार बंद केला आणि येणें करून हा मोठा मनुष्य नीचावस्थेप्रत पावला तो इतका कीं त्या अधोगतींतच फार काळ लोटला नाहीं तोंच त्यांचें देहावसान झालें. हें कथानक ऐकून अति वाईट वाटेल आणि पापाचरणाचें योग्य फळ मिळालें असें ही वाटेल तरी किती लोक

'स्वस्त्रीवांचुनि इतर स्त्री ती माता स्वसा सुता मान' या सुबोधा प्रमाणें वागतात व मनुष्यस्वभाव किती अपुरा आहे हें लक्ष्यांत आणून पार्नेल साहेबांस विशेष दोष न देत बसता प्रत्येकानें स्वतांचें वर्तन पायाशुद्ध राखण्या विषयीं तिळतिळ जपावें आणि कांचेप्रमाणें अब्रू ठिसूळ आहे असें ह्मणतात तिला कांचना प्रमाणें बळकटी करण्यास झटावें.

---

जेकब नांवाच्या युरोपियन जवाहिरवाल्यानें आमच्या निजाम सरकारास ४६ लाख रुपयांस एक हिरा विकत देण्याचें ठरविलें. तो हिरा निजाम सरकारच्या हातीं पोंचल्या नंतर सौदा पुरा होई पर्यंत त्याच्या सुस्थितीच्या खात्रा बद्दल निजाम सरकारनें २३ लक्ष रुपये जेकबच्या नांवानें बेंगाल ब्यांकेंत ठेविले जेकब साहेबांनीं रुपये ब्यांकेंतून लांबविला आणि हिरा न पसंत ठरल्या नंतर रुपये परत केले नहींत व हिऱ्याचा ही कांहीं मागमूस लागू दिला नाहीं,

निजाम सरकार मार्फत कलकत्ता कोर्टा समोर जेकब साहेबावर फौजदारी खटला चालला आहे आणि या हिऱ्याच्या प्रकरणांत खुद्द निजाम सरकारांची रेसिडेंटाची वगैरे कमिशनपुढें साक्ष घेण्याचें काम चाललें आहे न्यायाच्या दरबारांत इनसाफ होई पर्यंत या हिऱ्याची गोष्ट विशेष सविस्तर देतां येत नाहीं तरी कांहीं निराळ्या संबधानें दोन मुद्दे नमूद करण्या सारखे आहेत.

जेकब साहेबांनीं हैद्राबादेस कमिशनच्या वेळीं आरोपी या नात्यानें हजर असणें जरुरीचें व कायद्यानें आवश्यक असें होतें. जेकबांचा विचार असा पडला कीं हैद्राबाद नेटीव संस्थानच्या गादीची जागा आहे तेव्हां आपल्या जीविताचा सुरक्षितपणा कायम राहण्यासाठीं निजाम सरकारावर एक मुंबई सरकाराजवळ परवाना मागावा आपला वकील बडीजाव असा त्यांनीं वाढविला परंतु परवाना कांहीं मिळाला नाहीं. मग साहेब इतके अजारी पडले कीं हैद्राबादे पर्यंत प्रवास झाला तर प्राणावर ही बेतेल असा डाक्टरांचा लेखी अभिप्राय पडला. पुढें रेसिडेंट साहेबांनीं व निजाम सरकारनें सुरक्षितपणा विषयीं व नीट बरदास्ती विषयीं तारेनें अश्वासन दिलें तेव्हां अजारीपणाच्या योगामुळें आरोपी साहेबांनीं आपले बारिष्टर मि. इनव्हरारिटी यांस स्वतांच्या वतीनें पूर्ण मुखत्यारी आहे असें तारेनें कळविलें

हल्लींचे तरुण निजाम मीर महबूब अली खान यांनीं या हिऱ्याच्या प्रकरणांत आपल्या दिवाणास एक पत्र लिहिलें व तें पत्र सर्व प्रजाजनास विदित करण्याविषयी ही आपला मनोदय प्रगट केला आहे. त्या पत्रावरून निजाम सरकारची खरी न्यायतत्परता, मनाचा मोठेपणा, श्रमिती व राजवैभव या विषयीं त्यांचे उदात्त विचार इत्यादि गोष्टी चांगल्या व्यक्तपणें कळून येतील. त्यांच्या पत्रांतील सारांश असा कीं—मी कमिशन समोर साक्ष द्यावी हें माझ्या 'निजाम' पदवीला उचित नाहीं असा लोकांचा समज झाला आहे. लोकांचा स्वामिभक्ति, त्यांचें माझ्या ठायीं अत्यंत प्रेम व उदार राजनिष्ठा हीं पाहून मनाला संतोष होतो व प्रजाजनांच्या अशा उत्कट पूज्यबुद्धी विषयीं मला मोठा अभिमान वाटतो. परंतु हा विचार राजनिष्ठ लोकांच्या मनांत मुख्यत्वें करून वागतो आहे. कांहीं लोकांनीं ही कुसि लढविली आहे त्यांत त्यांचा बेत अगदीं निराळा आहे. माझ्या सांगण्यावरून ज्या राजभक्त अधिकाऱ्यांनीं हा खटला चालविला आहे व कमिशन समोर माझी साक्ष घेण्याचें योजिलें आहे त्या अधिकाऱ्यांनीं ही निंद्य व माझ्या अपमानाची गोष्ट आरंभली आहे असें लोकांस मशहूर करून त्यांच्या विषयीं माझ्या मनांत व इतर लोकांच्या मनांत अविश्वास उत्पन्न करण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला आहे. परंतु हें मी जाहीर करितों कीं त्या अधिकाऱ्यांस तसें वागण्याविषयीं माझें पूर्ण अनुमोदन आहेच कायद्याची अंमलबजावणी यथायोग्य झाली पाहिजे. याहून ही तिसऱ्या प्रकारच्या लोकांनीं कमिशन पुढील माझ्या चौकशी बद्दल आक्षेप घेतले त्यांत त्यांनीं असा व्यूह रचिला आहे कीं अशा उपायानें खटला तहकूब करवावा आणि जेकबची मुक्तता करावी. तेव्हां लोकांनीं ध्यानांत ठेवावें कीं कलकत्त्यास खटला चालूं केल्यानें हिरा व तेवीस लक्ष रुपयांपैकीं नाहक पैसा लव कर योग्य ताब्यांत आला आहे. माझ्या संस्थानच्या कोर्टांत खटला चालला असतां तरी माझी जबानी होणें न्यायासाठीं अगत्याचें आहे. लेखी जबाबानें तपासणी व फेरतपासणी तोंडीं जाबजबाबाप्रमाणें चांगली होत नाहीं आणि त्यामुळें आरोपीला न्याय मिळतां त्यांजवर अन्याय केल्या सारखा न होतो. असा अन्याय जेकबनें भोगावा हें बरोबर नाहीं! अमच्या पूर्वजांच्या न्याय कोर्टा समोर असला अन्याय चालला असतां परंतु प्रस्तुतच्या न्यायशास्त्र व विद्वान न्यायाधीशास असल्या गोष्टी आवडणार नाहींत व ते न्यायासनीं आपली स्वतंत्रता काडीमात्र ढळूं देणार नाहींत. मानमरातबा प्रीत्यर्थ रचिलेल्या पैशावर पाणी सोडावें ही मनुष्याची कल्पना भ्रामक आहे. आज जेकबला माफ केलें तरी जेकबला पुष्कळ अनुयायी मिळतील आणि गैरमार्गाचा दरवाजा खुला केल्या सारखे होणार आहे कुराणची आज्ञा आपणास पाळली पाहिजे. खुद्द खलिफ अली हेही न्यायासना समोर उभे राहिले होते. इसेन व हुसेन हेही न्यायदरबारांत इनसाफा साठीं उभे होते तेव्हां आपल्यांत त्या दीव्य पुरुषांचें अनुकरण करण्या पलिकडे अन्य सन्मार्ग किंवा अन्य मोठेपणा या दुनियेंत कोणता आहे! चक्रवर्ती महाराणी सरकारचे ज्येष्ठ पुत्र हे प्रत्यक्ष न्यायकोर्टातून साक्षी साठीं हजर रहात असत तेव्हां कमिशन पुढें माझी चौकशी झाल्यानें कांहीं एक कमीपणा नसून सर्व गोष्ट यथोचित आहे हें दिसून येईल.

निजाम सरकारनें हा प्रजेस सांगितलेला बुद्धिवाद राजरजवाड्यांनीं सदोदित स्मरणांत ठेवण्या सारखा आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY, OCTOBER 12, 1891

We are obliged to Colonel Mackenzie for noticing in his report the popular

complaints with respect to the general effects of suits in the modern law-courts. He has rather hastily decided some questions which ought to have been left open for discussion. When he dissipates the idea of the heavy charges of law-suits in the most emphatic and unambiguious language it is strange that he should look at the matter from one stand point only. He observes:...

It is said too that the cost of litigation is oppressive and is put down roughly at 25 per cent., *viz*.,...

In court fees, 7.5 per cent.,
In witness, &c., 7.5 per cent.,
Professional fees, 5 per cent., and
In execution cost, 5 per cent.;

But in Moglai times, when the aid of the Native Government was invoked, the Government charge was 25 per cent. The very name of the clerk of the Adalut Court who effected executions was the *chouthu* officer, the man who distrained one-fourth, and as he was generally beyond ken and beyond control, litigants were very lucky if they got off with one-foureh; consequently relatively in this direction also there is no ground for the assertion so often made.

In Moglai times power and favouritism paved the way to success in every branch and few people sought the aid of law to settle their quarrels. But in English times when peace and safety of body and purse are secured and the doors of justice are thrown wide open to let every man have his due in whatever walk of life he travels he runs to law to vindicate his right, claim or interest as soon as it clashes with that of others and leads to a series of disputes and hostilities. In the heat of fierce fight he is ready to lose away his dear possessions to try the highest powers of law; and the modern inventions and requirements of law courts the laws of of evidence have greatly facilitated such a game. The means of rival parties are serewed heavily to yield a revenue sufficient to maintain Government institutions on a large scale of profit and the *blessed* class of lawyers with rich emoluments. It is indeed their own folly people pay for. Burke says that a Government is never for the good of the people but it acts as a preventive machine against the worst upshot of things if they be allowed to take their course. People ought to learn by time and education that a court of law is the most ruinous weapon to use. The sooner they sow seeds of harmony and sympathy in those with whom they come to deal the better they will be. But before such a millenium sets in it is the duty of the ruling powers— Colonel Mackenzie is one of them— to institute courts of arbitration recruited from the best men of a society on the model courts of Norway since the old Punchayats of India are too old to stand their ground It is at least within the compass of easy accomplishment to establish Lavad Courts in Berar. It will also be right to make competition hard at the bar by admitting outright outsiders; and the fittest will survive to watch carefully the interests of their clients. In short cheap and speedy justice should be the motto of a court of law.

---

We next take up the Stamp and Registration reports for review. Those annual records are clear in themselves and call for little comment. The year (1890 91) of the reports was not financially a good one. There is evidently a concurrent and complex cause at work which effects a gradual decrease in the stamp as well as the Registration revenue as compared with that of the last two years but on an average of the last seven years there is a marked increase in the revenue and the usefulness of the Stamp and Registration departments. The Commissioner has summarised the important items of the Stamp report in the following paragraph:—

"The total receipts from the sale of stamps under the Indian Stamp Act and under the Court Fees Act amounted to Rupees 7,65,781-12-0 compared with Rupees 7,80,179-2-10 in 1889-90, and the surplus stands at Rs. 7,16,355-10-4 against Rs. 7,29,776-8 0.

The decrease in sales occurs under both kinds of stamps. In the case of general stamps, which show a decrease in value sold of Rs. 2,885-12-0, the Inspector General points out that in the two next preceding years there was an abnormally large increase, amounting in the aggregate to 22.2 per cent. compared with the figures of 1887-88, and that it is not to be expected that this high rate would be maintained. But although it is true that the sales for the year of report show a decrease compared with those of 1889-90, the difference is only 8 per cent., whereas the figures for 1889 90 are 12.7 per cent. in excess of those of the previous year, which at the time were the highest on record. Consequently the high rate of increase which characterized 1889 90 as compared with previous years has practically been maintained because the figures of 1890 91, though slightly below those of 1889 90, are still for higher than those of any previous year. The principal diminution is in Akola, and I think that, if the suggestion in my review of the registration report for an examination of the figures relating to the registration of immovable property in that district is accepted, the enquiry might usefully be extended to the stamp sales. Possibly some further light might be thrown upon the connection which Colonel Lane believes to exist between the results shown in the stamp and registration returns and operations in cotton. It seems natural to suppose that sales of stamps and registrations of deeds are likely to be active both in a year of good and in a year of bad harvests. An abundant supply of money enables a cultivator to pay his debts and clear his property, while in a year of short harvests he has to borrow money, and in either case stamps and deeds are required"

It has come to the knowledge of Colonel C. T. Lane that Satta floaters have evaded the use of a receipt stamp for effecting legally receipts by endorsing them on Sattas which are exempted from the stamp duty. He has promised in his report to enforce law more carefully in this direction and has even gone further to arrange the institution of a new stamp duty on Suttas them selves. Whatever may be the objection in making these instruments liable to duty on the ground that such a course would amount to a recognition by the legislature of what are in fact purely gambling transactions the Resident is prepared to consider any proposals which the Inspector General may wish to make. We differ here altogether. The objection is sound and tenable. The sutta trade deserves total extinction and what ever tends to legalise that sort of gambling ruinous to the status of the agrical turist we openly condemn. It is a shortsighted view, if not selfish, to look up to a source of revenue from a trade which smells of an offensive and demoralizing character. We hoped to be enlightened by the views of Mr. T. C. Plowden in his preface to the report but he appears to have observed studied silence when he simply explains why laoni suttas alone are taxed as coming within the definition of a bond.

With respect to the administration of the stamp Act it is surprising and most iniquitous that there should be 18 cases of prosecution with only 8 convictions in the end. One should rightly hold that prosecution of this nature is usually hasty and ill advised.

The Commissioner has a short note on the registration department as to its working from the point of view of a revenue administrator. It runs as follows:—

Registration department from a financial point of view continues to be satisfactory. The surples of receipts over expenditure for the year under report amounted to Rs. 28,256-13 6. The office at Umarkhed still works at a loss, but the deficit was only Rs. 22-5-0, against Rs. 109-1-7 in the preceding year. As regards the disposal of the accumulated surplus income of the department, I think that the cost of the accommodation for the records of the district registrars, which has been recently undertaken or arranged for in every district, should be debited against the department And, though the table which accompanied the Government of India Resolution of the 17th February 1891 shows that Berar stands well compared with other provinces in the proportion of offices to area and population, I am in correspondence with the Inspector-General on the subject of opening additional offices at places where they are likely to be useful.

---

## वऱ्हाड.

हवामान—हस्तनक्षत्राचा पाऊस सर्व हिंदुस्थानभर झाला तरी कित्येक शहरें व नद्या कांठच्या गांवांतुन महापुरानें पुष्कळ नाश झाला आहे. वऱ्हाडांत ही हा अनुभव थोडा बहुत आला. अलिकड पहांटस दव दृष्टीस पडतें व किंचित् थंडी ही पडूं लागली आहे तेव्हां आतां पावसाळा संपला म्हणण्यास हरकत नाहीं. उमरावतीस ४१ इंच व अकोल्यास ३१ इंच पाऊस एकंदरीनें झाला व हा पिकांस चांगला असून पुष्कळ झाला आहे. किरकोळ ताप खोकला वगैरे आजारा शिवाय विशेष रोगराई म्हणण्या सारखी नाहीं.

येथील खाजगी देवघेवींत हाळिकर शाई व बडोदेशाई पैसे, व दुहेरी पैसे अशीं दोन तांब्याची नाणीं आज दोनतीन वर्षें चालत असत परंतु सदपां तीं अकोल्याच्या चलनी नाण्यांतून काढून टाकण्या विषयीं व्यवस्था चालूं आहे.

उमरावती हायस्कूलांत विद्यार्थी मंडळी पुष्कळ जमल्या कारणानें त्याच्या शिक्षणाच्या अधीक सोयी साठीं एका शिक्षकाची ४० रुपये पगाराची जागा नवीन करून त्यावर रा. रा. रामचंद्र सदाशिव लेले बी. ए. यांस कायम केलें. हायस्कूलाच्या या अभिवृद्धीचे श्रेय रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर बी. ए. यांजकडेस आहे. या नवीन जागेच्या सवडी मूळें मुंडगावाचे हेडमास्तरचे जागीं रा. रा. वासुदेव विठ्ठल आंबेकर यांस कायम करण्यांत आलें आहे असें कळतें.

प्रमोदसिंधुवरून कळतें कीं चालूं महिन्याच्या १५वे तारखेस कलकत्यास खानेसुमारी कडील मुख्य मुख्य अधिकाऱ्यांची सभा भरणार आहे त्या सभेला वऱ्हाडांतून रा. रा. बारन हॉर्स्टिंग व आरदेसर दिनसाजी असे दोन गृहस्थ जाणार आहेत.

सन १८७१ च्या जंगल खात्याच्या नियमा अन्वयें अलिशान रेसिडेंट साहेबांनीं फर्मावलें आहे कीं वणी जिल्ह्यांतील दारव्हा पांढरकवडा व वणी या तालुक्यांत मिळून एकंदर ९७०९ एकर २० गुंठे इतकें जंगल सरकारी फारिस्टांत दाखल केलें जाईल या हुकूमामुळें वणी जिल्ह्यांतील जनावराच्या गवतचाऱ्या विषयीं लोकांस कितपत सुख होईल तें पाहावें.

मि. जी. एफ टेलर यांनीं राजिनामा दिल्या वरून वाशिम जिल्हा बोर्डांतील त्यांच्या जागीं मि. सी. ए. डेव्हिस आफि० डेपुटी कमिशनर यांस सभासद नेमण्यांत आलें.

मि. सफदर अलीबेग एक्स्ट्रा असि. कमि. जिल्हा वणी, यांस असि. कमिशनर वर्ग २ चे अधिकार असून त्या शिवाय शंभर रुपयांपर्यंत दाव्याचा निकाल करण्याचा स्मालकाज कोडताचे जज्जाचा अधिकार देण्यांत आला आहे.

रा. रा. गोविंद नाईक आनररी असिस्टंटी यांच्या कोडतास तहशिलदार वर्ग १ चे कोर्टाचा अधिकार मिळाला आहे.

येथील ट्रेनिंग कालेजचे व्हाईस प्रिन्सिपाल रा. रा. भास्कर लक्ष्मण अभ्यंकर हे रजे वरून परत आपल्या कामीं दाखल झाल्या वरून रा. रा. दामोदर कृष्ण टिळक यांस तूर्त जळगांवचे इंग्रजी—मराठी शाळेवर फर्स्ट असिस्टंटचे जागीं नेमिलें आहे. राजश्री दामोदरपंत आपल्या स्वल्प कारकिर्दींत शिष्य मंडळीस चांगले आवडले हें त्यांस भूषणास्पद आहे.

---

### नोटीस

बलाम गणु वल्लद पाटील टीकार मौजे कोलोरी तालुके खामगांव जिल्हे आकोले यासी खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं चिंतामण शींपी याचें घाबें १२ खांब व पुढें आंगण हें तुह्मी खरीदी घेतलेलें घाबें तुम्ही मजला विकत दिलें किंमत रुपये ११० आणि त्या बद्दल त्या वेळेस आमचे जवळून इसार रुपये ५ दोघा गांवकऱ्या समक्ष घेतले आणि आज पावेतों आम्हांस खरिदीखत करून दिलें नाहीं व आम्ही तुम्हांस पुष्कळ वेळां भेटलें पण तुह्मी आह्मास थापा दिल्या. आणि तुह्मीं सांगितल्याप्रमाणें आज रोजीं ह्मणजे तारीख ७।१०।९१ इसवी रोजीं खरेदीखत करून घेण्यासाठीं खामगांवास जाण्याकरितां गाडी वगैरे जुंपून तयार केली आणि नंतर सांगितलें कीं येत नाहीं तर आतां ही नोटीस पावतांच आठ दिवसाचे आंत खरिदीखत करून देणें. नाहींतर तुमच्या योग्य कायदेशीर एकंदर नोटिसीचा खर्च व ठरल्या दिवसापासून भाड्या सुद्धां फिर्याद करूं कळावें. तारीख ७ माहे आक्टोबर सन १८९१ इसवी.

[ सही ]

महादु वल्लद बुलाजी रावूत राहणार कोलोरी तालुके खामगांव यांची हातची निशाणी असे.

---

## वर्तमानसार.

काबूलचा अमीर विलायतेस जाणार असून त्या संबंधानें त्यानें आपल्या राज्यांत एक जाहिरनामाहा प्रसिद्ध केला आहे. या जाहिरनाम्यांत आपला विलायतेस जाण्याचा बेत असून मी तिकडून येईपर्यंत माझी प्रजा राजभक्त राहील अशी मी आशा करतों असें ह्मटलें आहे. ही बातमी खरी असल्यास त्याचा विलायतेस जाण्याचा बेत बहुतेक ठरल्यासारखाच दिसतो.

आगगाडींत एका तरुण मुलीवर जुलूम केल्याची एक गोष्ट नुकतीच बाहेर आली आहे. ईस्ट इंडिया रेल्वेंतून १५ वर्षांच्या वयाची एक मुलगी एकटीच भागलपुरास जात असतां दोघे तरूण पुरुष ओळखतां येऊं नये अशा रीतीनें तोंडांस रंग लाऊन गाडी चालू असतां तिच्या डब्यांत शिरलें व तिच्यावर जुलूम केला नंतर तपासा अंती रेल्वेकडच्या दोघां गोऱ्यांचें कृत्य असें आढळल्यावरून यांस कोडतांत नेलें. तेथें एकानें माफी घेऊन गुन्ह्याची सर्व खरी हकीकत सांगितली व मग दुसऱ्यानें ही गुन्हा कबूल केल्यावरून त्यास शिक्षा झाली असें सांगतात हा सर्व गोरा खेळ असल्यामुळें आह्मा काळ्यांनीं त्यांत पडणें बरें नाहींच, पण असले प्रकार चालणें चांगलें नव्हे.

मध्य एशियांत मर्व्हच्या दक्षणेस झुलाटन ह्मणून एक ठिकाण असून तें रशियाच्या ताब्यांत आहे व तेथें असलेली आपली फौज रशिया वाढवतो आहे असें सांगतात. त्याचप्रमाणें हिरातच्या उत्तरेस ४० कोसांवर व प्रसिद्ध जें पेंजडे ठिकाण त्याच्या दक्षणेस २५ कोसांवर कुश्क नदीच्या कांठीं शेख जुनादि ह्मणून एक ठिकाण असून तेथें रशिया आपली फौज वाढवीत असून फौजेकरतां बराकी वगैरे बांधीत आहे अशी बातमी आहे. रशिया व अफगाणिस्थान यांची सरहद्द कायम करतेवेळीं हें पेंजडे ठिकाण प्रसिद्धीस आलें असून हिरात एशियाची किल्ली आहे हें प्रसिद्ध आहेच. ही दोन्ही ठिकाणें महत्वाचीं असून त्यांच्या शेजारी ही तयारी चालली आहे हें खरें असेल तर या बाजूच्या सरहद्दीबद्दल आमचे सरकार जें नेहमी कांहीं तरी करीत असतें तें कुढाला–तुमड्या लावण्यासारखें नसून योग्य तेंच करतें असें ह्मणावें लागतें.

चीतूरपासून उदेपूरपर्यंत रेल्वे करण्याचा विचार चालूं असून त्या रेल्वेचा खर्च उदेपूरसरकार देणार असें सांगतात.

मद्रासेंतील दुष्काळप्रांताचा ह्मणजे कडापाचा कलेक्टर याणें आपल्या वरिष्टांस पुढीलप्रमाणें लिहिल्याची गप्प आहे:—“ सब कलेक्टरचें एक डेमी आफी. पत्र आजच मला मिळालें असून त्यांत दुष्काळग्रस्तांस फुकट अन्न देण्याचें कांहीं कारण नाहीं असें त्याणें त्यांत लिहिलें आहे; तसेंच मला स्पेशल डेपूटी कलेक्टरची जागा मिळण्याची आशा असल्यास दुष्काळाबद्दल मला कांहींच वाईट वाटणार नाहीं असें एका तहशिलदाराचें ह्मणणें असल्याचेंही त्यांत लिहिलें आहे ” तहशिलदार व सब कलेक्टर दोघेही शहाणेच ह्मणावयाचे. “खरें आहे, यापुढें त्या अन्न देण्याकडे सरकारी पैसा न खर्च करतां सब कलेक्टरची माल मिळकत विकून तो पैसा खर्च करावा आणि तहशिलदारास कायमचा डेपुटी कलेक्टर करून त्यास मरेपर्यंत दररोज कोंड्याची एक भाकरी आंबाड्याची भाजी मात्र देण्यांत यावी” असा कलेक्टरचे वरिष्ट हुकूम करतील तर फार चांगलें होऊन सरकारी भूतदया फार चांगली दिसून येऊन इतरांस चांगलें उदाहरण होईल असें वाटतें.

४६ लक्षांच्या हिऱ्याच्या खटल्यांत निझामाची साक्ष तेथील असि० रेसिडेन्टानें घ्यावी व मग रेसिडन्टाची घ्यावी असें ठरलें.

दोघ बडे रशियन गृहस्थ गेल्या आठवड्यांत कलकत्यास आले असून प्रथम दार्जिलिंग येथें जाऊन नंतर हिंदुस्थानच्या गव्हरनर जनरलांस सन्मानपूर्वक भेटण्याकरतां सिमला येथें जाणार आहेत. नंतर आसाम प्रांतांत कांहीं महिनें शिकार करण्याकरतां राहणार आहेत असें सांगतात. यांत इकडे येण्याचें कारण कोठें बाहेर आलेलें नाहीं. दार्जिलिंग येथें कशाकरतां जाणार हें समजत नाहीं. असाम प्रांतांतील शिकारी करतांच ते आले असेंही सांगण्यांत येत नाहीं. शिवाय रशियाचा देश जर फार मोठा पडला आहे तर त्यांच्या त्या अफाट देशांत शिकारीस जागा नाहीं कीं काय?

अजमिराकडेही दुकाळ सुरू असून लोकांचे हाल चालले आहेत असें दिसतें. पोटाकरतां धान्य लुटणें गुन्हा नाहीं अशा समजुतीनें तिकडच्या कांहीं लोकांनीं नुकतीच एक धान्याची लूट केली असें सांगतात! त्याची ही समजूत कशी झाली.

डबलीन येथें १८९५ सालीं सगळ्या पृथ्वीतल्या पदार्थांचें एक प्रदर्शन होणार आहे.

विलायतेंतल्या एका बाईचा एक कुत्रा तिचीं पत्रें पोष्टांत टाकण्याचें काम करतो असें एक गृहस्थ सांगतो!

पुण्याचे गव्हरनर लार्ड हारिस हे ता० २० मिनहूच्या सुमारास नगरास जाऊन तेथील पाण्याची व्यवस्था पाहतील. नंतर तसेंच सोलापुरास जातील. नंतर पुण्यास येऊन फिरून ता० २ नोंवेंबरच्या सुमारास सिंध प्रांतांत जातील व १० डिसेंबरच्या सुमारास तिकडून मुंबईस येतील असें प्रसिद्ध झालें आहे. चेंडुफळीच्या वगैरे खेळाची काय वाट?

इंदूरच्या कालेजांत बी. ए. पर्यंत अभ्यास व्हावा असें ठरलें.

मणिपूरच्या संरक्षणकरतां तेथें दीड पलटण व सात पौंडी दोन तोफा ठेवण्याचें ठरलें आहे बस. ज्याचें बिंडवंड इतकें झालें त्याची योग्यता एवढीच?

गेल्या सोमवारीं रात्रीं मद्रासेहून जी मेल ट्रेन निघाली ती त्रिचनापल्लीच्या नजीक आल्यावर चोरट्यांनी त्या आगगाडीस रुळांवरून खालीं पाडलें आणि गाडींत असलेल्या खजिन्यांतून १०,००० रुपये लुटून नेले. गाडी रुळाखालीं आल्यानें किंवा चोरट्यांच्या कारणानें गाडींतल्या कोणाही माणसास इजा वगैरे कांहीं एक झाली नाहीं. चोरट्यांचा पत्ता नाहीं. ठा० अ०

फिर्यादः— गणपतीचे उत्सवांत जैन धर्माच्या देवाचें सोंग बसवून निर्भत्सना केली व कांहीं जैन मंडळीस मुद्दाम बोलावून नेऊन अपमान केला वगैरे अर्थाची फिर्याद एवलें येथील जैन मंडळीचें मुखत्यार लोकांनीं रा. सा. मामलेदार यांज पुढें मांडली आहे. आरोपी सहा इसम असून चौकशी येत्या आठवड्यांत होणार आहे. घोडा मैदान जवळीकच असल्यामुळें तूर्त जास्त लिहिण्यांत हांशील नाहीं. मात्र दया, क्षमा, शांति आणि सत्य. हीं जीं जैन धर्माचीं मुलतत्वें आहेत तीं यथा योग्य पाळली ह्मणजे झालें.

--सांप्रत अब्रुनुकसानींच्या फिर्यादीस बराच उत आला आहे खरा प्रकार मासिक पुस्तक व पुणें वैभव यांजवरील खटल्यांचा निकाल होणें पुरें झालें नाहीं तोंच पुण्यास दुसरे दोन मुकदमे सुरू होण्याचे वर्तमान बाहेर आलें आहे. एक सुधारक कर्त्यांवर व दुसरा भामिनी प्रकाशावर होणार आहे. पहिल्या वे० शा० सं० सदाशिव शास्त्री थत्ते हे फिर्यादी आहेत व दुसऱ्या खटल्यांत पुणें वैभव कर्ते रा० शंकर विश्वनाथ कळकर हे आहेत. पहिल्याचे ठीकच आहे परंतु वैदिक धर्माचा मोठा कळवळा बाळगणारे केळकर ह्यो बरोबर सामना करण्यांस उभे राहिले आहेत. आतां मात्र आमच्या वर्तमानपत्र कर्त्यांस चांगला लौकिक प्राप्त होईल.

मुंबई ओरियन्टल लाईफ इन्सुरन्स कंपनीचा कारभारी दोराबजी धनजाभाई श्रॉप याने सुमारें तीन लक्ष रुपयांची अफरातफर केल्याचे गुन्ह्यावरून त्यास सेशन कमिट करण्यांत आलें होतें. कायद्याचे लंगडपणामुळें जुरीनें निरपराधी ठरविल्यामुळें कोर्टानें त्यास सोडून दिलें. ह्या खऱ्या गुन्हेगार पार्शीस सोडल्यामुळें पार्शी लोकांनीं कोर्टांत आनंदाचा गजर केला. तो इतका कीं, कोर्टास तो बंद करण्याचा जरूर पडली पार्शी लोकांची डोकीं हलीं ठिकाणावर राहिली नाहींत असें दिसतें.

तोळ्यांचे आंतील वजनाचे वर्तमानपत्रास विलायतेस पाठवितांना पूर्वी एक आणा हाशील पडत असें आतां अर्धा आणा पडणार असें ह्मणतात. दी० बं०

आगबोटीवर आग—पी. ओ. कंपनीच्या रोम आगबोटीवर ता० २८ रोजीं आग लागून हजारों रुपयांचें नुकसान झालें.

जुलमानें पुरुषाचें चुंबन—सर गिलबर्ट ग्रीनाल नांवाचे वृद्ध गृहस्थ पार्लमेंटांत मेंबर आहेत. ते थोडया दिवसांपूर्वी आपल्या गाडींत बसण्यास जात असतां त्याला मदत करणाऱ्या मिसगार्स नांवाच्या एका बाईनें धांवत येऊन त्यांच्या गळ्यांत मिठी मारली व त्या ह्मातार्‍याचा मुका घेण्याचा प्रयत्न चालविला त्यांनीं व त्यांचे कोचमननें तिचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला परंतु कांहीं केल्या ती मिठी ह्मणून सोडीना! तेव्हां त्यांनीं एक पोलिस शिपाई आणविला परंतु त्यालाही ह्या चुंबनातुर बाईनें दाद दिली नाहीं!!

पोष्टाचे हांशिलांत फेरफार— विलायतेहून हिंदुस्थानांत येणाऱ्या वर्तमानपत्राचें हांशील २ औंसांस अर्धा आणा प्रमाणें करण्याचा विचार चालला आहे. ता० १ एप्रिल १८९२ पासून हा फेरफार होणार असून ह्या व्यवस्थेनें हिंदुस्थानच्या तिजोरीस ११ लाखांची ठोकर बसणार आहे असें अलाहाबादचा ता. १ तार सांगते.

दिल्लीकडे सिकवा डाक्टराकडून पुष्कळ लोकांनीं आपले कुजके दांत उपटून टाकिल्या मुळें त्यांच्या तोंडांची ह्मातार्‍यासारखी बोळकीं झालेली आहेत. अशी लोकांस ताडांत कृत्रिम दांत बसवून शोभा आणण्याकरितां दिल्ली येथें एक दंत वैद्यांची कपनी निघाली आहे!!

व्हियना १ अक्टो०:— फ्रान्सिस जोसेफ बादशाहा बोहेमिया येथें जाणार होते त्यांत व्यत्यय आणून लोकांचा उत्साह भंग करावा ह्या दुष्ट इराद्यानें कांहीं लोकांनीं वाटेतील एक रेल्वेचा पूल २ कुलपी गोळे मारून मोडून टाकला!!

बायकोचा लिलांव— रंगामाटी येथें एका तरुण गराल्याचा व त्याच्या बायकोचा बेबनाव होऊन ती नवऱ्याचे घरीं येईना ह्मणून त्यानें कोर्टांत दावा आणिला. त्यावरून दिवाणानें नुकसानीबद्दल तिजवर ५० रू० चा निवाडा दिला व तो असि. कमिशनरांनीं बहाल केला. सदर्हू निवाड्यावरून ह्या बायकोचा उघड लिलांव झाला अशी एक चमत्कारिक बातमी सि० व्हि० आणि मिलि० ग्या० मध्यें लिहिली आहे.

स० शो०

पारिसमध्यें दंगा उत्पन्न झाला आहे.

हिंदुस्थान सरकार सरहद्दीवरील तोफखाना वाढविणार.

सियाममध्यें फ्रांसाचा अंमल थोड्या काळांत जारी होईल असा घाट बनून आला आहे.

मद्रासप्रांत दुष्काळानें वेढून काढला आहे या कारणानें यंदा सरकारच्या खजिन्यांत महसूल खातीं १३५०००० रुपयाचा तूट येण्याचा संभव आहे.

मिसर देशांत नाईल नदीच्या पुरानें अतिशय नासाडी होत असे, तो मोठा कालवा बांधून नेल्यामुळें नाहींशी झाली, यंदा तिकडे धान्यादिकांची सुबत्ता झाली आहे.

म. मि.

इंग्लंडचा महसूल गेल्या सहा महिन्यांत ५० लक्ष रुपयांनीं वाढला असें समजतें.

मणिपूरच्या पूर्वीच्या महाराजाना वायव्येकडील प्रांतांतल्या कोणच्यातरी हवाशीर जागीं आणून ठेवणार असें ह्मणतात व त्यांस २५० रुपये दरमहा देणार ! ! !

सु. प.


## भारी अजब दवा.

चष्मा लावूं नका.

हें रामबाण औषध फक्त २१ दिवसांत तीव्र दृष्टि करतें. तुह्मांस चष्मा लाविल्या शिवाय जवळचा किंवा दूरचा पदार्थ दिसत नसल्यास हें औषध घ्या. गुणाबद्दल अनेक दाखले मिळाले आहेत. पूर्ण माहिती अं पत्रा सोबत. किं. २ रु. बंगी खर्च ८६ व्हा. पे. पाठवूं.

पत्ता– ग. स. पाटील. बुधवार पेठ पुणें.


☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार ”छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाचा अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१२
सहामाही " ३ " ०।८
सालअखेर " ७ " १।०८
किरकोळ अंकास................................ ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .........०१

Rs.
per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..........................................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per line 3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXV | AKOLA MONDAY 19 OCTOBER 1891 | NO 41

वर्ष २५ | अकोला सोमवार तारीख १९ माहे आक्टोबर सन १८९१ इ० | अंक ४१

HEALTH, WEALTH & PROSPERITY.

जी. बी. नाईक कंपनीच्या

## विजेच्या आंगठया पुतळया.



खोटा माल घेऊन फसूं नका. खात्रीचा माल घेऊन अनुभव पहा

प्रत्येक वस्तूवर G B. N. अक्षरें पहा.

## ५०००० वर विकल्या

रक्त हें मनुष्याचें जीवित्व आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.

जग प्रसिद्ध आहे कीं, सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोगांवर करितात. ज्याच्या आंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यास विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला. व त्या पासून पुष्कळ अजारीं मनुष्यें औषधोपचाराशिवाय बरीं झालीं आहेत. या विषयीं हजारों डॉक्टर साक्ष देतील.

रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग ह्या लहानशा ब्याटरी पासून बरे होतात. संधिवायू, शिरांगत वायू, ठणका, हडांतील दुःख, कंबरेंतील दुःख, व्रण किंवा सूजभोंवळ, पुरुषत्व भंग, अशक्तपणा, स्त्रियाचे रोग, काळजाचे दर्द, ज्वर, अर्धशिशी, मूत्राशयांतील रोग, मस्तक शूळ, मूळव्याध, आणखी इतर होणारे रोग देखील निवारण केले जातात. अशी गुणकारी, सर्व रोग शमन करणारी, आंगावर सुशोभित दिसणारी ही सर्वांनीं जवळ असावी हें योग्य आहे. ही ब्याटरी एकदां घेतली ह्मणजे आयुष्य भराची खटपट चुकली.

गुणाबद्दल हजारों दाखले मिळाले आहेत व मिळत आहेत.

किंमत दर पितळी आंगठीस रु० १॥ व पुतळीस १।, चांदीचे आंगठीस रु०३ व पुतळीस रु० २, सोन्याचे आंगठीस रु० २०; पुतळीस रुपये २२; एक डझन घेणारास एक नग ज्यास्त मिळेल. एकापासून सहा नग पर्यंत ट० ह० सहा आणे. रोख दाम असल्यास किंवा व्ह्या० पे० नें मागविल्यास पाठवूं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवा. विशेष माहिती करितां अर्धीआणा पाठवा.

विकत मिळण्याचा पत्ता—मुंबई—भायखळा दावणी समोर. व पुणें—बुधवार चौकांत. जी. बी. नाईक आणि कंपनी, दावणी समोर भायखळा मुंबई.

## भारी अजब दवा.

चष्मा लावूं नका.

हें रामबाण औषध फक्त २१ दिवसांत तीव्र दृष्टि करतें. तुह्मांस चष्मा लाविल्या शिवाय जवळचा किंवा दूरचा पदार्थ दिसत नसल्यास हें औषध घ्या. गुणाबद्दल अनेक दाखले मिळाले आहेत. पूर्ण माहिती औषधा सोबत. किं. २ रु. बंगी खर्च ०६ व्ह्या. पे. पाठवूं

पत्ता— ग. स. पाटील. बुधवार पेठ पुणें.

## बहिष्कार

( लिहून आलेला मजकूर )

डा. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनीं आपल्या विधवा मुलीचा पुनर्विवाह केल्याची गोष्ट आमच्या वाचकांच्या लक्षांत असेलच. जरी डाक्तर साहेब जातीनें शेणवी आहेत तरी ब्राह्मणाप्रमाणें त्यांच्याही जातींत पुनर्विवाहाची मनाई असल्या कारणानें, व शेणवी लोक आपल्यास सारस्वत ब्राह्मण म्हणवून घेत असल्या कारणानें, व ब्राह्मणांचे अधिकार आपणांस असावे अशी त्यांची इच्छा असल्या कारणानें, शास्त्रांधारानें पुनर्विवाहाची बंदी असलेल्या जातीस वरील विवाहा पासून उत्पन्न झालेल्या चळवळींत मन घालतां येणार आहे. हा पुनर्विवाह झाल्यावर शेणवी जातीच्या लोकांचीं मनें बरीच क्षुब्ध झालीं व विवाह झालेल्या जोडप्यास, तो घडवून आणणारांस व त्यांस सामील असलेल्या मंडळीस बहिष्कार घालावा ह्मणून सारस्वतांनीं मुंबईस एक सभा भरविली. त्या सभेंत उभय पक्षांचा वादविवाद हात घाईवर येऊन जोडाजोडी पर्यंत मजल येऊन पोहोंचल्यावर कांहींच निकाल न लागतां सभा बरखास्त झाली. येथपर्यंतची हकिकत व 'सुधारक' पत्रांतून पत्रव्यवहार करून पुनर्विवाहास अनुकूळ अशा त्याच जातीच्या लोकांच्या सह्या गुप्तपणें मिळवून त्यांची शंभरपर्यंत संख्या गेल्यावर त्या प्रसिद्ध करून पुनर्विवाह करण्याची चाल प्रचारांत आणण्याची जी खटपट सुरू आहे त्याची हकिकत वर्तमानपत्रें वाचणारास अवगत असेलच. उलटपक्षां कडील लोकही स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं सभेचा निकाल लागल्यावर स्वस्थ न बसतां श्रीकडे झालेली हकिकत कळविली व न्याय देण्याबद्दल विनंती केली. श्रींनीं डा. भांडारकर यांस आज्ञा पत्र धाडलें व झालेल्या गोष्टी बद्दल जाब विचारला व ठरीव मुदतीस जाब न गेल्यास एक तर्फी न्याय द्यावा लागेल असें फर्माविलें. डा. भांडारकर या आज्ञेस जुमानणार नाहींत असें वाटण्यास पुष्कळ जागा होती परंतु आज्ञा पत्रा समान देऊन त्यांनीं जाब पाटविला तो खरोखर मनन करण्या जोगा आहे. सारस्वतां प्रमाणेंच सर्व ब्राह्मणांनीं भांडारकरां सारख्या विद्वान गृहस्थांचे आपल्यावर काय आरोप आहेत ह्याचा विचार करावा. रामकृष्ण पंतांचा पहिला आरोप असा आहे कीं, त्यांच्यावर बहिष्कार घालण्यास धर्मश्रद्धाच कारणीभूत नाहीं. धर्माचा अभिमान ( त्यांच्या ह्मणण्या प्रमाणें चुकीचा कीं असेना. ) जर ह्या बहिष्काराचें कारण नसावें तर दुसरें कोणते असेल तें त्यांचें त्यांसच माहित. सर्व जातीस जर आमच्या डाक्तर साहेबांचें करणें धर्मविरुद्ध दिसत आहे तर खाजगी द्वेष खचीत नसला पाहिजे. अपेयपान व अभक्ष्य भक्षण ज्ञातींत सुरू असून त्या बद्दल कोणीच तक्रार करीत नाहीं व धर्मबाह्य वर्तन केल्या बद्दल त्यांच्यावर आरोप आणणाऱ्यांचें त्याच प्रमाणें वर्तन आहे असेंही रा. भांडारकरांचे म्हणणें आहे. आलेल्या आरोपा पासून सुटका करून घेतल्या खेरीज डाक्तर साहेबांस दोष देणारांस पुढें बोलतां येणार नाहीं. रामकृष्ण पंतांनीं स्वामीस आपल्यावर आरोप ठेवणारांचीं नांवें विचारलीं आहेत व ते असे हा सिद्ध करून देण्यास तयार आहेत कीं फिर्यादींचें वर्तन धर्म बाबींत आपल्या पेक्षां अधिक अक्षम्य आहे. आपल्या पक्षाचा जर खरा अभिमान धरून हा व्यूह रचला गेला असेल तर उलटपक्षांस समोरें उभे राहण्यास ही संधी फार उत्तम आहे असें आह्मांस वाटतें. संमती वयाच्या बिला विषयीं वादविवादाच्या प्रसंगीं आपल्यावर शरसंधान करणाऱ्या पुढें दात टेकण्याचा प्रसंग आला असतांही डा. भांडारकरांनीं आपली पोथी स्वामी पुढें ठेवून पुनर्विवाह सशास्त्र आहे असें प्रतिपादन केलें आहे. पुनर्विवाह सशास्त्र आहे किंवा नाहीं ह्याचा वाद मागेंच होऊन चुकला आहे व त्याची अशास्त्रता जव्यानें प्रतिपादन करण्याची जरूरी नाहीं हें डाक्तर साहेब आजिबात विसरलेसें दिसतें. तरी पण सांप्रतच्या काळास अनुसरून व विचारांच्या मोहींत व आचारांत झालेल्या फेर बदलाचें मनन करून श्री जवळ परवानगी मागणें हा भाग वेगळा आहे. सत्याचें असत्य किंवा असत्याचें सत्य करून दाखविण्यापेक्षां याचक वृत्तीचें अनुकरण करणें नीतिमान विद्वानांस योग्य दिसणार आहे.

डा० रामकृष्णपंत आपला पुरावा श्री पुढें ठेवूनच थांबले नाहींत. आपल्या विद्वत्तेस अनुसरून त्यांनीं श्रीस दोन उपदेशाच्या गोष्टीही सांगितल्या आहेत. ते ह्मणतात कीं, स्वामींनीं पुनर्विवाहाची परवानगी शास्त्राज्ञेप्रमाणें द्यावी. व लोकमत ह्या गोष्टीस जर उलट असेल तर बालविधवांस तरी पुनर्विवाहाची परवानगी द्यावी. आह्मी असें ह्मणतों कीं, शास्त्राज्ञा जर खरोखरच ह्या विषयास अनुकूळ आहे तर लोकमताकडे लक्ष देण्याचें काय प्रयोजन आहे. आपल्या बालकन्या विधवेचा विवाह झाला आहे ह्मणून तेवढ्या पुरतीच परवानगी मागून पक्षपाताचा आरोप आपणावर ओढून घेण्याला ते खचीत तयार नसतील. परंतु असा आरोप त्यांच्यावर येण्याचा विशेष संभव आहे. ही परवानगी देण्याची स्वामींची इच्छा नसेल तर त्यांनीं स्वस्थ बसावें व जातींच्या मर्जीवर हें बहिष्कार प्रकरण टाकावें असेंही डाक्तर साहेबांचें ह्मणणें आहे. व शेवटीं असें स्पष्ट सांगितलें आहे, कीं, ह्या गोष्टी श्रींच्या हातून होत नसतील तर त्यांनीं आपल्यावर बहिष्कार घालून खुशाल वाळींत टाकावें ह्या एकंदर प्रकरणावर स्वामी काय आज्ञा देतात हें पहाणें आहे.

वऱ्हाडसमाचार

मिति आश्विन वद्य २ शके १८१३

म्याट्रिक्युलेशन परीक्षा सध्यां होत असते तीत पसार झालेले विद्यार्थी कालेजांतून शिकण्यास असमर्थ असतात त्याचें कारण असें सांगतात कीं त्यांस इंग्रजी भाषा चांगली येत नसते व त्या मुळें प्रोफेसर लोकांचीं भाषणें सहजी न कळतां त्यांचें विद्यार्जन अनेक प्रकारें नीट चालत नाहीं. तेव्हां नवीन सुधारणा करण्याचें युनिव्हरसिटीच्या सिनेट पुढें प्रकरण निघालें आहे त्यांत एक सूचना अशी आहे कीं इंग्रजींत दोन कागद, संस्कृतादि मृतभाषांतून एक कागद व देशी भाषातून एक कागद असावा हल्लीं फ्रेंच व परिशियन या दोन चालू भाषा परीक्षेच्या दुसऱ्या भाषेच्या ऐवजीं चालत असत. त्या या सूचने प्रमाणें तशा चालणार नाहींत. त्यांचा देशी भाषांत समावेश केला जाईल. या फेरफारा मुळे फ्रेंच व परशियन भाषा घेणाऱ्या विद्यार्थ्यांस आणखी तिसरी मृतभाषा घ्यावी लागेल आणि तेणें करून म्याट्रिक्युलेशनचे अभ्यास फार वाढले जातील म्हणून कांहीं लोकांची मोठी ओरड आहे. मराठी गुजराथी, वगैरे देशभाषा युनिव्हरसिटी परीक्षेंत घातल्यानें एक प्रकारें लोकांस फार आवडेल व वरील सूचनेस कोणीही या संबंधानें व्यत्यय आणणार नाहीं तरी एकंदरीनें अभ्यासाचे विषय फार वाढविले जाऊन कांहीं अंशी उंच प्रतीच्या शिक्षणा संबंधानें वरील सूचना प्रतिरोधी होईल. परंतु नवल हें वाटतें कीं ज्या हेतूस्तव ही सुधारणा मांडली आहे तो यत्किंचितही या व्यवस्थेनें साध्य होण्या सारखा नाहीं. इंग्रजी भाषा चांगली अवगत नसते ह्मणून आणखी एखादी नवी भाषा परीक्षेंत सामील केल्यानें इंग्रजी ज्ञान कितपत वाढणार आहे हें उघड कळण्या सारखें आहे. वरील सूचनेचा विचार डिसेंबर महिन्यां पर्यंत सध्यां तहकूब करण्यांत आला आहे.

सध्यां मॅट्रिक्युलेशन परीक्षेस हेडमास्तरांच्या परवान्या शिवाय व हायस्कुलांत अभ्यास केल्या शिवायही खानगी रीतीनें उमेदवारांस जातां येत असे परंतु या सवडीमुळें विद्यार्थी फार कच्चे येऊन उमेदवारांची संख्या वाढवतात व आपल्या पैशाचा व्यर्थ परीक्षेच्या पायीं दुरुपयोग करतात असा हल्लीं अनुभव आला आहे. ह्मणून वरील सिनेट पुढील सूचनेंत एक जास्त कलम घातलें आहे कीं या पुढें मॅट्रिक्युलेशन परीक्षेस येणाऱ्या विद्यार्थ्यांनीं हेडमास्तरांचा परवाना व शाळेंत हजर असल्याचा दाखला दाखल केल्या शिवाय त्यांस परीक्षेस बसण्याची मनाई असावी. ही सूचना सर्वांस मान्य असल्यामुळें ती चालू साल अखेर पसार ही करण्यांत येईल.

परशियन व फ्रेंच भाषांविषयीं प्रतिकूल मत पारशी मंडळींचें व अलीकडे फ्रेंच भाषा दुसऱ्या भाषेच्या ऐवजीं शिकणाऱ्या उमेदवारांचें आहे त्यांत पारशांतील सुशिक्षित व पुढारी कांहीं लोकांनीं असें आग्रहानें सांगितलें आहे कीं पारशी लोकांची हल्लींची गुजराथी भाषा फार अशुद्ध आहे तर ती शुद्ध व प्रौढ होण्यासाठीं मॅट्रिक्युलेशन परीक्षेस अवश्य कायम ठेवावी ह्मणजे परशियन भाषेच्या नादीं न लागतां पारशी विद्यार्थी गुजराथी भाषा शिकतील. फ्रेंच भाषा हल्लीं दुसऱ्या भाषेच्या ऐवजीं घेतां येत असल्यामुळें युरोपियन विद्यार्थी तिचा पुष्कळ फायदा करून घेतात आणि एखादी मृतभाषा शिकण्याचे श्रम वांचवितात त्यांना फ्रेंच भाषा सर्व युरोपखंडांत चालूं असल्यामुळें फार सोपी जाते तेव्हां त्यांना नवीन सूचने प्रमाणें लॅटिन ग्रीक वगैरे मृत भाषा शिकाव्या लागतील.

नामदार तेलंग, मोडक प्रभृति लोकांचे विचार बाहेर आले आहेत त्यावरून असें कळतें कीं सिनेट पुढील प्रस्तुतची सूचना निवळ इंग्रजी अभ्यासाची सुधारणा करण्याची नसून एकंदर मॅट्रिक्युलेशनच्या यत्तेच्या विषयांत सुधारणा करण्याची आहे. आणि ह्मणूनच इंग्रजी दोन पेपर ठेवून चालू भाषांपैकीं एक तिसरी चालू भाषा नवीन घालीत आहेत. अभ्यासाच्या बाहुल्याकडें दृष्टि न देतां फक्त सुधारणेकडे दृष्टि ठेविली तरी म्याट्रिक्युलेशन परीक्षे पूरती ही सुचना असल्यामुळें व तिसऱ्या चालूं भाषेचा कालेजांतील अभ्यासांत गंधही नसल्यामुळें ही सुधारणा कितपत ग्राह्य आहे या विषयीं बहुत विद्वानांला मोठी शंका आहे.

सन १८९२ सालीं राष्ट्रीय सभेची बैठक विलायतेस भरविण्या विषयीं कलकत्यास सर्व जणांचा संकल्प ठरला होता आणि प्रांता प्रांतातून विलायतेस जाणाऱ्या सद्गृहस्थांचीं नांवें येत्या नागपूरच्या समारंभाच्या समयीं प्रसिद्ध व्हावयाचीं होतीं. परंतु इंग्लंड येथील राष्ट्रीय सभेच्या ब्रिटिश कमिटी कडून कळविण्यांत आलें आहे कीं ज्या अर्थी पुढील सालीं पार्लमेंटांतील सभासदांच्या नवीन निवडा निवडीची गडबड सर्व ग्रेटब्रिटन भर उन्हाळ्याच्या सुमारास होणार आहे आणि त्या धामधूमति इंडियाच्या राष्ट्रीय सभेचा विषय बाजूस ठेविला जाईल त्या अर्थी १८९२ सालची बैठक विलायतेस भरवूं नये परंतु त्याच्या पुढील वर्षीं भरविण्यांत यावी. पार्लमेंटांत लिबरल पक्षाचा विजय होईल असा बहुत जणांचा अभिप्राय पडतो तेव्हां तसा सुदीन प्राप्त झाल्यास १८९३ तील राष्ट्रीय सभेची विलायतेंतील कामगिरी फार उत्तम प्रकारें फलद्रुप होईल. या नवीन फेरफारामुळें आपणांस वेळ पुष्कळ मिळाला आहे त्याचा आपण पूर्णपणें उपयोग करून घेतला पाहिजे.

नागपूराच्या राष्ट्रीय सभेचा सातवा समारंभ मोठा टोलेजंग होईल असें दिसत. त्या समया निमित्त सर्व हिंदुस्थानांतील मुत्सद्दी लोक जमतील त्या वेळीं पूर्व संकेता प्रमाणें विलायतेस जाणाऱ्या लोकांचीं नांवें बाहेर यावींत म्हणजे त्या पासून चांगला फायदा होईल. हे लोक शंभर तरी निदान पाहिजे आहेत त्यांच्या खर्चवेंचा साठीं राष्ट्रीय सभेस निराळा किती पैसा गोळा करावा लागेल याचा ही अंदाज करण्यास ठीक पडेल. विलायतेस जाणारे प्रतिनिधी शंभर मिळाले नाहींत तर कांहीं विशेष तजवीज केली पाहिजे. विद्वान व श्रीमान अशा देशभक्तांचें हें काम आहे आणि त्या शिवाय ते चांगले वक्ते पाहिजेत. एक वर्षाची मुदत मिळाली म्हणजे या मंडळीस आपल्या विषयाचा नीट अभ्यास करून सर्व शस्त्रात्रें सज्ज ठेवितां येतील. विलायतेस राष्ट्रीय सभेची बैठक भरणार आहे त्या वेळीं प्रांताप्रांतांतील सर्व तपशीलवार हकिकती इंग्रज लोकांस कळवून नंतर राष्ट्रीय सभेच्या मागण्या काय काय आहेत हें सांगितल्यानें समर्पक व सबळ पुरावा दाखल केल्या सारखें होणार आहे. येत्या नागपूरच्या बैठकीस विलायतेस १८९३ त करावयाच्या कामांची फेरीस्त बाबू सुरेंद्रनाथ बानरजी सारख्या अनुभवी गृहस्था करवीं लोकां पुढें मांडली गेली पाहिजे.

नागपूरच्या समारंभाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्या विषयीं कांहीं जणास विचारण्याची वाटाघाट चालली आहे त्यांत अल्हाबादचे पण्डित अयाध्यानाथ व मद्रासचे गृहस्थ सुब्रमण्णायर या उभयतांचीं नांवें बाहेर आलीं आहेत. दोघे ही हिंदुस्थानांत सुप्रसिद्ध आहेत. त्यांच्या अलौकिक गुणवैभवानें व असामान्य मुत्सद्दीपणानें ते राष्ट्रीय सभेचे मुख्य मुख्य मोहरप्या पैकीं आहेत तेव्हां त्यांची निवड सर्वांस पूर्ण मान्य होईल यांत काडीमात्र संदेह नाहीं. तथापि पण्डित आयोध्यानाथ हे राष्ट्रीय सभेचे कायमचे दुय्यम सेक्रेटरी आहेत ह्मणून मद्रासचे श्रेष्ठ गृहस्थ सुब्रमण्णायर यांसच हें स्थान देऊन मद्रासी मंडळींचा बहुमान होणें फार अगत्याचें आहे.

नागपूरच्या समारंभानिमित्त काम फार तडाक्यानें चाललें आहे आणि ही त्या शहरची पहिली बैठक नांवाजण्या सारखी होईल असा सुमार आहे. नागपूरकरांनीं अव्याहत श्रम चालविले आहेत आणि त्या बद्दल सर्व देश त्यांचा ऋणी आहे. वऱ्हाडच्या मंडळींनीं शेजारधर्माला अनुसरून मोठी मदत देण्याचा वांटा उचल-आहे. परंतु हा काल सोळा हजार रुपयांपैकीं वर्गणी काय ती पांच हजार गोळा झाली आहे आणि अवधि तर सगळी दोन महिन्याचा राहिला आहे. लग्नाच्या वेळीं जशी सर्व तयारी सोळा आणे होऊन फार स्वल्प अवकाशांत होते त्या प्रमाणें आमची वऱ्हाडी मंडळी सर्व थाट उडविणार आहे असा रंग दिसतो.

कमिशना समोर निजाम सरकारची हिऱ्याच्या प्रकरणांत साक्ष पुरी झाली. निजाम सरकारानें ही साक्ष देण्याची गोष्ट कबूल केली ती त्यांनीं जेकब सारख्या गोऱ्या मनुष्यावर अन्याय होऊं नये आणि एकंदरीनें न्यायदेवतेस तिचा हविर्भाग संपूर्ण मिळावा ह्मणून केली. तेव्हां निजाम सरकारच्या फेर तपासणीच्या अखेरीस आरोपीचे बारिस्टर इनव्हारिटी यांनीं कलकत्ता हायकोर्टा समोर न्यायाधीशा समक्ष कांहीं प्रश्न विचारावयाचे आहेत ह्मणून तेथें येण्याची मेहरबानी करण्याविषयीं निजाम सरकारास विज्ञप्ती केली. ऊंस गोड झाला तरी मूळा सकट खाऊं नये हें धोरण सोडलें ह्मणजे याचकवृत्ती विफल होते त्या प्रमाणें विनंती मान्य करण्यांत आली नाहीं. निजाम सरकारची स्वारी कलकत्यास जावयाची ह्मणजे त्यांच्याइतमामाप्रमाणें मनस्वी खर्च होईल व सर्व संस्थानचा कारभार ही अव्यवस्थित होईल तेव्हां अडक्याचा हत्ती आणि शकड्याचा खर्च असा प्रकार होऊं दिला नाहीं ही आनंदाची गोष्ट आहे.

रा. रा. वामन अबाजी मोडक एलफिनस्टन हायस्कूलचे प्रिन्सिपाल यांनीं ‘ खरा प्रकार ’ नांवाच्या मासिक पुस्तकावर अब्रूनुकसानीची फिर्याद केली होती तिचा निकाल गेल्या आठवड्यांत झाला. राजश्री वामनराव हे प्रार्थना समाजाचे अध्वर्यु, खरे सुधारक व संमतीवयाच्या बिलाचे मंडनकर्ते असे आहेत. त्यांचा वर्तनक्रम लोकांस आवडला नाहीं. कित्येक लोकांनीं द्वेषबुद्धीनें त्यांच्या कुटुंबा संबंधानें अति निंद्य व अमानुष अफवा पसरली असें फिर्यादीचें ह्मणणें आहे. पुढें ‘ खऱ्या प्रकारा ’ नें त्या बातमीच्या बळावर एक मोघमांत लेख प्रसिद्ध केला. तो लेख फिर्यादीच्या आप्तस्नेही व परिचित वगैरे मंडळीस त्यांच्या अब्रूस कालिमा आणणारा वाटला. ही गोष्ट अब्रू नुकसानीच्या फिर्यादीस पुरेसा पुरावा आहे.

लेखाचा विषय न उच्चारण्या सारखा आहे. राजश्री मोडक यांनीं आपल्या सुधारणेच्या विचारा प्रमाणें आपल्या उपवर मुलीचें व प्रौढ मुलींचीं लग्नें जुन्या पद्धती प्रमाणें केलीं नाहींत. मुलामुलींस इंग्रजी विद्येनें संस्कृत करून ज्ञान भूषणांनीं अलंकृत केलें आहे. मातापित्यांच्या शिक्षेंत वागणाऱ्या अशा दोन बहिणभावंडास अनुलक्षून अमानुष कामलीलेची कंडी उठली आणि परिणामीं त्यांच्या आत्महत्येची ही बातमी पसरली होती. असल्या अघोर व चाण्डाळ लेखा मुळें राजश्री वामनरावांची नैसर्गिक गांभीर्यवृत्ति नष्ट झाली व त्यांच्या शांत व निरुपद्रवी स्वभावाची कडेलोट झाली हें साहजिक आहे. पितृवात्सल्यानें मुलामुली विषयीं छळकारक निर्मूळ अपवाद सहन न होऊन त्यांनीं फिर्याद केली आणि त्यांत जयश्री मिळविली. या मुळें त्यांच्या मनाला थोडा विसांवा व शांतवन मिळेल. त्यांच्या कुटुंबाचा लौकिक निष्कलंक आहे हें न्याय कोर्टानें ठरविलें आहे. मुलामुलींच्या आयुष्यांतील आरंभास ऱ्हासकारक व लांछनास्पद डाग लागला होता तो अक्षरशः खोटा आहे असें ही सिद्ध आहे. खरा प्रकारा ’ चा लेखक विनायक नारायण भाटे यांस त्याच्या पश्चात्तापरहित व दुष्ट मनोविकृती बद्दल तीन महिन्याची साधी कैद व ३०० रुपये दंड झाला आहे. छापणारा आत्माराम कान्होबा यांस दुःख प्रदर्शित केल्यावरून माफी मिळाली होती तरी माजिस्ट्रेटांनीं ५० रुपये दंड केला.

The Berar Samachar

MONDAY, OCTOBER 19, 1891

The National Congress has cast its roots deep and wide in the energies of the Natives in their onward movements to political rights and privileges. Within the short period of nearly seven years of its existence it has become a power in national life of India. It is the acknowledged organ of liberal politicians who promise to assume a delegated advocacy in the Court and Council of the Indian Government. These leaders of the masses would represent interests and would secure in no distant future the confidence of the ruling 'exiles of the land' in their deliberations of public concern. Lord Lansdowne has rightly followed in the wake of Lord Ripon and Lord Dufferin to admit the growing and developing activities of a political life which has dawned upon India through the agency of wide-spread education and liberal policy. The Viceroy has amusingly compared the Congress-wallas to the advanced liberals in the parliamentary arena of Great Britain. If it was meant in the comparison to throw cold water on the progressive programme of the Congress as unaided by the views and energies of the masses it was an aim too wide to hit at the stern and real facts. All people— of course those who are competent to know something —hold that in politics they are not a whit better than the antique Englishmen of Henry III's time. There are neither whigs nor tories in India. The Government is stranger to the people's wants and the people find further no listening ear to hear their complaints from time to time. In short we want a voice with the Government. Our programme is arranged from no party politics. The cause which the National Congress propagates is for the acceptance of all right men of all shades of views though it receives a cordial welcome with the statesmen of liberal opinions. India owns a sovereign from a nation of a worthy constitution hoary with age and renown. But in her land of actual Government she possesses a Mogul aristocracy which the Anglo-Indian is fighting a deadly fight to preserve in its entirety. Hence arises the futility of the limited movements of the National Congress. The Congress has observed it long ago and has widened deliberately its programme to carry the political crusade to the fountain head from which the ruling powers in India are supplied with their life and water. Babu Surrendra Nath Bannerji whose name is a spell with the Congresswallas—was the grand pioneer in England. He bombarded the superstitions of the true Englishmen of the type of Lord Salisbury's son about the *barberous* millions of India. He presented in a nutshell the pure and simple aims of the

Congress with a sterling conviction to his audience. Messrs Mudholkar R. N. and Joshi M. V. have done the yeoman's service in his train.

The unqualified success of this patriotic mission emboldened the Congress to advance a step further. At its last sessions at Calcutta it was unanimously resolved to hold the gathering of the Congress of 1892 in England. The resolve was in perfect unison with the instructions of the British Committee in England. We then agreed to make public at the next sittings the names of those worthies who would go to London in a number not less than one hundred. In that proposal was noted a provision that all things must continue to be convenient. This proviso had no reference to any difficulty or objection that will beset the starting of such champions. It referred to the political aspects of Indian affairs under the auspices of the British Committee. The apprehension proved too true. There is most likely to be electioneering commotion in England in the next year. The people will be occupied with their own elections and meetings. Their minds being engrossed by the all-absorbing topics of their party warfare the Indian Congress can hardly claim any reasonable portion of their time and attention. So the British Committee have decided to postpone the London Congress to the year 1893.

The Congress at Nagpur will feel naturally that a trying and ennobling duty is postponed to a year more. We have thus lost in time. We ought to gain in work; otherwise will ensue the grand failure of a scientific truth. What will be our next programme? We think we should not defer to announce the would be delegates to London. By so circulating their names we would be fastening our dear trusts upon them. They too will take good time to hold themselves ready to perform the commission. They will enlighten their ideas with the deep and minute study of their own mission. The British Committee have instructed to ask such patriots to collect and marshal the facts that should detail the special short comings and defects in the administration of the several provinces they will represent. The time has come when we should descend from generalities to particularities of the united nationalities of India. We hope something of the sort will be done even at Nagpur. Besides the Congress will know what funds its managers will have to accumulate from the supporters. So this postponement will evidently be a nice advantage if we turn it to account. Some newspapers have further advised these voyagers to Europe to arrange for a journey to Chicago to witness the Exhibition of the World's Fair in 1893.

---

The total number of registrations was 28,289, less by 3,477 than in 1889-90. The number of compulsory registrations was 21,519 and of optional —immovable and movable— 4,812 and 1,845 respectively, compared with 23,234, 6,409, & 1,932 in the year next preceding. Therefore there has been a decrease all along with the line, but particularly in compulsory registrations and in optional registrations relating to immovable property. To find out a true explanation of this decrease the Resident has directed a careful comparative analysis to be made of the registration in the districts of Akola, Amraoti and Ellichpur, in which the greatest variations have occurred, and he hopes that some further light will thereby be thrown on the subject. For the efficient work of registration it is arranged with the approval of the Resident to substitute salaried for ex-officis Registrars for Yeotmal, Darwha, Wun and Mungrul at an increased cost of Rs. 115 per mensem. The Commissioner has well attempted to facilitate and regulate the inspection-work of the Inspector-General. The latter will find little to improve in the inspections by district Registrars as they have over—dozed the department with frequent visits and uncalled —for remarks.

---

We quote below a passage from a daily paper for the perusal of those who hold that the present transfer of land in Berar into the hands of the money lending class is not so great an evil as is represented to be. We would request them to study it in a manner to hold a comparison between the Punjab and Berar Provinces....

"The Pioneer in a recent leading article discourses powerfully upon the actions of the moneylending classes in the Punjab and the gradual alienation of the land from the hands of its former proprietors. The last Civil Justice Report, it says, teems with references to the craft, forgeries and deceits practised by members of the moneylending tribes on their clients and one of the most experienced and capable judicial officers in the Punjab, himself a Punjabi Mahamedan, Sardar Mahamed Haidkhan C. S. I. has not hesitated to express his opinion that that the increasing transfer of land from the hands of its ancient proprietors constitutes a serious political danger. One circumstance which during the last few years, seems unquestionably to have depressed the condition of the peasantry of the Western Punjab is the enormous export of wheat. The cultivator himself rarely stores his grain. These stores have disappeared under the influence of a keen demand for the Europe market and high prices and there is very little grain kept in stock compared to what there was formerly. The moneylender can sell his grain for ready-cash, and if he parts with it, to a customer he must either feel very sure that he will get its full value back by securing high interest and ample security he wishes to get his client more deeply involved in debt so as to obtain a lien on his land. The increasing stringency in the terms of loans is a feature which is said to strike every one who has moved about the country and studied the rural economy. Its effect is most grievous, of course, upon the menial classes and the poor agriculturist. It has to some extent neutralized the advantages arising from improved communications.

Calamities which affect the upper classes only have a little effect on the political stability of a country:...

"Princes or lords may flourish or may fade! A king can make them as a king has made" but the experience of every country shows that when the food-supply of the masses is restricted discontent and crime are rife.

Another cause which has no doubt embittered the relation between agriculturits and the money-lending class of late years is the effect of the recent decisions of the Chief Court tending to make the law more severe in its operation upon the debtor... ... ... ... Under such decisions it has been ruled that the disqualification under the Punjab laws act "does not extend to incapacitating a person, otherwise competent to do so, from contracting debts or that it exempts his property from the liability to which it is ordinarily subject of being applied to the discharge of his debts by process of law." In the face of this ruling it is hopeless to interfere to save an old family from ruin, even though the effect of it, as every district officer knows, is to add unpopularity to our rule. It is in this way by the increasing rigidity diminished flexibility of our law as applied to tribes still rude and a little advanced in modern ideas that we are losing our hold upon the people, which loss of influence mainfests itself in increased lawlessness. It is by the attitude of the tribes of the Western Punjab that our success or failure in the coming struggle will largely be determined. It is little to their advantage that we have substituted a light and fixed assessment for the enormous and irregular demands of former rulers if we allow our benefits to be nentralized by the exactions and oppressions of a class which owes its existence to British rule."

Side by side with the above quotation the learned opinion of Mr. H. E. M. James, Commissioner of Sind on the indebtedness of the Sind Zemindari is evidently of strong support and certain conviction. We give below the main point in his observations from which one can gather something to enable himself to judge of a similar condition if it be in existence in the province where he resides and possesses all his estate.

"What our law, and what our procedure then doce, is this: The bunnia produces his deed in the court and the court accepts it as sufficient proof that the debt is really the amount stated in the bond. There was agrarian trouble in the Deccan sixteen years ago and the Government passed an Act ordering that when a money-lender applies for the recovery of a debt from a land-holder that the history and merits of the case should be gone into. Now, to one who is not lawyer, like myself, it would seem the natural business of a judge to go into the history and merits of every case, or how can he pass a just decision? But in India generally we require no history, and no merits, the plaintiff has a paper, and that is considered conclusive evidence. This I know works terribly badly. The bunnia goes into court files his document, there is a nominal notice sent to the defendant, & very often I have reason to believe that although by law great care should be taken to make sure that defendent is given it, the notice does not reach him. Even if it did the Zemindar would do nothing, as he feels he is helpless, so judgment goes by default."

## वऱ्हाड

हवामान—शरदृतूची गुलाबी थंडी, चित्त नक्षत्राचें कडक ऊन, कोजागरी पौर्णिमचें अमृतस्रावी चांदणें या समुच्चयानें पावसाळ्याच्यां नानाविध त्रासा पासून मुक्तता झाली आहे, पित्तपाणी पूर्ण जमांत आहे, व रोगादि मृत्यूच्या फौजेनें आपला तळ उठविला आहे हें पाहून सर्व जन आनंदमुद्रेनें दिवाळीचे लक्ष्मीपुजनाच्या व्यवस्थेंत तल्लीन झाला आहे. ऋतुंत फरक झाल्या मुळें पडसें खोकला वगैरे क्षुद्र उपाधींनीं उचल घेतली आहे तरी त्यांस कोणी जुमानीत नाहीं. एकंदरीनें दिपवाळीच्या पाडव्याचे नवें वर्ष वऱ्हाडांतील लोकांस चांगलें लाभेल अशी लक्षण दिसत आहेत.

मि. सी. एफ एरस्कीन अफि० असि. सुरिन्टेंडन्ट वर्ग १ इंडियां सर्व्हे डिपार्टमेंट यांची नेमणूक मुलूख अमानी हैद्राबादच्या इलाख्यांत सर्व्हे आफिसरांच्या स्थानीं झाली असुन तारीख ४ आगष्ट पासुन त्यांचा पगार या जागेवरील आकारला जाईल.

दैव उफळून अचानक दौलत मिळावी म्हणन या तालुक्यांतील खेरड्याच्या पाटलीणीनें एका पायाळूंच्या भरवंशावर मनुष्यबळी दिला म्हणून तिला व तिच्या साथीदारांस फाशीची शिक्षा सेशनांत झाली होती परंतु हायकोर्टानें प्रत्यक्ष पुरावा पुरेसा नसल्या मुळें फांशीची शिक्षा कमी करून काळेपाणी वगैरे सौम्य शिक्षा फर्मावल्या या खटल्यांत राजश्री गणेश श्रीकृष्ण खापर्डे मि. जी डब्ल्यू. लीच या उभयतांनीं आरोपी तर्फे वकिली पतकरली होती.

रा. रा. सुब्रायल नायडू तहशीलदार मोर्शी यांच्या फडणिशी बाण्यावरून व खनिसुमारीकडील विपूल माहितगारी वरून उमरावतीस चालूं महिन्या अखेर संपणाऱ्या खानेसुमारीच्या कामानिमित्त बोलावण्यांत आल आहे. या बहुसाळ हुशारी निमित्त त्यास एक्स्ट्रा असि. कमिशनर नेमणार आहेत अशी आनंदाची बातमी 'प्रमोद सिंधु' कर्ते कळवितात.

प्रत्येक तहशिलींत कारिस्टखात्या मार्फत एकेक नवीन कारकून नेमण्याची योजना चालली आहे असें ह्मणतात.

प्राथमिक शिक्षणांत विनाकारण ईयत्तांचे अभ्यास वाढले आहेत आणि त्यांचा उच्च शिक्षणास व्यत्यय येतो असा कित्येकांस अनुभव आल्यावरून एक अर्ज उमरावतीकरांनीं डायरेक्टर रावबहादूर जठार यांजकडे रवाना केली आहे. तपशीलवार माहिती कळेल तशी प्रसिद्ध करूं.

गेल्या दसऱ्याच्या दिवशीं येथील वे. शा रा. रा. बाबानी अग्निहोत्रि हे स्वर्गस्थ झालें ब्राह्मण चांगला कर्मठ होता. वैदिकांत व पुराणिकांत यांची गणना उच्चस्थानीं होत असे. बारावर्षां जवळ जवळ उपवासाच्या फराळावर हे राहिले. भिक्षुकी पुराणपटण, वैद्यकी वगैरे बहुत प्रकारांनीं तीन चार हजारावर विषय साठविला होता आणि तो यज्ञांत ते खर्चणार होते मरणाला निरुपाय होऊन त्यांनीं तो यज्ञ पश्चात् दुसऱ्याकडे सोपविला आहे.

---

### नोटिस.

दगडू वल्लद शहादाप्पा कानडी राहणार आंदरसूळ तालुके येवले जिल्हा नासिक यांस नोटीस देणार एकनाथ आत्याबा सोनार हल्लीं राहणार अकोलें वऱ्हाड नोटीशीनें कळवितों कीं, आह्मी तुह्मास आमचे अंदरसूळ येथील घर रुपये ६७९ स तारण गाहण देऊन तुमचे रुपये दरसाल ७९ प्रमाणें देऊन फेड करावी. अशा करारानें दिले व याजबद्दल रीती प्रमाणें दस्तैवज रजिष्टर करून तुह्मास दिला आहे. आतां तुह्मास आह्मी तारीख १४ माहे मे सन १८९१ इसवी रोजीं सदर्हू रुपये ६७९ बद्दल तोड करून रुपये ३९० देऊन सर्व निकाल केला व त्याज बद्दल तुमची पावतीही तुह्मी दिली आह्मापाशीं आहे. आतां आम्ही तुम्हास दस्तैवज रजिष्टर करून दिलेला तुम्ही आम्हास गांवीं गेल्यावर पाठवितों म्हणून सांगितलें व पावतींतही लिहून दिलें आहे. परंतु हा वेळ पावेतों सदर्हू दस्तैवज आपल्या कडून परत मिळाला नाहीं. याज करितां ह्या नोटिसीनें असें कळविलें जातें कीं, तुम्हापाशीं आमचा गहाण रजिष्टर केलेला दस्तैवज पोकळ राहिला आहे. त्याजबद्दल आम्ही तुमचें कांहीं देणें नाहीं. तर तो दस्तैवज आम्हास नोटीस पावल्या पासुन चार दिवसांत पाठवून द्यावा. आम्ही तुमचे कोणच्याही प्रकारचें एक कवडी सुद्धां देणें नाहीं म्हणून दिली नोटीस दिली सही. तारीख १८ माहे अगष्ट सन १८९१ इसवी.

[ सही ]

एकनाथ आत्याशेट सोनार आंदरसुल
हल्ली वस्ती अकोलें वऱ्हाड
दस्तुर खुद्द.

---

## वर्तमानसार.

रूसदेशानें ह्या वर्षी लढाईची तयारी मोठ्या जारीनें चालविली आहे व त्या साठीं ६० कोट काडतुसें बनविण्याचा हुकूम सुटला आहे. इतक्या तयारी प्रमाणें कोठें तरी युद्धानल पेटल्या शिवाय राहणार नाहीं असें अनुमान आहे!

देशीकंपनीः--कलकत्याहून मिदनापूर व तसेंच रंगून व असाम इकडे फेऱ्या करण्यासाठीं आगबोटी ठेवून व्यापार करणारी अशी एक "स्टीमन्याव्हिगेशन कंपनी" स्थापन करण्याचा विचार कलकत्याचे सुप्रसिद्ध व श्रीमान्गृहस्थ सरयतींद्रमोहन टागोरप्रभृतींनीं ५ लाख रुपयांचें भांडवल काढून अमलांत आणण्याचें ठरविलें आहे. ह्या कंपनीच्या आगबोटीवर सर्व नोकर एतद्देशीयलोकां शिवाय इतरांस ठेवावयाचें नाहीं असाही ठराव करण्यांत आला आहे अशा प्रकारचा यत्न आजपर्यंत कोणाकडूनही झाला नाहीं.

पेस्तर सालापासून मद्रास रेलवे कंपनीनें स्वदेशीच कागद वापरण्याचा विचार केला आहे हें पाहून आनंद वाटतो.

धान्याच्या उदम्यांनीं धान्य एकाच दरानें विकावें असा इंदुरास ठराव झाला ह्मणतात.

चलनी नोटांचा मध्यभाग--कधीं कधीं चलनी नोटांचा अर्धा तुकडा हरवला जातो, असें झाल्यास बाकी राहिलेला तुकडा करन्सी आफिसांत हजर केला असतां कांहीं दिवसांनीं सदर नोटांचे रुपये मिळत असत. सांप्रत सरकारोंने असा विचार केला आहे कीं या अर्ध्या तुकड्याबद्दल अर्धे रुपये देण्यांत येतील आणि अर्धे रुपये सरकार जमा होतील ! ! !

विद्युच्छस्त्रज्ञ मि. एडिसन यांनीं फोनोग्राफ तयार करून आपली अद्भुत कल्पनाशक्ति लोकांच्या निदर्शनास आणिलीच आहे. सांप्रत त्यांनीं तारेच्या द्वारें लिहिण्याचें यंत्र तयार केलें आहे. यानें पाहिजे त्या ठिकाणाहून पाहिजे त्या ठिकाणास गांवास स्वदस्तुरचें पत्र तारेच्या योगानें तत्काळ लिहितां येतें याची योजना अशी केलेली असते कीं, तारांच्या टोकांस शाई भरलेल्या लेखण्या जोडलेल्या असतात व पत्र पाठविणारा ज्या वळणाचें अक्षर एका टोकास काढितो, तसें अक्षर दुसऱ्या गांवीं त्या ठिकाणच्या टोकांस त्या लेखण्यांतून तत्काळ उमटतें! हे सगळे विजेचे खेळ आहेत. एडिसनची योजना थक्क करून सोडणारी आहे. क०त०

हिंदुस्थानचे गव्हरनरजनरल लॉर्ड लान्सडौन हे लौकरच विलायतेस परत जाणार व अर्ल आफ् काव्हेंट्री हे गवर्नर जनरल होऊन येतील असा संभव असल्याचें इंडि० डेली न्यूसेंन लिहिलें आहे.

कट--वाई प्रांतांतील न्हावी लोकांनीं कुंभाराच्या हजामती करण्याची बंदी केली आहे। निपाणी कडील महार लोकांनीं कसाया जवळील मांस विकत घेऊन खावयाचें नाहीं व गाई विकावयाच्या नाहींत, असा कट केला आहे. दुसरा कट प्रशंसनीय आहे.

सरकारी बंगल्यास आग घातली मद्रासेंत घाट सरीस जंगल खात्यांतून एक सरकारी बंगला बांधिलेला आहे त्या बंगल्यांत जंगला कडील एक सब् असि. कानसरवेटर [illegible]वे गेल्या २७ व्या तारखेस मडमेसह [illegible]रले असतां मध्य रात्रीं त्या बंगल्यास कोणी आग घातली; सुदैवानें ते दंपत्य बचावलें परंतु त्यांचें ४०० रु० चें व सरकारचे सु० १००० रु० नुकसान झालें सरकारी कागदपत्र जळाले ते शिवायच ह्या साहेबांनीं. एका गांवच्या लोकांवर ते सरकारी जंगलांत शिकारीस गेले म्हणून त्यांस पकडून त्यांचीं हत्यारें घेतलीं होतीं, व लोकांनीं साहेबांस लंबे करून आपलीं हत्यारें नेलीं, म्हणून त्यांवर हल्लीं खटला चालविला आहे. तो सूड उगविण्या करितां त्या लोकांनींच आग घालण्याचें हें भयंकर कृत्य केलें असावें, असें मद्रास टाइम्स मध्यें प्रसिद्ध झालें आहे.

वानर म्हटल्या बद्दल १०० रु० दंड-स्टेटसमन वरून समजतें कीं बारीशा येथील ह्रिनानाथ पाल नांवाच्या मनुष्याचा मुलगा येथील शाळेंत होता. त्या मुलाला तो घरीं येत असतां शाळेंतील दुसऱ्या एका मुलानें मारलें, म्हणून बापानें मास्तर जवळ फिर्याद नेली. त्याची दाद मास्तरानें घेतली नाहीं, म्हणून त्यानें मास्तरास. "वानर" म्हटलें. त्या बद्दल त्याला अलिपूरचे माजि० नीं १०० रु० दंड केला ह्या शिक्षेवर आपील झालें आहे.

येणार-- मुंबईंत विलायती व्यापारी आपल्या कापडाच्या गिरण्या घेऊन येणार ही जशी बातमी आहे, त्या प्रमाणेंच बंगाल्यांत ही ते गिरणी घालणार आणि त्या करितां बिनसुरा येथील रिकाम्या झालेल्या बराकी १९ लाख रुपयांस घेण्याचा विचार त्यांणीं केला आहे अशी बातमी लाहोरच्या पत्रावरून समजतें. आमच्या लोकांनीं जागें व्हावें. स० शो०

४६ लाखांच्या हिऱ्याबद्दल जेकब नावाच्या गोऱ्या जवाहिऱ्यावर निझामानें जी फिर्याद केली आहे त्या फिर्यादींत स्वता निझामाची साक्ष होणार हें प्रसिद्ध झाल्यावरून निझामच्या प्रजेनें कुरकुर सुरू केली. राजगादीवर बसणाऱ्या निझामासारख्या बड्या राजानें मानिस्त्रेटापुढें जबानी देणें हें त्यास कमीपणा आणणारें असून आह्मा त्याच्या प्रजेसही कमीपणा आणणारें आहे आणि आजपर्यंत निझामाच्या राजघराण्यांत असा प्रचार कधीं झालेला नाहीं, ह्मणून निझामांनीं साक्ष देण्यास तयार होऊं नये असें त्या प्रजेचें ह्मणणें आल्यावरून निझामांनी आपल्या प्रजेची समजूत घालण्यांकरितां आपल्या सहीचा एक लेख प्रसिद्ध करण्यास आपल्या दिवणास देवून दिवाणानें तो लेख जाहिरनाम्याच्या रूपानें प्रसिद्ध केला आहे. या लेखांत निझाम हे आपल्या प्रजेस सांगतात कीं आजपर्यंतच्या कोणा निझामानें जरी अशी साक्ष दिली नाहीं तरी खरा न्याय होण्याकरितां साक्ष देण्यास मागें सरूं नये अशी कुराणाची आज्ञा असून या कामांत खरा न्याय व्हावा अशी आपली मनापासून इच्छा असल्यामुळें आपण साक्ष देण्यास तयार आहों व आपली साक्ष व्हावी असें आमच्याच वकिलानें सूचविलें असल्यामुळें त्यांत कोणात्याही प्रकारचा कांहीं कमीपणा नाहीं शिवाय निझाम हे आपल्या प्रजेस सांगतात कीं, आपल्या महाराणीचे जेष्ट चिरंजीव प्रिन्स आल्बर्ट जे राणीच्या मागून हिंदुस्थानचे बादशहा व्हावयाचे त्यांणाही कित्येकवेळ कोडतांत साक्ष दिलेली असल्यामुळें मला साक्ष देण्यास कांहीं हरकत नाहीं. अशा प्रकारें आमच्या तरुण निझामांनी आपल्या प्रजेची समजूत केली आहे व त्या कामांत त्यांची साक्ष व्हावयाचीच असल्यामुळें तें त्यांणी चांगलें केलें यांतहीं कांहीं शंका नाहीं.

निझामाच्या फिर्यादी वरून जेकब यास जे कैद केलें त्याबद्दल विलायतेंत वेगळाल्याच गप्पा चालू आहेत. कोणी सांगतात कीं, निझामाच्या खजिन्यांत एक फार मोठा हिरा शिलकेंत पडलेला असून तो विकून पैसे आण असें निझामानें जेकब यांस सांगितलें व एवढा मोठा हिरा विकत घेण्यास आपल्याजवळ गिऱ्हाइक नाहीं असें जेकब याणें सांगितल्या वरून हल्लींचा खटला सुरू झाला आहे. ही गोष्ट अशा रूपानें विलायतेस कशी गेली हें समजत नाहीं. व खऱ्या गोष्टीस विलायतच्या लोकांनी असें रूप दिलें पाहून हसूं येतें.

गया येथील हिंदु व मुसलमानांच्या पुढाऱ्यांनीं आपसांत जो एकोपा केला त्याच्या आनंदाकरितां म्हणून त्यांनीं मागच्या बुधवारीं एक जलसा केला. सगळ्या शहरास बलावणे असून दोन्ही जातीचे हजारों लोक जमले होते. जातिभेद न धर्म भेद मनांत न आणतां ते सर्व एकमेकांत मिसळून तो नाच व इतर गंमत आनंदांत पाहात होते. एकंदरीनें तो सर्व प्रकार कोणत्याही प्रकारच्या गडबडीवाचून अगदीं शांतपणानें शेवटास गेला असें अलाहाबादची तार सांगत्ये हा प्रकार फारच आनंददायक झाला व त्याबद्दल त्या ठिकाणच्या दोन्ही बाजूच्या लोकांची फार फार स्तुती करितों आणि आमच्या इतर हिंदु मुसलमानांनीं या गोष्टीचें अनुकरण करावें अशी विनंती करितो. हिंदु आपल्या देवळांत गेल्यावर आपल्या रामास हाक मारतील व मुसलमान आपल्या मशिदींत रहिमास हाक मारतील, पण देशहितकरण्याच्या नांगराचें जखाड जर तुम्हा दोघांच्याही मानेवर सारखेंच पडलें आहे तर त्यांत तुह्मी आपसांत वाद करूं लागल्यास, नांगऱ्याच्या हातून दोन कोरडे अधिक खाण्यापलीकडे काय फायदा करणार? या करता यापुढें आमचे हे दोघेही बंधु आपसांत वाद करण्याचें सोडून एकोप्यानें देशाचें हित करण्याच्या मार्गें लागतील अशी आशा आहे गया येथील हिंदुमुसलमानांचा हा ऐक्य भाव पाहून आमचे पुणे मुंबईकर पुढारी आपसांतला नव्या जुन्यांतला वाद मोडतील काय?

ठरल्याप्रमाणे बड्या हिऱ्याच्या खटल्यांत मंगळवार पासून खुद्द निझामाची जबानी सुरू झाली व उद्यांही चालवयाची आहे. आरोपी जेकब हजर नसून आजारी ह्मणून मुंबईस राहिला आहे. त्याचा वकील मि. इन्वीरारिटी हजर आहे, जबानी सुरू करण्या पूर्वी निझामांस रीतिप्रमाणें कुराणाची, शपथ दिली. हाच तो हिरा आहे. पसंत झाल्यास घेऊं नाहीं तर परत करूं असा करार होता, व त्याप्रमाणें हा हिरा मला नापसंत झाला व जेकब घेऊन गेला आणि कलकत्यास गेल्यावर घेतलेले २३ लाख रुपये पाठवून देतों असें त्याणे सांगितलें असून मागाहून कित्येक मागणी केलीं असतां रुपये पाठविले नाहींत पतियाळचे महाराज ४० लाखांस घेताहेत, तुमच्या पासून जास्त घ्यावयाचे सहा लाख माझे आहेत असें जेकब ह्मणत होता, तो हिरा ४० लाखांस घेण्याचें साटें करण्याचा माझा गुमास्ता अबिड यास मी अधिकार दिला नव्हता, हें साटें नापसंत आहे असें जेव्हां मी जेकब यांस सांगितलें तेव्हां हिरा मालकास देऊन अनामत रुपये पाठवितों असें तो ह्मणाला व उद्यां कांहीं जवाहीर दाखविण्याला आणतों असें सांगून जो जेकब गेला तो पुन्हा भेटलाच नाहीं, अशा प्रकारची निझामांची जबानी झाली.

उन्टें व दुसरें सामान सुमान पुष्कळ खरेदी करा असा रावळींपडी येथील कामेसरी खात्याच्या अधिकाऱ्यांस जलदीचा हुकूम झाल्यावरून तुह्मी समक्ष हजर होऊन सामान पुरविण्याचें मक्ते घ्या अशा बद्दल कमिसरीखात्यांतल्या कंत्राटदारांस पेशावराहून तातडतोब बलावण्यांत आलें आहे आणि पिंडी येथील बडे कमिसरी कामदार इतक्यांत सिमल्यास जाणार आहेत असें अलाहाबादची तार सांगत्ये. ही तयारी कशाकरतां हें समजत नाहीं पण कांहीं तरी विशेष कारण असावें असें वाटतें. कांहीं तरी विशेष कारण असल्यावाचून ही तयारी असेल असें वाटत नाहीं. तें पामीर प्रकरणच याचें कारण कीं काय कोणजाणे.

सरहद्दीकडील बातमी आली आहे कीं, जाडोलचा उमरखा बातमी कालपुरा, नावगी व गर्दती येथील खान याच्या फौजांची एक चकमक झडली व त्यांत उमरखानाचा जय झाला.

रजपुतस्थानांत धान्याच्या कमताईमुळें लोक धान्याच्या लुटी करूं लागले आहेत. गेल्या २०व्या तारखेपासून आजपर्यंत त्या भागांतल्या दुष्काळग्रस्त लोकांनीं एकंदर २० खेडीं लुटली अजमीर व मेरवाडा हीं शहरें व त्यांच्या आजूबाजूचीं खेडीं यांच्यावर त्यां लोकांचा हल्ला होऊं नये ह्मणून त्या त्या ठिकाणीं लष्कराचे व पोलिसाचें विशेष पाहारे ठेवलें आहेत.

रशिया व फ्रान्स याचा एकोपा झाला तेव्हां इंग्लंडानें आपला बंदोबस्तही जास्त करावा असें लंडन टाइम्स ह्मणतें.

हिंदुकुश प्रांतांत रशियन लोक व अफगाण लोक यांचा सामना झाला असें सांगतात.

रशियांत हल्ली जबर दुष्काळ चालू असल्यामुळें कामदार वगैरे लोकांचे जे नेहमीचे नाच तमाशे वगैरे व्हावयाचे ते यंदा न होतां त्यांकडे खर्च होणारी सर्व रक्कम दुष्काळ पीडित लोकांच्या मदतीकडे खर्च व्हावयाची असें ठरलें आहे ही व्यवस्था फार उत्तम आहे प्रजेच्या हिताची कळकळ बाळगणाऱ्या सरकारचें हें लक्षणच आहे. टा०अ०

---

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा०खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार"छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ११ ३ ११ ८९
सालअखेर ११ ७ ११ १८८
किरकोळ अंकास........................ ८४

Per annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..................................4as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .........०।

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per line 3as

## THE BERAR SAMACHAR

VOL XXV — AKOLA MONDAY 26 OCTOBER 1891 — NO 42
वर्ष २५ — अकोला सोमवार तारीख २६ माहे आक्टोबर सन १८९१ इ० — अंक ४२

HEALTH, WEALTH & PROSPERITY.

जी. बी. नाईक कंपनीच्या

### विजेच्या आंगठ्या पुतळ्या.



खोटा माल घेऊन फसूं नका. खात्रीचा माल घेऊन अनुभव पहा

प्रत्येक वस्तूवर G. B. N. अक्षरें पहा.

**५०००० वर विकल्या**

रक्त हें मनुष्याचें जीवित्व आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.

जग प्रसिद्ध आहे कीं, सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोगांवर करितात. ज्याच्या आंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यास विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला आहे. त्या पासून पुष्कळ अजारीं मनुष्यें औषधोपचाराशिवाय बरीं झालीं आहेत. या विषयीं हजारों डॉक्टर साक्ष देतील.

रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग ह्या लहानशा ब्याटरी पासून बरे होतात' संधिवायू, शिरांगत वायू, ठणका, द डांतील दुःख, कंबरेंतील दुःख, व्रण किंवा सूज-भोंवळ, पुरुषत्व भंग, अशक्तपणा, स्त्रियाचे, रोग, काळजाचे दर्द, ज्वर, अर्धशिशी, मूत्राशयांतील रोग, मस्तक शूळ, मूळव्याध आणखी इतर होणारे रोग देखील निवारण केले जातात. अशी गुणकारी, सर्व रोग शमन करणारी, आंगावर सुशोभित दिसणारी ही सर्वांनी जवळ असावी हें योग्य आहे. ही ब्याटरी एकदां घेतली ह्मणजे आयुष्य भराची खटपट चुकली.

गुणाबद्दल हजारों दाखले मिळाले आहेत व मिळत आहेत.

किंमत दर पितळी आंगठीस रु० १॥ व पुतळीस १।, चांदीचे आंगठीस रु०३ व पुतळीस रु० २, सोन्याचे आंगठीस रु० २०; पुतळीस रुपये २२; एक डझन घेणारास एक नग ज्यास्त मिळेल. एकापासून सहा नग पर्यंत ट० ह० सहा आणे. रोख दाम असल्यास किंवा व्ह्या० पे० नें मागविल्यास पाठवूं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवा. विशेष माहिती करितां अर्धाआणा पाठवा.

विकत मिळण्याचा पत्ता—मुंबई—भायखळा दावणी समोर. व पुणें—बुधवार चौकांत. जी. बी. नाईक आणि कंपनी, दावणी समोर भायखळा मुंबई.

नोटीस.

नोटीस बेशमी नाथुराम वल्द बाळाराम मारवाडी दुकान मौजे तोरनाळ प्रगणे वाशीम यास खालीं सही करणार यान कडून नोटीस देण्यांत येतें कीं महादजी वल्द भगवानजी व चंद्रभान वल्द माहदजी व धनाजी वल्द महादजी टोपले राहणार मौजे निंबी तालुके मंगरूळपीर जिल्हे वाशीम यांनीं तारीख १४ मार्च सन १८८७ इसवी रोजीं रुपये १००० चे तावागहाणखत करून देऊन रजिष्टर बुक नंबर १ भाग २ पान १५७--१५८ याजवर अनुक्रम नंबर ४ सन १८८७ तारीख ३० मार्च रोजीं नोंदला आहे तो दस्तऐवज खुपचंद रामबक्ष मालक पुरणमल दुकान तामसी व तुह्मी ह्मणजे नाथुराम बळीराम मारवाडी दुकान तोरनाळ या उभयतांचें नावाचा असून त्यांत निमे रकम ५०० रुपये तुमची आहे व निमे रकम ५०० रुपये आमची आहे.सदर्हु दस्तऐवजा बद्दल अद्याप आह्मास कांहीं वसूल मिळत नाहीं सदरहु रकमे पैकीं तुम्ही कांहीं वसूल घेतला आहे कीं काय, तें आम्हांस कळवावें.व घेतले असल्यास निमे रकम आम्हास द्यावी अगर नसल्यास तसें कळवावें कारण ही रकम वसूल करण्याकरितां सदरहु रिणकोवर दावा करणे आहे. त्यास तुम्ही आमचे बरोबर वादीत शेरीक होऊन फिर्याद करितां किंवा नाहीं व तुम्ही फिर्याद करण्यास कबूल नसाल तर आम्हांस आमचे निमे हिशा बद्दल फिर्याद करणें लागेल. करितां ह्या नोटिशीनें तुम्हांस कळविण्यांत येतेंकीं तुम्हांस ह्या रकमे पैकीं कांहीं वसूल आला कीं काय व तुम्ही फिर्याद करितां किंवा नाहीं हे ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाच्या आंत खुलासेवार वर लिहिलेल्या कलमाचा तपशील जबाब द्यावा. न दिल्यास तुम्ही कांहीं रकम वसूल केली असेल तर त्या पैकीं आमच्या हिशाची रकम व व्याज व त्या मानानें खर्च तुह्मी पासून भरून घेतला जाईल.

कळवि ता. १८।१०।९१

सही. आनंदाबाई जवजे पुरणमलतर्फे मुखत्यार सखाराम नागो राहणार वाशीम.

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन वद्य ९ शके १८१३

राजकर्त्यांची जबाबदारी मोठी आहे आणि ती नानाविध आहे. लोकांचें ह्मणणें काय आहे हें प्रथम त्यांस कळलें पाहिजे. ही गोष्ट जितकी साधेल तितकी मदत त्यांना आपलें कर्तव्य बजावतांना होईल. मद्रासचे गव्हरनर लार्ड वेनलाक यांच्या मनांत हें पक्कें ठरलेलें आहे. मद्रासेकडील लष्करी व इतर अधिकाऱ्यांस त्यांनीं देशीभाषा शिकण्या विषयीं फार आग्रहपूर्वक सांगितलें. हा उपदेश चांगला आहे आणि हिंदुस्थानांतील ॲंग्लो-- इंडियन हुद्देवाले लोकांनीं अगत्य देशी भाषा शिकली पाहिजे.

सामान्य लोक बोलतात तें समजून पुरें न घेतां साहिबी धाटणीवर वेळ मारून नेण्याचे पुष्कळांस संवय असते. हल्लींचे अलिशान रेसिडेंट सर डेनिस फिट्झप्याट्रीक यांच्या हातून अशीच एकदां चूक घडली. परंतु ती चूक मोठ्या मौजेची व हास्यकारक आहे. अशी गोष्ट सांगतात कीं फिट्झप्याट्रीक साहेब आरंभीं इंडियांत आले आणि नंतर ते दिल्ली मुक्कामीं माडीवर कचेरींत काम करित होते. तेव्हां एक भय्या गडी ह्मैस चोरल्याच्या आरोपा वरून साहेबासमोर उभा केला. तो भय्या 'भैस' 'भैस' ह्मणे ते साहेबांस कळलें नाहीं परंतु आपल्या ज्ञानाचा भोपळा फुटेल ह्मणून त्यांनीं धिम्मेपणानें चोरीचा माल कोर्टासमोर आणविण्यास फर्मावलें. कोर्ट इन्स्पेक्टरनें साहेबांस 'भैस' तळमजल्यावर आहे ह्मणून सांगितलें. लागलीच साहेबांनीं गर्जना करून दुबार हुकूम दिला कीं येथें वर कोर्टासमोर दाखल करा. कोडतांतले सर्वजण चकित झाले आणि त्यांनीं मोठा अचंबा केला. बिचारा इन्स्पेक्टर घाबरून गोंधळांत पडला परंतु हुजूरचा हुकूम मान्य केलाच पाहिजे. पुढें वेटा भरानें एक काळी भली लठ्ठ ह्मैस चार कानस्टेबल व इतर लोक मिळून जिन्यावरून वर चढवितांना दृष्टीस पडली तेव्हां सर्व कचेरींत हशा पिकला आणि फिट्झप्याट्रीकही खूप हांसले. साहेब थोडे ओशाळले व त्यांनीं चूक कबूल केली.

हीं उदाहरणें बहूत करून शेंकडा ९९ हून अधीक साहेब लोकांस लागूं होतील तेव्हां कोणी कोणाला हंसावयाला नको. म्याट्रिक्युलेशन वगैरे परीक्षेंतून नेटीव उमेदवारांचे इंग्रजींत कसे कसे तारे तुटतात हें वर्तमानपत्रांतून कधीं कधीं छापतात ह्मणून साहेबांच्या देशी भाषांच्या ज्ञानाचा नमुना वर दिला आहे. राजकर्त्यांच्या भाषेचा अभ्यास करण्याची आह्मांस आवश्यकता आहे त्या प्रमाणें प्रजेच्या भाषेची तुटपुंजी माहिती करून घेणें हें अधिकारी साहेब समुदायास जरूरीचें आहे परंतु ही जरूरी आहे असें आह्मी आपमतलबानें ह्मणतों आणि खरोखर त्यांस ते वृथा श्रम आहेत हें मात्र प्रस्तुतच्या अनुभवावरून सिद्ध आहे.

कलकत्याच्या 'बंगवासी' वर्तमान पत्रावर राजद्रोहाची फिर्याद झाली होती पण तिचा निकाल होण्यापूर्वीं त्या पत्रकारांनीं सरकार पाशीं न कळत घडलेल्या अपराधा बद्दल माफी मागितली आणि लेफ्टनंट गव्हरनर सर चार्लस इलियट यांनीं त्या अपराधाचा उजळणी न करण्याविषयीं सक्त ताकीद देऊन माफी मंजूर करून आणिली. अखेर या भयंकर खटल्याचा शेवट गोड झाला हें पाहून सर्वजणांस संतोष वाटला पाहिजे होता. परंतु कांहीं आंग्लो-इंडियन लोकांनीं विघ्नसंतोषीपणा दाखविला आहे आणि कांहीं नेटिव पत्रकार बंगवासी वाल्यांवर भित्रेपणा व देशसेवेंत पराङ्मुखता असे अपराध लावीत आहेत.

बंगाल कडील आंग्लो इंडियन- पत्रांनीं त्या सरकारवर मोठा दोष आणिला आहे. कीं बंगवासीच्या खटल्यांत फिर्याद काढून घेतली हा सरकारचा नामर्दपणा होय. राज्यकर्त्यांची प्रजेवर दहशत पाहिजे ती असल्या अपमानाच्या कृतीनें लयास गेली. मणिपूरच्या सेनापतीला यमसदनास पोंचवून तरवार गाजविली त्या प्रमाणें आपला दरारा व लौकिक कायम राखण्यासाठीं बंगवासीला कडक काळेपाण्याची वगैरे शिक्षा देऊन इतर नेटिव पत्रकारांसमोर उदाहरण मांडले पाहिजे होतें. खरोखर माफी देण्यानें कोंहीं मानहानि होत नसते इंग्रज सरकाराचा प्रभाव व शक्ति इतकी प्रचंड आहे कीं नेटीव पत्रासंबंधानें त्यांच्या हातीं ईश्वरी कर्तुमकर्तुम् लीला आहे. निजामसरकारच्या संस्थानांत नबाब मेहेदी अली यांनीं असलें अचाट कर्तृत्व बजावलें तर चक्रवर्तिनी बादशाहिणीच्या अधिकाऱ्यांची गोष्ट तर सांगणें नलगे. तेव्हां सरकारनें उदारबुद्धि दाखविली व प्रजेवर दया केली तर वृथा न जातां सरकारा संबंधानें लोकांच्या मनांत विशेष पूज्यभाव वागेल आणि तेणेंकरून सरकारचें वजन व लौकिक हीं वृद्धि पावतील. ही आंग्लो इंडियन मंडळी सरकारच्या किर्ती बद्दल इतके जीव कीं प्राण सोडतात पण जेव्हां इल्बर्ट बिलाचा समय होता किंवा इन्कमट्याक्स वाढला तेव्हां हे लोक सरकार विरुद्ध उभे राहण्यास मागें सरत नाहींत हेंही आपण पहिलें आहे. खरा मतलब एवढाच दिसतो कीं ज्यानें स्वार्थ किंवा वैभव दुणावेल तो मार्ग त्यास राजमार्ग व न्याय्य वाटतो.

बंगवासी पत्रकर्त्यांनीं माफी मागितली ही गोष्ट शहाणपणाची व दूरदर्शिपणाची केली. हा खटला करण्यांत सरकारचा हेतु राजद्रोहाचा कायदा पोकळ आहे किंवा नाहीं हें ठरवावयाचें होतें. माफी मागितल्या बरोबर तसल्या लेखांस राजद्रोहाची कायद्यानें व्याप्त्या लागूं झाली असें निर्णयात्मक कांहीं ठरत नाहीं. न्यायकोडता समोर पर्यवसान होण्यापूर्वींच सरकारास जे लेख राजद्रोहाचे वाटले आणि पत्रकर्त्यांच्या मनांत काडीमात्र राजद्रोहाची बुद्धि नव्हती ह्मणून त्यांनीं माफी मागितली तर ते लेख न्यायकोडतानें राजद्रोहाचे ठरविले असें होत नाहीं. तेव्हां पुष्क-

ळ जणांनी ( पिनलकोड कलम १२४ अ ) कायद्याचा विजय झाला असें मानलें आहे तें भ्रांतिमूलक आहे. बंगवासीपत्रकर्त्यांला दोष देणाऱ्यांच्या अभिप्राया प्रमाणें माफीपत्रक सादर केलें नसतें आणि किंबहुना स्वदेशासाठीं काळेपाण्यावर हा बंगवासीकर्ते गेले असते तरी इतर पत्रकारांचा किंवा कोणाचा कांहीं लभ्यांश नव्हता. उलटें जी गोष्ट हल्लीं मोघमांत राहिली ती व्यक्त झाल्यानें कोणत्याहि अप्रिय व कटु लेखाबद्दल बरोबर राजद्रोहाची जरब बाण्याची पुष्कळ आंग्लो इंडियन अधिकाऱ्यांस सवड मिळाली असते. ही सवड आतां नाहींशी झाली असें नाहीं तरी त्या संबंधानें मोठा प्रश्न आहे. यदा कदाचित् सरकारचा पाडाव झाला असता व बंगवासी दोष मुक्त ठरले असते तरी नवीन कायद्याची कुमक संपादण्याचा विचार कायदे कौंसिलांत होणार होताच. तशांत जूरी मध्यें ( ९ जणा पैकीं सातांचें ) बहुमतें बंगवासी राजद्रोही होते तेव्हां आपल्या सरकारला राजनिष्ठ प्रजेनें त्यांस न आवडणाऱ्या कृती बदल शरण जावें हें कांहीं बावगें नाहीं. आह्मा बंगवासी वाऱ्याचें मोठें प्रालब्ध समजतों कीं जूरीच्या बहुमताप्रमाणें न्यायाधीश साहेबांनीं निकाल दिला नाहीं. तसें झालें असतें तर माफीची ही मारामर पडली असती. बंगवासी कर्त्यानीं सुटका करून घेतली ही त्यांनीं विशेष काळजीनें लोकोपयोगी करावी ह्मणजे त्यांनीं आपलें कर्तव्य उत्तम बजावलें असें कोणी ही ह्मणेल.

सारांश, हिंदुस्थानांत लोकमताला मान नाहीं, लोकमताचें प्राबल्य नाहीं, व लोकमताच्या स्वाधीन राज्यकर्तृत्व नाहीं तों पर्यंत राजा बोलेल ती पूर्वदिशा, ज्या गोष्टी सरकार राजद्रोहाच्या मानतात तो राजद्रोह खरा, आणि उदारबुद्धीनें सरकार नेटीव प्रजेस हक्क देईल तेच प्रजेचे राजकीय व सामाजिक हक्क होत. तेव्हां लोकमताची मातबरी करून येई पर्यंत सरकारशीं राजनिष्ठेनेंच नव्हे तर नम्रपणानेंच वागलें पाहिजे आणि त्या अर्थी बंगवासी पत्रकर्त्यानें केलें तें देशकाल वर्तमानास अनुसरून केलें असें आह्मी मानतों.

## वऱ्हाडची श्रीमंती

वऱ्हाडांतील होंयकोडताचे न्यायाधीश कर्नल मेकेंझी यांनीं आपल्या दिवाणी रिपोर्टांत वऱ्हाडच्या जमीनदारी संबंधानें अभिप्राय दिला आहे तो असाः— "ज्या प्रांतांत शेतकी मुख्य निर्वाहाचें साधन आहे तेथील शेतकऱ्यांची वास्तविक स्थिति अगोदर लक्ष्यांत आणली पाहिजे. साधारण ग्रह असा आहे कीं इंडिया मधील इतर भागाप्रमाणें वऱ्हाडांतही या स्थिती संबंधानें आपण उत्तरोत्तर निकृष्टावस्थेप्रत चाललों आहों, शेतकऱ्यांचा बहुतेक वर्ग कर्जाखालीं बुडून गेला आहे आणि वर्षानुवर्ष तो कर्जाच्या डोहामध्यें बुडत बुडत तळाशीं चालला आहे. आणि या वर्गांतील लोक स्वतां व्याजबट्टा करणाऱ्याचे अथवा मारवाड्याचे कर्जदार बनले आहेत. एक बाजू अशी दाखवितात कीं लहान मुलाप्रमाणें त्यांतील लोक भोळसर आहेत आणि दुसऱ्या बाजू कडील बकासूरी व पैशाच मनोवृत्ती समोर ते लोक सहजी बळी पडतात; आणि परिणामीं जमिनीवरील स्वामित्व एका बाजूकडून दुसऱ्याच्या हातीं जलद्रीनें येत चाललें आहे व त्या बरोबर सरकारच्या शांततेस विघ्नकारक गोष्टी घडतात त्यांच्या निवारणार्थ सरकारला विचार करून त्यांत हात घालणें भाग आहे. कांहीं जिल्ह्यांच्या रिपोर्टांतील अनेक भाग वरील प्रकारचीं उदाहरणें देत आहेत. बिनधोकपणें विश्वास ठेवण्या इतक्या पुरेशा गोष्टी कळणें फार मुष्कीलीचें आहे. तत्रापि माझा समज आहे कीं, निदान वऱ्हाडांत तरी शेतकऱ्यांची स्थिति इतकी चांगली आहे कीं, तशी पूर्वीं कधींच नव्हती; ऋणको धनको मधील संबंधाविषयीं लोक बोलतात तेव्हां त्यांत पुष्कळ वृथा कोप आणि गैरवाजवी भूतदया हीं दिसून येतात; ह्मणजे उभयतां ऋणको धनको सारखेच वस्ताद असून दुसऱ्यास गणेशटोपी घालण्यांत तरबेज असतात आणि जेव्हां ते दोघेजण परस्परांच्या दृष्टीवीत साधेल तसें एकमेकांस लुटतात तेव्हां त्या लढाईंत शेरास सव्वाशेर भेटलाच असतो. जर मारवाडी— हें नांव मी व्याजबट्ट्याच्या सावकारास संबोधून योजितें—कठोर व निर्दय असतो तर तो तसा वागतो याचें कारण असें कीं, पुष्कळ दिवसांच्या अनुभवा वरून त्याला स्वताच्या बचावा साठीं तसें वागणें भाग आहे असें कळून आलें असतें. हा बचाव ह्मणजे ऋणको जो कुणबी त्याच्या लुच्चेगिरी पासून व अधमपणाच्या कुऱ्हलकपणा पासून करून घ्यावयाचा असतो व कुणब्याला सबड साधते—वाईट गोष्ट कीं अशी संधि वारंवार सांपडते—तेव्हां तो अधमपणा दाखविण्यास तयारच असतो.

"ज्यांना चांगली माहिती आहे ते असें समजतात कीं वऱ्हाडांतील जमिनी पैकीं एक तृतीयांश जवळ जवळ जमीन सावकारच्या ताब्यांत गेली आहे; परंतु मला जे कोणी भेटले त्यांपैकीं एकजण ही— या गोष्टी कळण्या सारख्या ज्यांना आहेत त्यांच्या नवळून वेळ येईल तेव्हां मी नेहमीं माहिती गोळा करीत असतो— निःसंशयपणें अशा गोष्टी दाखवूं शकत नाहीं कीं या जमिनीच्या अदलाबदली पासून कांहीं अपाय घडला आहे. कांहीं अपाय घडत असावा अशी कल्पना होण्यास एक कारण असें आहे कीं, सावकार लोक—ह्मणजे मारवाडी शब्दानें अर्थबोध होतो—हे कोणी अगदीं परके आहेत व ते सपाटून आपली दौलत देशाबाहेर नेत आहेत असें लोकांस वाटतें. या दोन्ही गोष्टी पैकीं पहिली खोटी आहे तशी दुसरी संशयात्मक आहे कांकीं सावकार लोकांमध्यें पुष्कळ कुणब्यांचा समावेश होतो वहे कुणबी मूळचे नांगेर असून हल्लीं श्रीमंत झाले आहेत; आणि दुसरें असें कांहीं दिसून येत नाहीं कीं रजपुतान्या कडील मुख्यत्वें करून जे सावकार आहेत ते आपली गादी वऱ्हाडांतून क्वचित् प्रसंगींच पालटतात.

"जेव्हां वऱ्हाड प्रांत आम्ही ताब्यांत घेतला तेव्हां पुष्कळ जमीन पडीत होती. ज्या लहान लहान तुकड्यावर मनुष्य वस्ती करी तेथील वहीत जमीन म्हणून त्या जमिनीला बाजारांत कांहीं मोल नसे आणि प्रत्यक्ष नांगर वगैरे धरून जमीन वाहणाऱ्यांस गोडी गुलाबीनें ठेवावें लागे, मिन्नतवारीनें त्यांस कायम राखावें व त्यांचा शोधसमाचार जमीन दारानेंच घ्यावा. त्यांचा कपडालत्ता भिकार असून पुरता नसे; त्यांस दागदागिना व चैन ही बिलकूल मिळत नसे; आणि पुष्कळ वेळा खरोखर ते इतके दरिद्री असत कीं खापराचें भांडें देखील त्यांस अन्न खाण्यास मिळत नसे परंतु झाडाचीं पानें ताटांच्या ऐवजीं असत. आमच्या राज्य कारभारांतील अव्वलच्यावेळीं मी ही वस्तुस्थिति खुद्द माझ्या डोळ्यानें पाहिली आहे या हून सर्व प्रकारें किती निराळें असें सध्यांचें चित्र दाखविलें पाहिजे बरें! आणि असें जर आहे तर मी तरी निदान माझ्या पुरतें विशेष हेतुक अनुमान हें मानतों कीं सुखाभिवृद्धि समवेत आणि नव्या झटलेल्या सुधारणे समवेत जुन्या काळास अपरिचित अशीं कांहीं हीं दुःखें प्राप्त झालीं—आणि हरएक वस्तुस्थिती मधील नव्या फेर फारा बरोबर कांहीं तरी नव्या वाईट गोष्टी घडताह—तरी शेतकरी लोक सर्व मिळून एकंदरीनें ऱ्हास पावत आहेत आणि त्यांची पूर्वीं पेक्षां दैन अधीक आहे असें अद्याप पावेतो निदान सत्याला धरून विधान करितां येणार नाहीं. बहुविध कारुरूपीं सरकार देणें देऊन आणि हें देणें प्रत्येकास भागच आहे—नंतर आमचे लोक कोडतांतून कर्ज चालविण्यास समर्थ आहेत त्या मुळें कर्ज चालवितांना ते मोठे खुशालचंद व बेताल असतात ही गोष्टच सांगते कीं त्यांजपाशीं संपत्ति आहे आणि संपत्ति ह्मणजे सुखवस्तुपणाचें दर्शक होय."

हे विचार भाषान्तर रुपानें मुद्दाम प्रसिद्ध करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे त्याचा इरादा हा कीं लोकांनीं शहाणे होऊन मेकेंझी सारखे न्यायमूर्ती कर्नल हें काय ह्मणतात हें समजून घ्यावें व वास्तविक स्थिती साहेबांस कळवून त्यांना सुखनिद्रेंतून जागृत करावें व प्रजेच्या दैन्य दूर करण्याविषयीं विज्ञप्ती करावी. मेकेंझी साहेबांच्या लेखास दिवसेंदिवस महत्व व मान अधीक मिळाला पाहिजे कां कीं ते स्वल्प अवकाशांत वऱ्हाडप्रांताचे मुख्य कमिशनर होणार आहेत तेव्हां त्यांच्या हातीं प्रस्तुतच्याहून ही जंगी व भक्कम अधिकार पोचून प्रजेचें हिताहित करण्याचे सामर्थ्य नवीन येणार आहे. या सामर्थ्याचा उपयोग वाईट होईल असें नाहीं तरी त्याचा लाभ करून घेण्यास साहेबांचे विचार कसे खरे खोटे आहेत हें त्यास दाखविणें अगत्याचें आहे.

वऱ्हाडचे लोक श्रीमान होत चालले आहेत, हवेल्या माड्या, गाड्या घोडे, वगैरे ऐषआराम अधीक दिसत आहेत, दागदागिने व चैनी अती विपूल झाल्या आहेत शेतकरी धनधान्यसंपन्न आहेत इत्यादि हजारो गोष्टी आधारभूत घेऊन आमची श्रीमंती वर्णिली आहे ती खरोखरच लोकांस तशी वाटत नसेल आणि जमिनी शेतकऱ्या कडून गेल्या तरी देखील कांहीं भय नाहीं, कर्जदार ठार सर्फ ठार बुडत नसून नीट व्यवस्थशीर आहेत वगैरे विचार त्यांस पसंत नसतील तर लोकांचें दारिद्य कर्नल मेकेंझी साहेबांस कळविण्यास विसरूं नये आणि अशा प्रयत्नास आम्ही होईल तेवढी मदत देण्यास सिद्ध आहों.

राष्ट्रीय सभेचे संस्थापक मि. ए. ओ. ह्यूम साहेब विलायतेहून निघून ता. १९ नोवेंबरच्या सुमारास नागपूर शहरीं दाखल होतील. या थोर पुरुषाची मूर्ति हिंदुस्थानच्या लोकांनीं पाहिली ह्मणजे लागलीच राष्ट्रीय सभेविषयीं सर्व देशभर चळवळ सुरू होईल. राष्ट्रीय सभेचा येता समारंभ मोठ्या राजेशाई थाटावर होईल असें नागपूरकरांच्या विलक्षण खटपटी वरून वाटतें. वऱ्हाडकरांची मदत ही योग्य वेळीं भक्कम होईल असें आह्मी इच्छितों. मुंबई, कलकत्ता, मद्रास, अल्हाबाद, व नागपूर इत्यादि शहरीं मिळून राष्ट्रीय सभेच्या बैठका झाल्या नंतर सर्व देशभर राष्ट्रीय सभेची केवढी मातबरी लोक समजतात हें निराळें सांगणें नको. प्रत्यक्ष हिंदुस्थान सरकार राष्ट्रीय सभेविषयीं किती कळकळ बाळगतें हें आपणांस कळून आलें ह्मणूनच सन १८९३ च्या मे महिन्याच्या सुमारास राष्ट्रीय सभेची मोहिम आपण ब्रिटिश कमिटीच्या सल्यानें खुद्द महाराणी सरकारच्या राजधानीवर करणार आहों हेंही स्पष्ट आहे. या मोहिमेंत आपण यशश्री मिळविली ह्मणजे हिंदुस्थान सरकारवरील अपील कोडतांत जय मिळविल्या सारखें होणार आहे. या लंडनच्या स्वारीची तयारी कशी काय करावयाची आहे हें येत्या डिसेंबरच्या बैठकांत ठरविणें भाग आहे. सन १८९२ त हिंदुस्थानांत निराळी बैठक भरविण्याचें आतां प्रयोजन उरलें नाहीं. कांकीं त्या सालच्या अखेरी नंतर चार महिन्यांनीं राष्ट्रीय सभेचे निदान शंभर प्रतिनिधी विलायतच्या सफरीस निघणार आहेत. तेव्हां १८९२ त बैठक न भरविल्यानें मनस्वी खर्च वाचेल व विलायतच्या तयारीला ही मुबलक अवधि सांपडेल. ब्रिटिश कमिटीनें हा पुढील सालीं सभा हिंदुस्थानांत न भरविण्या विषयीं सूचविलें आहे त्या वरून येत्या नागपूरच्या समारंभाच्या वेळीं १८९३ तील लंडनच्या बैठकी विषयीं कायमचा ठराव बाहेर निघेल असें आह्मांस वाटतें.

We request our subscribers to allow us the usual Divali Holidays which they have hitherto done ungrudgingly As our office will be closed for the holidays there will be no paper issued on the 2nd November 1891.

## The Berar Samachar

MONDAY, OCTOBER 26, 1891

Victoria C. Woodhull Martin is the author of a short pamphlet circulated for general information. We acknowledge with thanks the receipt of a copy of it Its price is not known but it is almost supplied gratis through the laudable motives of philanthropy to disseminate a sort of knowledge which every body ought to learn but few care to know. The subject is the rapid multiplication of the unfit. The broad and liberal view of human economy which is advocated in some forty pages of foolscap quarter sheets pictures anew the present social conditions of artificial societies as within the limits of a number of improvements which every member of a family can institute in his own domestic circle. The argument is to give a deadly stroke at the false interests of humanity in order to enable young men and women to realize the purpose for which they are uiting in the holiest bond of physical life. We should have a more rational competition for the privilege of parentage. Whatever we are doing now through the natura' rocess by which evolution works air ly at raising the

*quantity* of life while the attempt of the short treatise is to instruct men to raise the average *quality* of life. It is mean and ungenerous that we shirk the disagreeable duties of promoting the interests of future generations. They lie at our mercy but cannot benefit us in return. The misconceived philanthropy and the modern arts of medicine developed by the absence of wars and epidemics have hastened the multiplication of the unfit with a rapidity unknown to old times of longevity. No salutary check is at play and the present security and peace unvisited by the natural effective checks of population have kept the unfit alive. With their flourishing prolongation the outcome of mankind becomes hopeless. The only possible remedy advocated by the pamphlet is to accelerate the development of real happiness and thus to render brilliant the prospect of the human family.

The pamphiet we recommend to every one who thinks that he should elevate at least for himself the rank he fills in society. It is a popular instructor and deserves therefore honest and general perusal. The only fault in it is that it verges more on the side of theory than of practice. People often misstate the length and breadth of the proposition that human nature is the same throughout. The general idea expresses a good deal much less than it is often understood to mean. All things being equal the nature of man will produce the same effect under a similar group of circumstances. Whatever differentiates one human nature from another is the peculiarity of the nervous system. Many persons cannot be affected with kind words and mild treatment but must be dealt with harshly or firmly. The author has then ably portrayed the vicissitudes of present times that have worked numerous changes in the systems of mankind as handed down through heredity. The workhouses, increase in sedentary occupations, hard strain over a man's power of endurance, the stress of poverty and adverse conditions have strongly induced political economists to advise the conscientious and the right minded not to marry until they are in a position to do so. Herein lies the crux of the social problem. In any attempt to raise the standard of humanity we must aid the survival of the fittest. In the mating of individuals it is to be regretted that money bags are highly valued in the marriage mart and our false social system prevents the coming together of our best men and women. The second cause against the survival of the fittest is the industrial system which favours the clever dishonest man in a plutocracy. The author has thrust in a doubtful point as a third cause in the centralization of wealth and industries in so far as it destroys asthetic taste and supplies no demands for the superior works of great artists. That population increases with the increase of food is true to a certain limit since the further increase in population is facilitated by the stuggling poor when they are underfed Abundance of rich food lessens fertility and therefore the shorter the supply of food not below the minimum necessary to sustain life the faster will be the multiplication of the unfit.

---

Sir Reymond West of the Bombay Legislative Council delivered a lecture at the last prize distribution of the Native Institution in Poona. He first dwelt on the freedom of private schools from the stricter trammels of Government direction. He regretted at the insignificance of the Municipal grant of Rs. 150 and asked the townsmen of Poona to subscribe liberally to an institution that enrolls the roll of knowledge to the rising generation of that city. He further pointed how teaching becomes a matter of routine when it lacks in the play of individual sympathy amongst the teachers and learners. He is most eloquent and impressive in adverting to the parental responsibility of educating children. The now stating para deserves attentine perusal:—

Parental influence is important. Children are a sacred trust. Its duties are not discharged by paying money to a school master. The school master is virtually excluded from a large part of the boy's life to which his parents should have constant access. As father and mother they are called on to set examples of purity and nobility of life. There is between them and their offspring a natural affinity of character which makes all they do and all they say far more effectual than what comes from others. The call on them is therefore a mighty one if they only realise it.

Sir R. West has with great caution warned us that the general education on the modern scale with which the young men are equipped does not enable them to cope with the grand requirements of the day. Literary excellence is no doubt a great qualification but a man of letters makes a sorry dance in the field of arts and industries; and hardly finds a high market for his goods. It is only the upper classes that can afford to receive liberal and high education while the middling classes require technical knowledge to earn their bread and act appropriately their part in the economy of a human society. His observations on this point are worth repetition for a number of times as they come from a man of authority and specially an educationist.

"For myself I am a sceptic as to patent and special methods of education, and as to the benefits of excessive instruction in the "ologies" course of study thoroughly carried out on the old system. They will bring the pupil's mind into contact with those great intelligencies that have made the human race what it is. They will give power and flexibility and an instinctive readiness to meet the various situations of life Let no one feel misgiving if he is diligently studying Sanscrit or Arabic, or Greek or Latin on the alleged unappropriateness of such a discipline. It is forming his mind for other studies, and if nature intends him even for a Humbolt or Huxley he will not in the long run have lost much in the race. At the same time we must acknowledge that new times and circumstances bring new vicissitudes... in education as in all other spheres. Most of us are born with very limited faculties. At the basis of a good education should be a fair share of contended ignorance In order to know some things well we must be content to have many things unknown. We mostly have a group of functions setting towards meditation or towards observation of the outer world. It is thought this small mental endowment that we have to find access to the great world of thought and in order to make our view clear and complete we must consent to its embracing but a narrow area. If we attempt to cover too large a field in any individual case we produce superficiality. If we take our pupils too high we make them dreamers It is part of the genius of a good teacher to discover the marks of particular gifts and aptitudes in his pupils, to bring his powers to bend, and finally on these to mark that the whole mental training has special reference to them as they must be the true illuminating points of the individual mind. If what I have said be true there should in education as in other things, be a perpetual process of minute change which yet never leads to a break of continuity with the past. We should look on what the world and what individual genius offers to us with honest and critical eyes. He who obstinately refuses to move along with any great advance of the country must stand aside or be crushed by it, but precipitation is attended with equal danger. The movement has extended to this country. It has been warmly taken up by many gentlemen like my Honorable friend Mr. Ranade who believe that material welfare must stand on variety of employments and productions and who do not see why Iddia once at the head of art industry should not regain, at least, an honourable position. Now for all art industries quickness of eye and expertness of hand are indispensable. These are cultivated by diligent practice in youth and the mind at that stage may be furnished with innumerable common places of form and devise which come forth afterwards in ideal combinations. In transplanting to this country the arts and industries that we borrow from Europe, there is almost always some loss through their want of precise adaptability to local circumstances. There is thus a large field for trained skill in building Indian industries on European models. The connection of India with England the great workshop of the world, ought to develop art manufactures and industrial invention in a degree heretofore undreampt of; and in every large school some door ought to be opened if possible for those whose abilities urge them in this direction."

---

सुट्टी– सालबादच्या मामूल वहिवाटी प्रमाणें आमचे प्रिय वाचक आम्हांस दिपवाळीच्या सणा निमित पुढील आठवड्यांत सुट्टी देतील असा पूर्ण भरंवसा आहे. तेव्हां येत्या लक्ष्मीपूजना निमित्त नोवेंबर तारीख २ रोजीं वऱ्हाडसमाचारचा अंक निघणार नाहीं.

---

## वऱ्हाड

उमरावतीस गेल्या बुधवारीं नागपुरच्या राष्ट्रीय सभेसाठीं मुखत्यार निवडण्या करिता रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे बी. ए. एल्. एल्. बी यांच्या अध्यक्षते खालीं सभा भरली होती. त्या सभेंत उमरावती जिल्ह्या तर्फे ११९ प्रतिनिधी धाडण्याची सूचना सर्वानुमेत पसार झाली. संमती वयाच्या बिला विषयीची दूही लयास जाऊन राष्ट्रीय प्रकरणांत उभयपक्षाची ऐक्यता दिसली हें सुचिन्ह होय.

मि. टी. सी. ह्लोडन साहेब हे पुढील महिन्याचे पहिल्या आठवड्यांत कर्नल मेकेंझी साहेब यांस आपले कमिशनरच्या कामाचा चार्ज देऊन हैदराबादकडे रवाना होतील. ते तेथें पोंचून रेसिडेंटचे कामी रुजूं झाल्या नंतर निजाम सरकारचे दिवाण एक मोठी मेजवानी सर डेनिस फिट्झप्याट्रीक यांच्या सन्मानार्थ देणार आहेत.

वऱ्हाडचे फारेस्ट खात्या कडील डेपुटी कानसरव्हेटर मि. जी. एच. टेकर यांची बदली मध्य प्रांतांत केली आहे.

रा. रा. गोविंद राव मुदलीयार एक्स्ट्रा. असि० क० यवतमाळ यांस गेल्या १२ वे तारखे पासून सहा आठवड्यांची हक्काची रजा मिळाली आहे.

खामगांवच्या तालुका बोर्डांत मि. शबासखान तहसिलदार यांस सरकार तर्फे सभासद नेमिलें आहे.

मलकापूरच्या शाळेवरील हेड मास्तर रा. रा. हरी मोरेश्वर शेवडे यांस जळगांव जामोदच्या शाळेवर बदलून तेथील हेडमास्तर रा. रा. कृष्णाजी मल्हार पैठणकर यांस मलकापुरास नेमलें आहे. ही बदली राजश्री शेवडे यांस कितपत आवडेल किंवा काय कारणा वरून झाली असावी हें कांहीं कळत नाहीं.

यंदा वऱ्हाडांतून हायस्कूलच्या हेड मास्तरांच्या परवानगीनें २७ विद्यार्थी म्याट्रीक्युलेशन परीक्षेस जाणार आहेत. खानगी उमेदवार ही मुक्तद्वार असल्या कारणानें पुष्कळ जाणार असावेत.

उमरावतीस झालेल्या चिफ कानस्टेबलांच्या परीक्षेस २१ उमेदवार हजर होते. परीक्षा कसून घेतली गेली. या खात्यांतील लहान लहाळ जागेस पगार फार थोडा आहे ह्मणून चांगले लोक इकडे फार करून शिरत नाहींत असें नागपूर सभाचारकर्ते लिहितात.

मोर्शीचे नायब तहशीलदार यांस एक महिन्याची रजा मिळाली आहे. आणि तेथील पोलीस इनस्पेक्टर मि. नरसय्या हे दारव्ह्यास बदलले आहेत असें कळतें.

मि. जी सी एटकिन साहेब हे पुढील महिन्यांत आपल्या हास्कूलच्या हेडमास्तराच्या जागीं रुजूं होतील; आणि पगारानें व दर्ज्यानें हे भारी असल्या मुळें पुढील वर्षी पासून उमरावती हायस्कूलांतील प्युपिल टीचर्सचा वर्ग अकोल्यास येईल; आणि त्या साठीं मि. एटकिन यांस दरमहा ५० रुपये जाफा मिळतील.

---

### नोटीशीचें उत्तर.

माधोजी वलद राघोजी तेली व कान्हु वलद यादोजी तेली राहणार निमगांव ता० मलकापूर जिल्हा बुलढाणें यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीसीचें उत्तर देण्यांत येतें कीं, तुह्मी तारीख ५ माहे अक्टोबर सन १८९१ इ० चे वऱ्हाडसमाचारांत नोटीस दिली कीं माझा नवरा मारुती वलद यादोजी हा मैयत झाला आहे व त्याची स्थावर जंगम मिळकत तुझे ताब्यांत आहे ते विकण्यास अगर कोणास लिहून देऊं नये, अगर विकूं नये, अगर मुलीचें लग्न वगैरे आमचे मसलती शिवाय करूं नये व दुसरा घरठाव करणें तो आमचे संमती शिवाय करूं नये. हें तुमचें लिहिणें फारच चुकीचें आहे. ही जिनगी माझे नवऱ्याचे मालकीचा आहे. तुह्मी पंचवीस वर्षांपासून विभक्त आहात सबब तुमचा माझे जिनगीवर कोणतही प्रकारचा हक्कसंबंध नाहीं. माझे जिनगीचा मी मुखत्यार आहे यांत तुमचा कांहीं हक्क नाहीं तुह्मी विनाकारण मजला या नोटीशींत पाडलें याचा खर्च तुमचे पासून भरून घेतला जाईल. या उपर तुह्मी मजवर कोणते ही प्रकारची नोटीस वगैरे दिल्यास मी विनाकारण ताप दिल्याची फिर्याद तुमचे वर करीन हें खूप समजावें हें उत्तर.

( सही. )

रुखमी मर्द मारुती तेली वस्ती निमगांव नांदुरा इचे हातची निशानी बांगडी-

---

### जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोलें म्युनिसिपाल कमेटीचे हद्दींतील कंदील लावण्याचा मक्ता देण्याचा आहे ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं कमेटीचे आफिसांत प्रत्येक कंदीलास दरमाहा काय घेण्याचे याजबद्दलचे टेंडर तारीख ३१ आक्टोबर १८९१ इ० चे आंत दाखल करावें. मक्त्याच्या शर्ती कमेटीचे आफिसांत आफिसचे वेळीं पाहण्यास मिळतील कळावें. तारीख १९ माहे आक्टोबर १८९१

(Sd). Mahomed Husssain
Secretary
A. M. C.

---

## वर्तमानसार.

म्हैसूर सरकारची नवी पार्लमेन्टसभा गेल्या गुरुवारी भरली होती. यावेळीं रेसिडेन्ट व म्हैसूर सरकारचे कामदार हे सर्व हजर होते. या सभेत म्हैसूर प्रांतांतल्या प्रजेने निवडून दिलेले असे २१० मेम्बर होते. विलायतच्या पार्लमेन्टचे मेंबर जसे प्रजेने निवडलेले असतात तसेच हेही त्या प्रजेने निवडलेले होते व ही रीत त्या सरकारानें आलीकडेच सुरू केली आहे. सभा भरल्यावर महाराजांचे मुख्यप्रधान यांणी सभासदांचे आभार मानून आपल्या कारभाराचा रपोट वाचला. त्यावरून समजतें कीं, १८९०।९१ सालांत १४९ लाख रुपये जमा झाले. यापूर्वी इतकी जमा कधीं झालेली नाहीं. अपकारी, जंगल व सोन्याच्या खाणी यांपासून यावर्षी जास्त जमा झाली. एकंदर खर्च १२२ लाख झाला. या शिवाय रेलवेची जमा १,२९,००० व खर्च ११,१०,००० झाला तो सर्व धरून नक्की शिलक १२,६४,६४२ व मागची शिलक ९१,११,४२४ मिळून साल अखेर खाजन्यांत १,०४,७६,०९६ रुपये राहिली. वेगळाल्या रेलवेची कामें झपाट्यानें चालू आहेत. कालव्यांची सोय चालू असून शतकऱ्यांस जंगलाच्या वगैरे सवलती देण्यांत आल्या. मुलींच्या शाळाही लोकल कमेट्यांच्या स्वाधीन केल्या असून म्हैसूर व बंगलोर म्युनिसिपालिट्यांस लोकांनीं मेंबर निवडून देण्याचा अधिकार दिला. मोठाल्या कामदारास लागणारें चांगलें शिक्षण देण्याची सोय होणार आहे. अशी त्यां मुख्यप्रधानांनीं माहिती सांगून नुकताच पाऊस पडल्यानें दुष्काळाच्या भीतीचें निवारण झालें असें शेवटीं सांगितलें. हा सर्व प्रकार फार आनंददायक आहे व गायकवाड वगैरेंनी याचें उदाहरण घ्यावें आमच्या लहान लहान कारभाऱ्यांनीही उपदेश घ्यावा. दिवाण व राजे यांची आह्मी तारीफ करितों.

रशियाच्या पामीरवरील स्वारीबद्दल पुढें काय तजवीज करावयाची याबद्दल लंडन येथें विचार चालू झाला आहे. रशियन दरबारचा इंग्रजवकील सर मोरीअर हा रजा घेऊन लंडन येथें आला असून इंग्रजसरकार त्याच्यापाशीं पूसतपास करीत आहे. रशियाच्या या पुढें सरण्यास इंग्लंड व चीन हे दोघे मिळून एकत्रपणानें अडथळा आणतील असें अनुमान आहे. असें ता. १६ ची तार सांगते.

नव्या चमनपर्यंतची रेलवे येत्या महिन्यांत चालू होणार. सरहद्दप्रकरण असल्यामुळें घाईनें झालेंच पाहिजे.

काश्मीरांतून रेलवेचा रस्ता नेमण्याची पाहाणी करण्याची तजवीज चालू झाली आहे. या सरहद्दीवरच्या असल्या कामास काश्मीर ताब्यांत आल्यानें सोय झाली आहे.

कलकत्याच्या मारवाड्यांचे काबुलास विश्वसनीय एजन्ट असून मध्यएशियांतल्या मोठाल्या ठिकाणीही त्यांचे चांगले एजन्ट असण्याचा संभव आहे व त्या मारवाड्यांत अशी गप आहे कीं, रशिया व इंग्लंड यांच्या दरम्यान लवकरच लढाई होण्याचा रंग आहे. हिंदुस्थानचा चालू बजेट बाहेर येण्या पूर्वी व जमाखर्चाची माहिती बाहेर येण्या पूर्वी सरकार अमुक कर्ज काढणार असें याच मारवाड्यांनी भविष्य केलें होतें असें सांगतात. तर मग आह्मा सुधारकांपेक्षा हे तीन शेंड्ये मारवाडी जास्त शहाणे ह्मणावयाचे. ठा० अ०

सुवासिक शाई— छापण्याच्या शाईत सुवासिक गंधें घालण्याची कल्पना एकानें काढून नुकताच विलायतेस अनुभव घेतला आहे. या शाईचा सर्वत्र पसार झाला ह्मणजे लायब्ररींत बसणें हें गंध्याच्या दुकानांत बसण्या प्रमाणें घ्राणेंद्रियास मोठें अल्हाद जनक वाटेल यांत शंका नाहीं.

फ्रान्स एथील विद्वान शोधकानें असें सिद्ध केलें आहेकीं, दरवर्षीं पृथ्वीचा .०६ अंश झिरपून झिरपून त्यांचें पाणी होत आहे ह्या प्रमाणें बवितलें असतां आणखी पंचेचाळीस लाख वर्षांनीं ही अवघी पृथ्वी झिरपून जाऊन जलमयी होणार! हा सिद्धांत एकून लोकांनीं घाबरूनये. कारण, तशी स्थिति होण्यास पुष्कळ अवकाश आहे.

लढाईची तयारी— रूसदेशानें ह्यावर्षी लढाईची तयारी मोठ्या जारीनें चालविली आहे व त्यासाठीं साठ कोटी काडतुसे बनविण्याचा हुकूम सुटला आहे. इतक्या तयारी प्रमाणें कोठें तरी युद्धानल पेटल्या शिवाय राहणार नाहीं असें अनुमान आहे.

कालदर्शक यंत्र— क्यांटन (चीन) एथें ९६० वर्षांपूर्वी एक कालदर्शक जलयंत्र कोणा कल्पकानें करून ठेवलें आहे तें आजपर्यंत अस्खलितपणे व अगदीं बरोबर अखंड चाललें आहे. त्यांत एक मिनीटाचाही फेर पडत नाहीं.

औरंगाबाद एथें एक विलक्षण गाय आहे. तिच्या उजव्या कानाच्या चाप्यावर एक लहानसे तोंड असून त्या तोंडांत दांत व एक लहानशी जीभही आहे. डाव्या कानावर एक लहानसे वाकडे दिला आहे ही गाय मथुरा येथून एका बैराग्यानें आणिली आहे. ईश्वरी लीला अगाध आहे.

अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यापासून पासिफिक महासागराच्या किनाऱ्यापर्यंत लष्कर ने आण करण्या करितां किती खर्च लागेल याचा अदमास तयार करून पाठवावा असें इंग्लंडांतील लढाई खात्याच्या मुख्या कडून कॅनेडियन पासिफिक रेल्वे कंपनीस विनंतीपत्र गेलें आहे.

प्रश्नाचे उत्तर देण्यास उशीर लाविला ह्मणून एका खोस ढाका येथील जज्जानीं १ दिवसाची शिक्षा दिल्याचें कळतें. न्या. सिं.

इंग्लंडानें इजिप्त लवकर सोडावें हे ग्लाडस्टनचे ह्मणणे वेडेपणाचें आहे असें चेम्बरलेन ह्मणतो. ठीक आहे. नका तर सोडूं!

गांधील माशांचा पराक्रम—बर्लीनच्या शेजारच्या एका खेड्यांत एक गरीब माणूस राहत असून त्याच्या दारांत पुष्कळ दिवस वापरण्यांत नसलेला एक पंप होता तो चालावण्यास तो माणूस लागला असतां त्या नळांत घरटा करून राहिलेल्या त्या गांधीलमाशा एकदम चवताळून त्या माणसास डसूं लागल्या. माणूस अगदीं त्रासून व वैतागून पळत सुटला. रस्त्यांत आला तो एक घोड्यांची गाडी चालली आहे असें पाहून आपल्या मागच्या त्या माशा त्या घोड्याच्या माग लागल्या व आपली सुटका व्हावी ह्मणून तो गाडीभोंवती फिरूं लागला; तरी त्या आपणास सोडीत नाहींत असें पाहून तो झाडाच्या झुडपांत शिरला व त्या नाळ्यांत इकडून तिकडे घुमून त्या माशांस तेथें गुंतवून तो पळून गेला. त्यांचे सर्वांग, तोंड व डोळे यांसह त्या माशांनीं जसें काय अगदीं फोडून काढलें असून डोळ्यांनीं तर बहुतेक आंधळाच झाला होता असा प्रकार होऊन तिकडे ज्या कांहीं माशा त्या घोड्याच्या गाडी भोंवत्या गुंतल्या त्याणीं तो घोडा, गाडीवाला व आंत बसलेलें एक नवरा बायकोचें जोडपें या सर्वांस सतावून सोडलें. माशांच्या त्रासाने घोडा बेकाम पळत सुटल्याने गाडीवाला व गाडींतला नवरा हे गाडींतून खालीं पडले व आंत एकटी बायको राहून घोडा त्रासून बेफाम झाला व त्या माशांनी त्या घोड्याबरोबर त्या बायकोसही चावचावून बेतर्जे अशी एक गोष्ट प्रसिद्ध झाली आहे. आपणास त्रास देणाराचा सूड घेण्याचें ज्ञान त्या माशांस जितकें आहे तितकेंही अह्मा सुधारकांस नाहीं असें आमच्या कृतीवरून दिसतें. कारण हे पाद्री वारंवार आमच्या देवादिकांचा निंदा करून आमच्या मनास त्रास देत असतां त्यांचे तें विडिवर्णे ऐकण्यास आह्मी मुदाम जाऊन बसतों ! तेव्हां आमच्या शांतपणाची कमाल ह्मणावयाची.

हिंदुस्थानांतून रवाना होणाऱ्या गव्हांचें प्रमाण अलीकडे कमी होत चाललें आहे असें कोणत्या महिन्यांत किती गहूं रवाना झालें याचे जे आकडे याखालीं दिले आहेत त्या वरून होतें:—गेल्या एप्रिलांत १७,३०,००० खंडी रवाना झाले; मे महिन्यांत ३९,०४,००० खंडी; जुनांत ९१,४१,००० खंडी; जुलईत ३१,००,००० खंडी व आगष्ट महिन्यांत २६,४३००० खंडी बाहेर गेले. हे कमी होण्याचें प्रमाण बरसाती मुळें आहे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. तसेंच युरोपांतल्या स्थितीकडे पाहिलें म्हणजे, हिंदुस्थानांतला यंदाचा नवा गहू तयार झाल्यावर, पुन्हा गुदस्ताच्या उन्हाळ्या प्रमाणे गहू रवाना होण्याची फार मोठी गर्दी चालेल असें दिसतें. गव्हाच्या व्यापाऱ्यांनी आणि गहू पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनीं सावध राहावें आणि योग्य किंमत घेण्याविषयीं खबरदारी घ्यावी हे चांगले यंदा मध्यप्रांतांत पाऊस चांगला पडला असल्यामुळें गव्हांचें पीक चांगलें येण्याचा संभव आहे. आणि युरोप व अमेरिका यांत येत्या उन्हाळ्यांत धान्याची चणचण होण्याचा रंग आहे. फ्रान्सांत येत्या जून महिन्यांत धान्या वरील जकात वाढणार आहे, तेव्हां त्यापूर्वी ह्मणजे गेल्या उन्हाळ्याप्रमाणें यदांहीं एप्रिल मे व जून या महिन्यांत हिंदुस्थानांतलें धान्य परमुलखीं रवाना होण्याची मोठी धांदल उडून जाईल असें दिसतें. या धांदलींत ग्रेट इंडियन व नागपूर या रेलवेंची मोठी चंगल उडेल्च पण आमचे शेतकरी थोडे सावध राहतील तर त्यांचीही बरीच चंगल उडण्याचा संभव आहे. गेल्या उन्हाळ्यांत जें धान्य परदेशी गेलें त्याची आमच्या शेतकऱ्यांस फारच थोडी माहिता असल्यामुळें त्यास मिळावा तसा चांगला भाव मिळाला नाहीं व त्यांच्या मेहनतीचा बराच फायदा युरोपियन व्यापारी व परदेशी प्रेक्षक यांणीच घेतला, ह्मणून यंदा शेतकऱ्यांनीं सावध राहून त्या फायद्यांत आपला वाटा काढून घेण्यास चुकूं नये.

हजारा सरहद्दीवरही आमचें सरकार कांहीं नवीन लोक नेमीत आहे असें सांगतात. या हजारा स्वारीवर गेलेल्या लोकांस त्या स्वारीचा दर्शक असा एकेक बिल्ला देण्याचा हिंदुस्थानसरकारचा विचार असून तो प्रश्न विलायतसरकारच्या मंजुरीस गेला आहे.

ठा० अ०

बंगाल्यांत एका युरोपियन कंपनीनें आयुष्याचा विमा उतरविण्याची पद्धत आहे त्याप्रमाणें कन्येच्या लग्न समयीं लागणाऱ्या हुंड्यासंबंधाचा विमा उतरण्याची सोय केली आहे. ती कशी काय हें अद्याप कळलें नाही. त्या कंपनीचें नांव मेसर्स सारीसन आणि कंपनी. परंतु अशा प्रकारच्या उद्योगाची चहा मात्र होईल यांत संशय नाहीं. युरोपियन कल्पक खरे. पैसा कसा मिळवावा हें त्यास पक्कें कळतें. नाहींतर आह्मी!

बुद्धगया येथें शाक्यमुनी अथवा बौद्ध धर्म संस्थापक बुद्ध याची समाध आहे तिची देखरेख हिंदूकडे असल्यामुळें व्यवस्था असावी तशी नाहीं असा बोभाट बौद्धधर्मी लोकांत फार माजला आहे. यंदा तिबेट, चीन जपान, सिलोन वगैरे देशांतील बौद्धधर्मी लोकांनीं आपल्या आपल्यांतील पुढारी मुखत्यार या देशांत पाठवून हें महा पवित्र स्थान आपल्या स्वाधीन कसें राहील वगैरेचा विचार करावा अशी तजवीज केली आहे त्याप्रमाणें कांहीं मुखत्यार हल्लीं येऊन दाखलही झाले आहेत.

बंगाल नागपूर रेल्वेच्या तिसऱ्या क्लासाचे उतारूचे भाडें दर मैली २ पै केलें आहे.

हैद्राबादेस ट्राम्वे करण्यास परवानगी द्यावी ह्मणून निजामसरकाराकडे अर्ज झाले आहेत या ट्राम्वेस दर मैलीं २४०० रुपये खर्च होतील असा अजमास केला आहे. व त्याबद्दलचे डिझाईन ( नमुने वगैरेही तयार झाले आहेत.

बडोद्यास एक सूपशास्त्र शिकविण्याची शाळा स्थापत करून, आचाऱ्यांना स्वयंपाक कसा कसा करावा, हें शिकविण्याचा तेथील लोकांचा विचार चालला आहे. क० त०

मच्छमार लोकांनीं इकडे लक्ष द्यावें—बेळगांवाजवळ एका कुणब्यानें एका हातांत मोठा मासा असतां दुसऱ्या हातांत लहान मासा धरिला; तेव्हां तो त्याच्या हातास चावला; सबब कुणब्यानें त्यास तोंडानें तोडण्याचा प्रयत्न केला. इतक्यांत माशानें त्याच्या टाळक्यांत उडी घातली, व नरड्यांत अडकला. त्यामुळें कुणब्याचा श्वास बंद झाला आजूबाजूच्या लोकांनीं पुष्कळ प्रयत्न केला; परंतु निष्फळ झाल्यामुळें त्यास बेळगांवास मि. शिरगांवकर यांच्या दवाखान्यांत आणिला डाक्टर साहेब शस्त्र आणण्यास गेले तोंच त्याचें प्राणोत्क्रमण झालें!

स० शी०

☞ हें पत्र अकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार"छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.